
म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं. 3709

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
संग्रहालय वाचनालय शाखा.
अनुक्रम न. | विभाग | क्रमांक
पुस्तकाचें नांव
लेखक
सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका. पुस्तकाची खराबी करूं नका.

REFBK-0019767



# सुख-संवाद

(लघुनिबंध संग्रह)

★


लेखक :

वामन पुरुषोत्तम दामले,
एम्. ए., एल् एल्. बी.

बुलढाणा (वऱ्हाड)



REFBK-0019767



चित्रशाळा प्रेस, प्रकाशन विभाग, पुणें २

किंमत २॥ रु.

मुद्रक :

एस्. व्ही. पोरे

चैतन्य प्रेस, ६९१ बुधवार

पुणें २

प्रकाशक :

के. एस्. गुप्ते

६९१ बुधवार, पुणें २

एकमेव विक्रेते :

चित्रशाळा प्रेस, प्रकाशन विभाग

पुणें २

# ‘ अनुक्रमणिका ’


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | शहाण्यांतील वेडे | .... | .... | १ |
| २ | अर्थशास्त्राच्या मर्यादा | .... | .... | ७ |
| ३ | प्रीतीचें पाहुणे | .... | .... | १४ |
| ४ | अपयशाचें यशोगीत | .... | .... | २१ |
| ५ | नास्तिकाच्या घरचा सत्यनारायण | | .... | २५ |
| ६ | दु:खाचें स्वरूपदर्शन | .... | .... | ३४ |
| ७ | भीतीच्या रम्य कथा | | | ४१ |
| ८ | साधुसंतांच्या उपरती | .... | .... | ४७ |
| ९ | तंबाखू | .... | .... | ५१ |
| १० | सॉक्रेटीस चुकला होता काय ? | | .... | ६७ |
| ११ | वादविवादांतील मौजा | .... | .... | ६५ |
| १२ | सिद्धींची भ्रामकता | .... | .... | ७३ |
| १३ | स्तुतीचें इंद्रधनुष्य | .... | .... | ८० |
| १४ | आर्यांचा ॲटम बॉंब | .... | .... | ८७ |
| १५ | नेत्रांची रमणीयता | .... | .... | ९५ |
| १६ | उदात्त रस | .... | .... | १०३ |
| १७ | मित्रभाव | .... | .... | १०८ |
| १८ | राखावी बहुतांचीं अंतरें ! | .... | .... | ११४ |
| १९ | पांडुरंग | .... | .... | १२० |
| २० | सत्कार्यांतील काव्यानंद | .... | .... | १२४ |
| २१ | जिवाची मुंबई ! | .... | .... | १२८ |

## ‘ प्रा. श्री. म. माटे, एम्. ए. यांचा अभिप्राय ’

“ ………… हे निबंध मला अत्यंत आवडले. हे फार सुंदर आहेत सुरस आहेत. आणखी शंभर पानें असतीं तरी मी याच बैठकीत वाचलीं असतीं, तुमच्या लेखनांतील सोपेपणा, सहजपणा, प्रांजलपणा, तर्कप्रवणता, भावनांचा मधुरपणा मनोज्ञ वाटला ……… निबंध वाचत असतांना तुमच्याशीं बोलत असण्याचेंच सुख झालें……… ”

माझ्या बहीण-भावंडांस

# शहाण्यांतील वेडे !

आमच्या गांवीं राहणाऱ्या एका थोर देशभक्ताचें एक फुप्फुस प्लूरसी झाल्यामुळें बंद करण्यांत आलें आहे. ते उत्कृष्ट वक्ते असल्यामुळें तासन्तास प्रभावशाली भाषणें करितात; आणि मग त्यांना अतिशय त्रास होतो. पण प्रसंग आला म्हणजे अन्तःस्फूर्ति त्यांना स्वस्थ बसूं देत नाहीं. एकदां मित्रमंडळींत एकजण म्हणाला, "यांना कांहीं दिवस वेड्याच्या इस्पितळांतच टाकलें पाहिजे !" त्यावर ते देशभक्त हंसून म्हणाले, "मला नेऊन कोठें टाकतां ? तेथेंच तर मी आहे ?" आणि खरेंच नाहींतरी; आपला देश पारतंत्र्यांत असतांना त्याची सतत तळमळ न वाटणाऱ्या लोकांना वेड्यांत काढलें तर तें कितीसें चूक होईल ? आणि यावरून माझ्या सहज मनांत आलें कीं वेड्यांच्या इस्पितळांत कोंडलेल्या वेड्यांच्यापेक्षां शहाणे म्हणून बाहेर जगांत वावरणाऱ्या वेड्यांची संख्या कितीतरी जास्त भरेल !

सतत गहन विषयांत गढलेले शास्त्रज्ञ किंवा जवळजवळ विदेहावस्थेस पावलेले योगी यांच्या वेडेपणाच्या कांहीं गोष्टी मोठ्या मनोरंजक वाटतात. न्यूटन काम करावयास बसला कीं, खोलीचें दार लावून घेत असे. त्याची एक आवडती मांजरी व तिचीं पिलें यांना त्याचा लळा असे. तीं दाराला धक्के देऊन त्याला त्रास देत. तेव्हां त्यानें योजिलें कीं, दार तर बंद ठेवायचें, पण मांजरांना येण्याजाण्यास सांपडावें म्हणून तेवढ्यापुरतीं भोकें पाडायचीं. सुताराला बोलावून न्यूटननें त्यास सांगितलें कीं, "मांजरीकरितां एक मोठें व पिलांकरितां एक लहान अशीं दोन भोकें या दारास पाडून दे !" सुतार हंसून म्हणाला, "महाराज ! एकच मोठें भोक पाडलें तर त्यांतूनच लहान पिलेंहि येणार नाहींत कां ?"

श्री. अण्णासाहेब पटवर्धनांच्या चरित्रांत अशीच एक गोष्ट आहे. एका गृहस्थांस येण्यास उशीर झाला, त्याचें कारण वाटेंत सायकल पंक्चर झाली, असें त्यानें सांगितलें. श्री. अण्णासाहेब म्हणतात, "मग काय झालें? सायकल तर धड होती ना! तसेंच तिच्यावर बसून यावें!"

या थोर पुरुषांच्या अगर प्रतिभासंपन्न कवींच्या चरित्रांत अशा विचित्रपणाच्या गोष्टी आढळतात हें खरें. पण त्यांच्या बाजूनें एक तरी समर्थन देण्याजोगें आहे कीं, फार मोठ्या ध्येयचिंतनांत वा प्रतिभासाधनांत ते गर्क झालेले असतात. तसेंच कवींची प्रतिभा हें वेड खरें, पण ती नेहमींच तर्कशास्त्राला धरून असते.

पण वेडेपणाचा हा मक्ता केवळ त्यांचाच नव्हे. सर्वसामान्य समंजस लोकांतही चकलेले मंत्रचळे पुष्कळ आढळतात. इतर ठिकाणीं उत्तम तर्कबुद्धि चालविणाऱ्या कांहीं लोकांना ज्योतिषाचें इतकें वेड असतें कीं, अमावास्या, व्यतिपात, यमघंट असेल त्या दिवशीं ते गांवास जाणार नाहींत; शनिवारी कामास सुरवात करणार नाहींत. एका बड्या हुद्देदाराची मुलगी तरुणपणीं विधवा झालेली होती. रिकामपणाच्या वेळीं ती बिचारी व्हरंड्यालगतच्या खोलींत बसे. हे ऑफिसमध्यें जावयास निघालें कीं यांना विधवादर्शन होई! प्रथम प्रथम ते एक गिरकी घेऊन चालू लागत व नंतर मागच्या दारानें जात. स्वरोदयाच्या मागें लागलेला माझा एक मित्र कांहीं काम करायचें झालें कीं, नाकाला दोन बोटें लावून कोणत्या नाकपुडींतून श्वास वाहतो आहे हें पाहत असतो. लहानपणाची मला एक गोष्ट आठवते ज्यूनिअर क्रिकेट टीममधील एक मुलगा बॅटिंग करतांना प्रत्येक ओव्हर खेळून झाली कीं टोपी काढून ती तोंडासमोर धरीत असे. मॅच संपल्यावर मी त्यास म्हटलें, "तुला टोपीचा त्रास होत होता तर काढून कां ठेवली नाहींस?"

तो म्हणाला " टोपींत कृष्णाचा फोटो आहे, त्यास मी नमस्कार करीत होतों ! " गुरूच्या मागें लागलेल्या कित्येक लोकांची हीच अवस्था असते. इतर व्यवहारांत ते चांगलेच हुशार असतात; पण गुरूचा प्रश्न आला कीं नांगी टाकलेल्या विंचवाप्रमाणें त्याची तर्क-बुद्धि कुंठित होते.

पेन्शन घ्यावयाच्या बेतांत आलेले माझे एक मित्र आहेत. ते बी. ए. ला अनेक वेळां बसून नापास झाले म्हणून नोकरींत शिरले. पेन्शन घेतल्यावर काय करावें असा त्यांनीं प्रश्न केल्यावर माझ्या बुद्धीप्रमाणें मी कांहीं व्यवसाय सांगितले व शेवटीं सहज विचारलें, "पण तुमच्या मनांत काय करावें असें वाटतें. ? " ते ह्मणाले, "खरं सांगू ? हंसूं मात्र नका ! अभ्यास करून एकदां बी. ए ला बसून पाहावें असें फार फार वाटतें ! " दुसऱ्या एका गृहस्थाची १५-२० वर्षें निरनिराळ्या खात्यांत नोकरी झालेली आहे. एकदां त्याची भेट झाली तेव्हां तो खिन्नच दिसला; बोलणें निघतां निघतां तो म्हणाला, "अजून असें वाटतें कीं, नोकरी कांहीं चांगली नाहीं. स्वतंत्र धंदा करावा हा माझा लहानपणापासून हेतु. पण या नाहीं त्या कारणानें तो साध्य झाला नाहीं. पण नोकरींत कधींच सुख लागलेलें नाहीं. माझ्या मनाची एकच रुखरुख आहे कीं नोकरी नको." या लोकांना काय म्हणावें ? मला गंमत वाटते ती ही कीं, इतर दृष्टीनें समंजस असणाऱ्या या सद्‍गृहस्थांना साध्या साध्या गोष्टी कशा कळत नाहींत !

घटकाभर हाहि वर्ग सोडला तरी नुसतीच मनोविकृति असलेले किती तरी लोक पाहण्यांत येतात. जॉन्सनच्या गोष्टी तर प्रसिद्धच आहेत. घड्याळांत किती वाजले हें त्यास पुनःपुन्हा पाहावेंसे वाटे ! दारांतून बाहेर जातांना पावलांची तीन किंवा काय ठरलेली पावलें असतील तींच पडलीं पाहिजेत. कमजास्त पडलीं तर तो पुन्हां

मागें येई व मनाप्रमाणें तो प्रयोग करी ! संत्र्यांची सालपटेंच विशांत ठेवून देई ! जॉन्सनचे अनुयायी पुष्कळच सांपडतात. माझा एक मित्र स्वतःच्याच विचारांत नेहमीं असा गर्क असे कीं, आम्हीं चारपांच जण गप्पा मारीत असतांना ही स्वारी पुष्कळदां आपल्याशीं बोले, हंसे व चुटक्याहि वाजवी ! फिरावयास जातांना याचें कांहीं स्वतंत्रच डोकें कुठें तरी चालत असे! आणि मग चाललेल्या विषयांतला प्रश्न विचारला म्हणजे झोपेंतून जागा झाल्यासारखा 'काय ?' म्हणून प्रश्न विचारी !

याहूनहि आणखी गमतीदार प्रकार पाहवयास मिळतात. रस्त्यानें एकटेंच जातांना स्वतःशींच बोलणारे—हंसणारे तुम्हीं पुष्कळ पाहिले असतील. इंग्रजींत ज्याला डे-ड्रीमिंग म्हणतात त्याचा छंद पुष्कळांच्या मनाला जडलेला असतो. एकटे असले कीं, हे लोक कांहीं तरी काल्पनिक प्रसंग कल्पून त्यांत आपण असें बोलतों आहोंत, अशी शाबासकी मिळविली, असें कांहीं तरी चित्तरंजन करीत असतात. अशा एका व्यक्तीकडून यासंबंधीं कांहीं माहिती मिळविण्याचा मी प्रयत्न केला. तो ह्मणाला, "व्यवहारांत जें सुख लाभत नाहीं, जे गुण आपल्याजवळ नसतात, त्यांचा उपभोग काल्पनिक प्रसंग कल्पून आह्मी घेत असतों. स्वप्नाप्रमाणेंच या कल्पनाविहाराचा उपयोग होतो. उदारणार्थ कांहीं वर्षांपूर्वीं आमच्या कॉलेजमध्यें सामन्यांचा बक्षिससमारंभ झाला. मला खेळांत प्रावीण्य नाहीं व कोटीबाजपणाहि नाहीं. हा सामना पाहून परत जातांना माझें कल्पनाचित्र सुरू झालें. मी पळण्याच्या शर्यतींत पाहिला आलों आहें; बक्षीस घेण्यासाठीं माझें नांव उच्चारलें; मी सावकाश निघालों; बक्षीस देणारे सन्मान्य पाहुणे म्हणाले, "तुम्ही धांवण्यांतले पटाईत ना ? मग धांवत कां नाहीं ?" मी ऐटींत म्हणालों, "बक्षिसासाठीं आम्ही धांवत नसतों." सर्वांनीं कौतुकानें टाळ्यावाज-

वल्या; इत्यादि." मला या अनुभवाची व मनाच्या खेळाची मोटी गंमत वाटली.

असे एक ना दोन अनेक प्रकारे मानसिक चाळे करणारे लोक समाजांत दृष्टीस पडतात. त्यांना वेडे ह्मणायचें नाहीं याचें कारण येवढेंच कीं, दिवसांतील बराचसा काळ ते सुबुद्धपणें वागतात.

पण वेड्यांतहि अशी एक जात आहे कीं, एका ठराविक विषयाची आठवण झाली कीं, त्यांचें वेड उसळतें बाकी ते चांगले शहाण्यासारखे वागतात. पुण्यास मी एका मित्राकडे जेवावयास गेलों असतांना स्वयंपाक मोठा चाविष्ट व मला आवडणारा असा तिखट झाला होता. त्यांचा स्वयंपाकी वाढत असतां मी सहज थट्टेनें म्हणालों, "हा पूर्वी मद्रासला होता वाटतें ? " चमत्कार असा कीं, तो स्वयंपाकी एकदम भडकला व एका स्त्रीचे सारखें नांव घेऊन कांहींच्या काहींच बोलूं लागला व थोड्या वेळानें घरांतून निघून गेला. ! मला मागाहून कळलें कीं, तो खरोखरच मद्रासला एका श्रीमंत गृहस्थाकडे आचारी होता; व तेथें यजमानाच्या सुंदर मुलीवर प्रेम बसून तो वेडा झाला होता. पुढें त्याचें वेड जाऊन येढ्यापुरतेंच शिल्लक उरलें होतें कीं, मद्रासचे नांव काढलें कीं, तो दोनतीन दिवस भडकत असे ! म्हणून मी ह्मणतों कीं, पुष्कळ काळ शहाणपणानें वागणें हें वेड अंगीं नसल्याचें हमखास लक्षण समजणें जरा धोक्याचेंच आहे !

पण तर्कशक्ति सर्वस्वीं गहाण ठेवून स्वत:चें स्वत:सहि समर्थन करतां येणार नाहीं, अशा हास्यास्पद गोष्टी करणें याला जर वेड म्हणावयाचें असेल, तर वेड्यांची खानेसुमारीच करण्याची पाळी येईल ! लोकभ्रमाचे बाबतींत शहाणे मूर्खांच अनुयायी बनतात. ( In superstition wise men follow fools ) अशी जी ह्मण आहे ती आपल्यापैकीं पुष्कळांना लागू पडेल. जगांत अशा वेड्यांची संख्या पुष्कळच आहे.

म्हणूनच जगत् हें भ्रममूल आहे असें म्हणतात कीं काय कोण जाणे !

आमचे देशभक्त मित्र "मी वेड्यांच्या इस्पितळांतच आहें !" असें म्हणाले ते कोटीबाजपणानें हें खरें. पण त्या स्वैर कथालापांत मोठेंच उपदेशामृत सांठविलेलें आहे यांत शंका नाहीं !

# अर्थशास्त्राच्या मर्यादा : २ :

पांडवांचा पक्ष न्यायाचा असतांना भीष्माचार्य शेवटपर्यंत कौरवांच्या बाजूस कां राहिले असा प्रश्न केला असतांना ' अर्थस्य पुरुषो दासः ' असें मोठें गंभीर व अर्थपूर्ण उत्तर त्यांनीं दिलें आहे. " मनुष्य हा पैशाचा गुलाम आहे; पैसा कोणाचाहि गुलाम नाहीं ! " या उद्‌गारांत भीष्माचार्यांनीं अर्थशास्त्राचा एक मूलभूत सिद्धांतच सांगून टाकाला आहे. या आधुनिक युगांतील भिन्न भिन्न नवमतवाद वाचले म्हणजे तर असें वाटतें कीं, आपल्या समाजाचा पायाच चुकीचा आहे. अर्थशास्त्राच्या आधारावर समाजरचना झाल्याशिवाय खरी प्रगति होणेंच शक्य नाहीं. सर्व रोगांचें मूळ बहुधा पोट असतें, त्याचप्रमाणें समाजांतील पुष्कळ दोषांचें मूळ दारिद्र्य आहे असें वाटायला लागतें. दारिद्र्य आणि मरण यांत मरण बरें आहे असें चारुदत्त म्हणतो तें कांहीं खोटें नाहीं. मी हायस्कूलमध्यें शिकत असतांना घडलेला एक प्रसंग मला अजून आठवतो. आमच्या एका विद्वान आणि सुशील शिक्षकांची पत्नी आजारी पडली. आणि बरेंच दिवसांच्या तिच्या आजारांत योग्य तीं औषधें विकत घेण्यास पैसा नव्हता म्हणून ती शेवटीं कालवश झाली. तिच्या मृत्यूपेक्षांहि या गोष्टीनें त्या निर्धन शिक्षकांना जें वारंवार दुःख होई तें खरोखर हृदयद्रावक होतें.

संपत्तीची निंदा करणें सोपें आहे. 'लक्ष्मीच्या धुंदीनें प्रत्यक्ष नारायणहि खुशाल विषारी शेषाच्या अंगावर झोंपतो तर इतरांची काय कथा,' अशा अर्थाचें काव्य करणेंहि सोपें आहे. तो काव्यरस पितां येत नसला तरी सुदैवानें त्याच्या निर्मितीला पैसा लागत नाहीं !

परंतु संपत्ति मारक त्याप्रमाणें तारकहि आहे. किंबहुना, आदर्श गृहलक्ष्मी मिळाली कीं संसारांत ज्याप्रमाणें नाना प्रकारचे मधुमधुर रस उत्पन्न होतात त्याप्रमाणें लक्ष्मीचें सहाय्य असलें कीं मनुष्याचें जीवन नाना अंगांनीं परिपूर्ण व यशस्वी होतें असें सहज दाखवून देतां येईल.

मला हें सगळें पटतें. कारण तें तर्कशुद्ध व कोणालाहि पटण्यासारखेंच आहे. पण संपत्तीबद्दल योग्य तो आदर मनांत बाळगूनहि अर्थशास्त्राला जीवनाचें तत्त्वज्ञान मानावें असें मला वाटत नाहीं. जीवनाची दृष्टीच अर्थ-शास्त्रीय बनविल्यानें त्यांतील सर्व काव्यच नष्ट होईल अशी भीति वाटते.

वकिलांचें उदाहरण पहा. मोर्ले साहेबांच्या पुस्तकांत वाचलेलें आठवतें कीं, मनुष्याच्या दुष्ट आणि भांडकुदळ स्वभावाचाच जन्मभर अभ्यास व सहवास घडल्यानें वकिलांच्या मनाचें उत्तर-आयुष्यांत अध:पतनच होतें. नित्याच्या व्यवहारांतहि कोठें दोष, अन्याय, आगळीक आढळली कीं तो चटकन् तिची किंमत पैशांत काढतो. ते दिले कीं सगळी नुकसान भरपाई झाली असें त्याला अगदीं प्रामाणिकपणें वाटतें. मानवी जीवन हें नफ्यातोट्याच्या उदाहणांचा एक संकीर्ण संग्रह आहे असेंच जणुं त्याला वाटतें. पण आयुष्यांत कित्येक अन्याय व आघात असें असतात कीं ते पैशानें कधींच भरून येणार नाहींत— निदान येऊं नयेत ! एकाद्या खालच्या वर्गांतील गरीब मनुष्याच्या स्त्रीची बेअब्रू झाली म्हणून पैसे देऊन आपसांत समजूत होऊं शकेल काय ? निरनिराळ्या फिर्यादी दाखल करण्यास कांहीं ठराविक मुदती मुदतीच्या कायद्यानें घातल्या आहेत. याचा आधार नित्याच्या व्यवहारांतलें कर्ज बुडविण्यासाठीं आपण घ्यावा काय ? साक्षिदारांत पुष्कळ लोक पैशाचा जोर जास्त पडेल तिकडे शपथेवर खोटी साक्ष देतात. उत्तर हिंदुस्तानांत तर “ सच्चे बोलो, ये कुछ अदालत

नहीं है " असें म्हणण्याची पद्धत आहे असें ऐकतों. पण यावरून प्रत्येक माणसास पैशानें जिंकतां येईल अगर जिंकण्याचा प्रयत्न करावा हें योग्य आहे काय ? " प्रत्येक अन्यायास कायद्यांत परिमार्जन आहे." ( Every wrong has its remedy ) असें कायद्यांत नुसतें तत्त्व आहे. पण कायद्यानेंच त्याचा व्यवहारिक अर्थहि ठरवून टाकला आहे कीं, ज्याचें परिमार्जन कायद्यानुसार करितां येईल तेवढेच अन्याय होत.

या विचारसरणीची उलट बाजू म्हणजे कोणतीहि उदात्त वस्तू अगर भावना यांची पैशांत किंमत निघूं शकते. आपल्या म्हाताऱ्या नोकरानें दोन पिढ्यांपासून आपली नोकरी केली आहे ना ? मग त्याला घरीं बसवतांना दोन महिन्याचा पगार जास्त द्यावा म्हणजे झालें ! या बाबतींत एक प्रसंग ऐकण्यासारखा आहे.

आमच्या वसतिगृहांत एक मुलगा विषमानें आजारी पडला असतां, खोलींतील एका उदात्त मित्रानें रात्रंदिवस जागून त्याची बहुमोल शुश्रूषा केली; आणि म्हणूनच केवळ तो वांचला. दूर गांवीं राहाणाऱ्या आपल्या वडिलांकडे तो हवा पालटण्यासाठीं नंतर गेला, तेव्हां त्यानें आपल्या मित्राची सहाजिकच खूप स्तुति केली असली पाहिजे. कांहीं दिवसांनीं आमच्या मित्राला त्याच्या वडिलांचें एक साधें आभार पत्र आलें. त्यांत एक शंभर रुपयांची नोट होती ! हा मित्र गरीब होता. त्याला चांगले रुपये शंभर दिल्यानें नांवें पडलेले त्याचे उपकार उडून खातें साफ झालें ! अर्थशास्त्राचा चष्मा लावल्यानें असा दृष्टिदोष उत्पन्न होतो. जीवितांतील कोणचीहि उदात्त गोष्ट अगर भावना घ्या. तिच्यापुढें आडव्या दोन रेघा मांडून तिचें पैशांत मूल्य निघतें. स्टेड या निर्धन परंतु तेजस्वी पुरुषश्रेष्ठाची या बाबतींतली वर्तणूक तर फारच बाणेदार व उद्‌बोधक आहे. एक कोट्यधीश

त्याचा जिविश्च कंठश्च मित्र होता. या मित्राला मूलबाळ नव्हतें. त्यानें मृत्यूपत्र करून इस्टेटीचा मोठा भाग आपला जिवलग मित्र स्टेड याला देऊन टाकला होता. पुढें बोअर युद्ध आलें. त्यावेळीं इंग्रजांच्या विरुद्ध वर्तमापत्रांतून कडाकड लिहून स्टेड यानें मोठीच झोड उठवली. या भांडवलदार मित्राची चुळबुळ सुरू झाली. त्यानें हलकें, जोरानें, नरमगरम सांगून पाहिलें, पण स्टेड ऐकेना. प्रथम या मित्रानें मृत्यूपत्र रद्द करण्याचा धाक घातला व शेवटीं तें रद्द केलें. पण त्या अलोट संपत्तीला क:पदार्थ समजून स्टेड यानें आपलें अंगीकृत व्रत तसेंच चालू ठेवलें. शेवटीं बोअर युद्ध संपलें; कांहीं दिवसांनीं त्या आठवणीहि बुजल्या. मग या मित्राला पश्चात्ताप झाला कीं, मित्रभावाची पैशांत किंमत करून आपण उगीच तो पणाला लावला ! मोठ्या अनुतापानें तो स्टेडकडे गेला व म्हणाला, " तुला पुन्हां माझी संपत्ती देतों चुकीची माफी कर. " पण स्टेडनें त्या कलंकित संपत्तीला स्पर्श करण्याचें नाकारलें ! " स्टेड स्कालरशिप " म्हणून विश्वविद्यालयांना मोठमोठ्या देणग्या देण्यांत त्या मित्राला त्या संपत्तीचा विनियोग करावा लागला.

म्हणून मी म्हणतों कीं, अर्थशास्त्राला मर्यादा आहेत. जीवनाच्या पवित्र मंदिरांत कांहीं एका ठराविक जागेपर्यंतच अर्थशास्त्राला प्रवेश करूं द्यावा. तें स्वयंपाक घरांत आणि देवघरांत शिरूं लागलें तर पूज्य, पवित्र, सोवळ्यांत असें उरणारच नाहीं. आईनें नऊ महिने पोटांत वागविल्याबद्दल योग्य तो मोबदला देऊन तिच्या ऋणांतून मुक्त झालोंसें वाटेल; बहिणीचें एकदां सुस्थळीं लग्न करून दिलें कीं, सासरचें तें आपलें तिचें खरेंखरें, तिचें नशीब तिच्याबरोबर, असें वाटायला लागेल. अर्थशास्त्राला जीविताचा आधारस्तंभ केल्यानें अर्थाचा असा अनर्थ होण्याचा संभव आहे.

मला या ठिकाणीं ‘ ला मिझरेबल ’ या कादंबरींतील एक सरस प्रसंग आठवतो. त्यांतील उपनायक मॉरिस याचें कोसेटी नांवाच्या मुलीवर प्रेम असतें. मॉरिस एका चाळींत रहात असतांना तेथील एका दरवडेखोराच्या मुलीचें प्रेम मॉरिसवर बसतें. तिचें नांव एपोनाईन. ती दरिद्री, अशिक्षित व चांगल्या संस्काराचा गंधहि नसलेली अशी असते. पण प्रेमामुळें तिच्यांत काय उदात्त परिवर्तन होतें तें पहाण्यासारखें आहे. एकदां मॉरिसला कोसेटीचा पत्ता सांपडत नाहीं म्हणून तो बेचैन होतो. दुरून त्याच्या मागावर असलेल्या एपोनाईनच्या हें लक्षांत येऊन ती त्याला भेटते व म्हणते, “ त्या मुलीचा पत्ता आणून देतें पण मी मागेन तें मला देशिल ? ” कामातुर झाल्यामुळें उदात्त व नाजूक भावनाविषयीं आंधळा झालेला मॉरिस ‘ हो ’ म्हणतो. आपल्या प्रियकराच्या चित्ताला समाधान लाभावें या निःस्वार्थी भावनेनें धडधडीत आपल्या सवतीचा पत्ता हुडकून एपोनाईन तो मॉरिसला आणून देते; आणि नंतर त्याला आपल्या वचनाची आठवण देते. हर्षानें बेहोष होऊन मॉरिस घाई करतो व बक्षिस म्हणून तिच्या हातावर कांहीं पैसे ठेवतो ! त्या कंगाल मुलीला एक वेळ अन्नाचीहि भ्रांत असेल; पण तिच्या प्रेमाची व औदार्याची मॉरिसनें अशी किंमत केलेली पाहून ती गहिंवरते; आणि उदक सोडून द्यावें त्याप्रमाणें ते पैसे रस्त्यांत फेकून देऊन ती येवढेंच म्हणते, “ मला तुझे पैसे नको होते ! ! ”

आयुष्यांत पैशाला अग्रपूजेचा मान दिल्यानें या मॉरिससारख्या चुका होण्याचा संभव असतो उपकार, प्रेम, त्याग या दिव्य भावना केवळ बिनमोल होत हें आपण विसरून जातो. यांचीहि आपण पैशांत किंमत करूं लागलों तर मानवी संस्कृति व प्रगति याला कांहीं अर्थच उरणार नाहीं. यांची फेड चिरंतन कृतज्ञतेशिवाय दुसऱ्या कशानें होणार ?

अर्थशास्त्रीय दृष्टि ठेवल्यानें पुष्कळ लोकांच्या आयुष्यांत दुसरीहि एक चूक होत असते. चांगल्या पगाराची जन्मभर नोकरी करून पेन्शन घेतल्यावर, वेळ जात नाहीं ह्मणून, पगार निम्मा झाला म्हणून हे लोक उतार वयांतहि आणखी नोकरी अगर उद्योग करून पैसेच मिळवीत राहातात. त्याचप्रमाणें दुसरे कित्येक जबर पगार मिळतो म्हणून कोठल्याकोठें भलतीकडे नोकरी करतात, व बायकापोरांना वर्षांनुवर्षें आपल्या गांवीं ठेवून देतात. पगार जास्त मिळतो म्हणून महिनेच्या महिने रोज प्रवास करणारेहि माझ्या पाहाण्यांत आहेत. गरीब संसाराची तोंडमिळवणी करण्यासाठीं खरोखर वरील पद्धतीनें काबाडकष्ट करीत असतील, त्यांच्याबद्दल मला कांहींच म्हणावयाचें नाहीं. त्यांच्याबद्दल कोणासहि सहानुभूतिच वाटेल. पण वस्तुतः गरज नसतांना वरील आयुष्यक्रम घालविणारे पुष्कळ सांपडतील. त्यांना असें विचारावेसें वाटतें कीं स्त्रीपुत्रांचें सहवाससुख, शरीराचें स्वास्थ्य, जीवनांतील इतर उद्योग व रस यांना कांहींच किंमत नाहीं कां? या सर्व गोष्टी पैशानें भरून येतात कां? पैसा हा अंतिम दृष्टीनें या गोष्टीसाठींच नाहीं कां?

पैसा नसावा असें कोणास वाटेल? संपत्तीचा अभिलाष अवश्य बाळगावा, पण अर्थशास्त्राच्या आहारी जाऊन कृतज्ञता, प्रेम इत्यादि उदात्त गुणांना आपण मुकणार असलों किंवा जीवनांतील वरील ध्येयभूत गोष्टींचा आपण बळी देणार असलों तर निर्धन राहिलेलें बरें असें खचित म्हटलें पाहिजे. पैशाला सर्वच गोष्टींची किंमत करूं देण्याऐवजीं पैशाचीच योग्य किंमत आपण काढावयास हवी. कांहीं ठराविक कक्षेंतील गोष्टीच्या बाबतींत आपण त्याचा अवश्य सल्ला घ्यावा. पण उदात्त अगर ध्येयभूत गोष्टींशीं संघर्ष आल्याबरोबर त्यांच्यावरून ओंवाळून टाकण्यापुरतीच पैशाची किंमत होय. तेथें पैसा

निर्माल्य समजावा. क्रोडो रुपये खर्चून शहाजहाननें ताजमहाल बांधला व प्रियतमेवरील आपल्या प्रेमाला चिरंतन मूर्त स्वरूप दिलें. यावर कवि काय म्हणतो पहा. " उदात्त प्रेमाचें देणें हें येथें दिलेलें आहे खरें, पण कुणी म्हणावं तें फिटलें ? " श्रीमंत दादासाहेब खापर्डे यांच्या ऐश्वर्याचें मर्म असें होतें कीं, खरोखर पैसा ही एक फेकून देण्याची वस्तु आहे अशीच त्यांची भावना असे. तसेंच पाहाल तर व्यावहारिक बाबतींतहि पैसा कधींच दगा देत नाहीं असें थोडेंच आहे ? जहांगीर बादशहा काश्मीरच्या रानांत चुकला त्यावेळीं त्यांच्या अंगावर रत्नजडित अलंकार होते. इतिहासकार सांगतात, तो ओरडत वणवण हिंडला कीं, " अरे ! कोणी ही सगळीं रत्नें घेऊन मला घांसभर अन्न द्या ! "

* * *

# " प्रीतीचे पाहुणे ! " : ३ :

'—प्रीतीचा पाहुणा झाला, म्हणून काय घरींच ठेवावा ?'

— श्रीएकनाथ

युद्धाचा ऐन जोर असतांना सरकारनें अशी सूचना दिली होती कीं, 'मोठ्या शहरांतून सक्तीचे पाहुणे ठेवण्याची पाळी येईल. तरी नागरिकांनीं प्रसंग ओळखून या बाबतींत सहकार्य करावें' ही कल्पना आपणांस जुलमाची वाटली. आणि खरेंच नाहीं तरी ! सक्तीनें घरांत घुसणाऱ्याला काय नांव द्यावें ? निदान तो पाहुणा नाहीं हें खास ! पण याप्रमाणें नागरिकत्वाच्या हक्काबद्दल जागरूक असणारे आपण, मराठी वाङ्मयांतील पाहुण्यांच्या बाबतींत पुष्कळच गैरसावध आहोंत अशी भीती वाटते. तेथें कांहीं प्रीतीचे पाहुणे उतरलेले दिसतात. सध्यां त्यांची बैठक उतरावयास दिलेल्या ओसरींतच आहे. पण ते हळुहळू माजघरांत कपडे काढूं लागले आहेत. आणि सुपारी, पाणी मागण्याच्या स्वाभाविक व निरुपद्रवी निमित्तानें ते स्वयंपाक घरांतहि मधून मधून डोकावतात. अजून ते जायची गोष्टहि काढीत नाहींत; व त्याबद्दल त्यांना घाईहि दिसत नाहीं. मनांतली गोष्ट, तुम्हांला म्हणून सांगायची म्हणजे मला त्यांचें लक्षण कांहीं ठीक दिसत नाहीं. आमच्या एका मित्राचें मूळगांव येथून वीस पंचवीस मैलांवर आहे. त्याच्या गांवचे कांहीं लोक पंढरपूरहून परत येतांना विश्रांतीसाठीं म्हणून आमच्या मित्राकडे उतरले. जेवणें झाल्यानंतर मोटारचीं तिकिटें काढण्यासाठीं ते गेले असतांना तिकीट देणारांशीं त्यांचा तंटा झाला. तो मागत होता तें यांच्या दृष्टीनें जास्त होतें. हे पाहुणे ऐटीनें त्यास म्हणतात " तुला काय वाटलें आम्हीं रानांत पडलों आहोंत ? अड-

वून पैसे उकळायला पहातोस काय ? तूं काय समजलास ? आम्हीं येथें आणखी आठ दिवस राहूं; पण तुला एक छदाम जास्त देणार नाहीं ! " मला ही हकीगत समजतांच मी त्या मोटारवाल्याकडे गेलों व त्याला म्हणालों " बाबा रे ! हे अजब प्राणी म्हणत असतील तेवढ्यांच पैशांत त्यांना तिकीटें दे; कमी पडणारे पैसे हे माझ्याजवळून घे ! पण माझ्या मित्राच्या घरून ही ब्याद लवकर बाहेर काढ ! " मराठी वाङ्मयातील प्रीतीच्या पाहुण्यांना अशी कांहीं तरी युक्ती करून वेळींच बाहेर न काढलें तर श्री एकनाथ महाराज म्हणतात त्याप्रमाणें त्यांना घरींच ठेवून येण्याची पाळी येईल याबद्दल संशय नको.

मासिकसाप्ताहिकांतून प्रसिद्ध होणाऱ्या बऱ्याच प्रेमविषयक लघुकथांचा हटभाजक काढावयाचा झाल्यास खालील उत्तर येईल. "रूपगुणकालासंपन्न स्त्री. तिचा पती ललितकलांशिवाय इतर कोणच्याहि उद्योगधंद्यांत नोकरीवर. त्याला अन्तःकरण बहुतेक असावें. कारण तें वाळवंटाप्रमाणें रुक्ष आहे हें सिद्ध होण्याची जरूरी असते. तो चांगला पैसेवाला असतो. संसारांतील बाह्य ऐषाराम त्याच्या घरीं नांदत असतात. पण तो नेहमीं आपल्या धंद्याच्याच भानगडींत व विचारांत गर्क असतो. आपल्या पत्नीला भावनात्मक व मृदु अंतरंग आहे हें त्याच्या गांवींहि नसतें. ती अशोकवनिता सीतेप्रमाणें दुर्मुखलेली दिसली तरी तिचें डोकें दुखत असेल यापेक्षां जास्त काव्यमय संशय या निर्बुद्ध इसमाच्या संकुचित मनांत स्फुरत नाहीं ! त्यामुळें लावण्यवतीच्या कुंकमतिलकविहीन मुखमंडलाप्रमाणें तें घर बाहेरून मनोहर पण आंतून केवळ उदास असतें ! ईश्वरानें निर्माण केलेल्या या चमत्कृति-प्रधान सृष्टीमधील विविध सुखोपभोग भोगीत असतांना जगाच्या त्या राजेश्वराची आपणांस चुकूनसुद्धा आठवणहि होत नाहीं,

म्हणून 'जगीं थोरला देव तो चोरिलासे,' अशी श्रीरामदासांची तक्रार आहे. या पतीच्या बाबतींत अशीच तक्रार जास्त जोरानें करतां येण्यासारखी आहे. गृहसौख्य आणि जगांतील मानपान यांचें यथेच्छ सेवन करीत असतांना या सर्वांना अधिष्ठान असणारें तिचें तें रसिक अन्तःकरण यांची त्याला दखलगिरीहि नसावी ही खरोखर लांछनास्पद गोष्ट होय !

जानव्याच्या गुंतागुंतीप्रमाणें पडलेला हा त्रिकट पेचप्रसंग सोडविण्यासाठीं मोठेंच व्यक्तिमत्व असलेला जबरदस्त महापुरुष हवा. याठिकाणीं कथानकक्षितिजावर प्रीतीच्या पाहुण्याचा उदय होतो. 'निरगांठ' या तंत्रावर अडलेलें कथानक 'उकल' या टप्प्यावर आणून सोडणें हें याचें अवतारकृत्य असतें. हा बहुदा नायकाचा परममित्र असतो किंवा नायिकेच्या माहेरचा कोणीसा नातलग असतो. ब्रम्ह जसें जवळहि आहे आणि दूरहि आहे त्याप्रमाणें तो म्हटलें तर जवळचा व तसेंच पाह्यचें झालें तर विवाहकायद्याची आडकाठी येणार नाहीं इतपच लांबचा असतो. श्रीज्ञानदेवांनीं सन्तांचें वर्णन केलें आहे तसा तो कठीण आणि कोंवळा दोन्हीहि असतो. किंबहुना तेथें दिलेली भृंगाची उपमा याला अनेक अर्थांनीं लागू पडणारी असल्यानें समर्पकहि आहे.

प्रतिकूल परिस्थितीचे कितीही आडवे दांड पडलेले असले तरी पोलादी गिरमिटाप्रमाणें त्यांचा लीलेनें भेद करून हा थेट कमलिनीपाशीं जाऊन पोहचतो. आणि एकदां कां कोंडला गेला म्हणजे जीव गुदमरून प्राण जाण्याची पाळी आली तरी त्या सुकुमार कमलदलांनीं थोडासाहि मृदु धक्का देण्याचें याच्या जिवावर येतें.

सुरवातीला घरांत शिरल्यावर हा कांहींवेळ खरोखरच पाहुण्यासारखा वागतो. संसाराची ती विस्कटलेली घडी नीट बसवावी असा याचा

उदात्त हेतु असतो. याला नायकाच्या बेफिकीरीचा सात्त्विक संताप येतो. नायिकेच्या केविलवाण्या मनःस्थितीनें याचे काळीज तुटतें व तिच्या निसर्गदत्त गुणांबद्दल शुद्ध कौतुक वाटते. नायकाला ताळयावर आणण्याचा हा कांहीं प्रयत्न करतो. पण लौकरच तो नाद सोडून मग नायिकेचें सांत्वन करण्याकडे दृष्टी वळवितो. याच्या आयुष्याच्या त्रिकोणाचा हा परमोच्च बिंदू होय. येथून याची घसरगुंडी सुरू होते. नायिकेच्या मनाचा होणारा कोंडमारा दूर व्हावा म्हणून याला तिच्याशीं तासन्‌तास बोलत बसावें लागतें. नायक हा आपल्याच कामांत गर्क असल्यानें अशा वेळीं नेहमींच बाहेर असतो हा कांहीं याचा दोष नव्हे. आणि तिन्हीसांजा झाल्या कीं त्यावेळीं व नंतर माणसाचें मन भारीच मरगळतें ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे. हा कवि असतोच हें न सांगतांच समजण्यासारखे आहे. नायिकेचें चित्तरंजन करण्यासाठीं तिच्या परिस्थितीला अनुकूल अशी इतरांची व स्वतःस स्फुरलेलीं काव्यें तो तिला वाचून दाखवितो. अशा तादात्म्याच्या एखाद्या दिव्यप्रसंगीं आत्म्यांच्या मीलनाचें विश्वरूपदर्शन दोघांना एकसमयावच्छेदेकरून घडतें. अर्जुन भ्यायला नसेल इतकीं तीं दोघें दचकतात. हें पाप तर नसेल नां ? अशा शंकेनें कांहीं दिवस असहकाराहि घडतो. पण आत्म्याची ओढच मोठी विलक्षण असते. पुन्हां तीं एकत्र येतात, आणि मग मात्र भावबंधनांत जगन्नाथपंडिताप्रमाणें तीं मनमोकळेपणा ठेवतात ! परस्परांच्या हितगुजांतून कांहीं मोकळा वेळ राहील त्यावेळीं समाज, धर्म, पुरुष, लग्नाच्या बेड्या इत्यादींवर हा पाहुणा कडक टीका करतो. अशा पद्धतीने एकंदर ही निरगांठ उकलण्यांत येते. शेवट कसा करायचा हें प्रत्येक कलावंताच्या मगदूरावर, मनःप्रकृतीवर व धैर्यावर अवलंबून असतें.

मी जो हा दृढभाजक काढला तो पुष्कळांना अतिरंजित वाटेल.

तसा तो असेलहि. पण ती अतिशयोक्ती सत्यावर अधिष्ठित आहे हें कबूल करावें लागेल. या प्रीतीच्या पाहुण्यांचें मूळ वसतिस्थान कोठें आहे यांचें संशोधन करतांना कांहीं म्हणतात कीं संस्कृत वाङ्मयांतील " पान्थकाव्य " म्हणून जो प्रकार आहे तेथून हा आला. "हे पांथा ! जरा थांब. तूं वैद्य आहेस कीं ज्योतिषी आहेस? माझी सासू आंधळी झालेली आहे व पति फार दिवसांपासून परदेशास गेला आहे. तेव्हां सासूला दृष्टी कशानें येईल अगर पति परत कधीं येईल तें कृपा करून घरांत येऊन सांगशील कां ? " अशा अर्थाचें पुष्कळ श्लोक संस्कृतांत आहेत हें खरें. पण ते स्फुट श्लोक असून मुख्यतः ध्वनीचें लक्षण सांगण्यासाठीं रचिलेलें आहेत. म्हणून प्रीतीच्या पाहुण्याचा त्या पांथाशीं कांहीं गोत्रसंबंध असावा असें मला वाटत नाहीं. माझा तर्क असा आहे कीं, " अस्ति पाश्चिमस्यां दिशि देवतात्मा." पाश्चिमात्य वाङ्मयांतील लघुकथांचें तंत्र इकडे आलें त्यावेळीं हेमाडपंताप्रमाणें हा इकडे आला असावा. हेमाडपन्ताची अशी गोष्ट सांगतात कीं एकदां एका शिवालयांत तो असतांना रावण तेथें देवदर्शनास आला. हेमाडपन्त भिऊन बेलाच्या निर्माल्याचा ढीग पडला होता त्यांत दडला. रावणानें प्रदक्षणा करतांना बेल डोक्यावर ठेवला. त्यांत हेमाडपन्त आला रावणाच्या डोक्यावर बसून स्वारी लंकेत गेली; तेथें पुढें मन्दोदरी बाईसाहेबांना दया येऊन त्यांनीं त्याला पतीकडून वर देवविला कीं " तूं कल्पनेसरशी अद्‌भुत देवळें उभारशील ! " व मग त्याला हिंदुस्थानांत पोहचविलें ! प्रीतीच्या पाहुण्यांचें असेंच प्रवासवर्णन आहे. पाश्चिमात्य वाङ्मयांतील लघुकथांचें तंत्र आणतांना सहाजिकच तिकडच्या उत्कृष्ट लघुकथांचे नमुने म्हणून भाषांतर, रूपांतर सुरू झालें. मध्यवर्ति कल्पनांची उसनवारी सुरू झाली. ही आयात झपाट्यानें सुरू असतांना कुठल्या-

तरी बोटीनें हे पाहुणे उतरलेले दिसतात. मोपासाँच्या एका लघुकथेची मध्यवर्ती कल्पना अशी आहे कीं, " एका घरंदाज श्रीमंत स्त्रीनें वारांगनांचे गवाक्षांत उभे राहून पांथांना पाचारण करण्याचें कला-कौशल्य पाहिलें. तिला तो सर्व प्रकार मोठा नवनवीन, अश्रुतपूर्व व काव्यमय वाटला. तिनें कुतूहलानें तो प्रयोग केला. आणि रस्त्या-वरचा सद्गृहस्थ वर आल्यावर ती विलक्षण घाबरली ! " ही लघुतम कथा लेखकानें मोठ्याच कलाकुसरीनें चित्रिलेली आहे. ती वाचून एकाद्या होतकरू लेखकाला ती रूपांतररित करून मराठी लघुकथेंत भर टाकून मराठी वाङ्मय समृद्ध करावें असें वाटणें सहाजिकच आहे. पण तें बरोबर मात्र नाहीं.

त्याचप्रमाणें सत्यदर्शन या मुद्यावरहि प्रीतीच्या पाहुण्यांच्या कथा समर्थनीय नाहींत. समाजांत असे प्रकार घडत असतील. पण गोष्टी खऱ्या म्हणून त्या वाङ्मयांत सांगण्यासारख्या असें कसें म्हणतां येईल ? " गोंडवनातील प्रियंवदा " या कादंबरींत ' भग्न देवालयाच्या परिसरांत ' हें एक प्रकरण आहे. त्यावर टीका करतांना श्री. वा. म. जोशी यांनीं प्रगट केलेले विचार लक्ष्यांत घेण्याजोगे आहेत. त्यांच्या म्हणण्याचा सारांश असा कीं " हरिभय्या व बाई हीं बैलगाडींत व देवळांत जें वर्तन करतात तसें समाजांत घडतहि असेल. पण तसें म्हणून तें कादंबरींत वर्णन करणें अयोग्य होय. त्यांतून तसें वर्णन करण्याची लेखकावर प्रसंगानुसार पाळीहि येईल. पण त्या प्रसंगीं त्याचा सूर स्पष्ट निषेधाचा असला पाहिजे. "

प्रीतीच्या पाहुण्यांची जात ही अशा प्रकारची आहे. ते घरांत आले कीं घटस्फोटाची नोटीस बजावणारा प्रोसेस-सर्व्हरच आला असें घरमालकानें निश्चित समजावें. मराठी वाङ्मयाच्या ललित मंदिरांत पुष्कळ दिवस पाहुणचार घेतल्यानें ते कांहींसे निगरगट्ट झाले

असण्याचाहि संभव आहे. आमच्या गांवांत एक श्रीमान व उदार गृहस्थ होता. पहीपाहुण्यांचा त्यांच्या घरीं नेहमी रगाडा असे. त्यांच्या घराला ‘ सरदार–गृह ’ असेंच म्हणत ! ‘ बायको माहेरीं गेली ’ ‘ बदलून आल्यामुळें अजून बिऱ्हाड केलें नाहीं ’ अशा सबबीवर महिना महिना त्यांच्या घरीं जेवणारें ९–१० जण रोज असत. आचाऱ्याला अर्थातच अशा पंक्तिपठाणांचा राग येई. मालक पंक्तीस नसला कीं तो आचारी त्यांच्या पानावर दुरूनच पोळ्या फेकीत असे. व जातांना पुटपुटे “ खा लेकहो ! तुमच्या बापानींच ठेवलं आहे ! ” पण हे मोठे विवेकी होते. ते म्हणत “ मालक नको म्हणत नाहीं तोंपर्यंत त्यांच्याकडे पाहून आम्हीं येथेंच जेवणार ! आम्हीं खाणावळींत गेलेले त्यांना अगदीं खपणार नाहीं ! ” म्हणून मी म्हणतों कीं या प्रीतीच्या पाहुण्यांना शब्दाच्या मारानें उपरती होणें कठीण. ‘सुदाम्याच्या पोह्यांत’ श्री. कोल्हटकरांनीं सुचविलेला उपाय मात्र लागू पडण्याचा पुष्कळ संभव आहे. एका साधूला दृष्टांत झाला कीं आपल्या भक्ताची बायको मागच्या जन्मींची आपली स्त्री होय ! हें त्या भक्ताला कळतांच तो गुरुमाउलीच्या दर्शनास गेला व हातांत पादत्राण घेऊन म्हणाला कीं “ हे सद्गुरो ! मला कालच रात्रीं दृष्टान्त झाला कीं हा पायपोस मागच्या जन्मीं आपलें पागोटें होता ! ”

## अपयशाचें यशोगीत ! : ४ :

एका गांवांत एक तमाशा आला होता. त्यांत ब्राह्मणांचीं, मारवाड्यांचीं बीभत्स सोंगें दाखवून टवाळी करीत असत. असे दोन खेळ झाल्यावर तिसऱ्या दिवशीं खेळाच्या पूर्वीं एक तासभर एका चौकावर कांहीं मंडळी जमली. सर्वांच्या अंगांत विशेष उत्साह दिसत होता. दोघातिघांनीं घट्ट कांचे मारून व फेटे बांधून हातांत लाठ्या घेतल्या होत्या. त्यांचा बेत ठरला होता कीं, तमाशांत जाऊन ओरडा करायचा व तो बंद पाडायचा. पण या कार्याचा नक्की निश्चय होत नव्हता असें दिसतें. एक म्हणाला, "जें काय करायचें तें पूर्णपणें नीट विचार करून करावयास हवें. तेथें एकदां गेल्यावर मग मागें पाय नको." दुसरा म्हणाला, "हें आपण पहिल्याच दिवशीं करावयास हवें होतें. दोन दिवस शिमगा होऊन गेला. आतां शिळ्या कढीला ऊत आणण्यांत काय अर्थ ?" तिसऱ्यानें तूट काढला कीं, गांवांतील एक शिष्ट होते त्यांचा सल्ला घ्यावा. निदान या प्रकरणांत आपल्यावर कांहीं प्रसंग आल्यास मागची सोय करण्याची जबाबदारी त्यांच्यावर टाकावी. झटकन् तो त्या शिष्टांकडे गेला व म्हणाला, "आम्हीं आज तमाशाला विरोध करण्याचा कृतनिश्चय केला आहे. आम्ही संतापून गेलों असून काय करूं व काय नाहीं याचा नेम नाहीं. तुम्हांला हें पसंत नसल्यास आम्हांस आवरा. पसंत असल्यास आम्ही निघालों. मागचें सर्व तुम्ही पाहून घ्या." तो शिष्ट मनुष्यस्वभावाचा मोठाच मर्मज्ञ होता. तो म्हणाला, "तुमचा उत्साह पाहून मी फार खूष झालों. तुम्ही अवश्य जा. मी मागचें सगळें पाहून घेतों." मग तो वीर पुन्हां चौकावर आला. तेथें पुन्हां एकदां

नीट आणि सांगोपांग विचार झाला; व शेवटीं सर्वानुमतें ठरलें कीं, ' आज तरी निदान कांहींच करूं नये. पाऊल टाकायचें तें जबाबदारीनें टाकलें पाहिजे. ' हा महत्त्वाचा निर्णय घेऊन ती मंडळी घरोघर गेली !

या लोकांना हंसावेसें मला वाटत नाहीं. कारण ते आपल्यापैकीं पुष्कळांचे प्रतिनिधी आहेत. एका दृष्टीनें तर मला त्यांचें अभिनंदनच करावेंसें वाटतें. कर्तृत्वाची काल्पनिक कां होईना, पण त्यांना हौस होती.

अतिविचार, सर्व बाजूंनीं विचार, हेंहि खरें आहे व तेंहि कांहीं फारसें चूक नाहीं अशा विचारसरणीचे पुष्कळ लोक आढळतात. " To know all is to forgive all. " सर्व अंगांनीं विचार केला कीं सगळें क्षम्यच वाटतें हें खरें. पण हा गुण कर्तृत्वास पूर्ण मारक ठरतो. मला पुष्कळदां असें वाटतें कीं, माणसास आयुष्यांत ढोंगीपणाबद्दल, कोणास श्रीमंतगरिबांच्या विषमतेबद्दल, इतरांस स्त्रियांच्या दुर्दशेबद्दल; पण प्रत्येकांस भोंवतालच्या जगांतील एखाद्या अन्यायाबद्दल मनापासून तिडीक हवी अशा चीड उत्पन्न झालेल्या पुरुषांच्या हातूनच महत्कार्य घडतें. शेक्सपीयरच्या ट्रॅजेडीज्मध्यें अतिविचार व कल्पना यांच्या दुःपरिणामाचें उत्तम चित्र पहावयास सांपडतें. कल्पनातरंगांवर वाहवणाऱ्या मोठमोठ्या पुरुषश्रेष्ठांचें जीवित दुःखमय होतें हा शेक्सपीयरला मनोमय पटलेला महाविचार होता.(The central drama of Shakespeare's mind was the tragedy of the life of immagination.) सर्वसामान्य लोकांतहि नाकर्तेपणा अंगीं येतो तो मुख्यत: भिडस्तपणामुळें व न्यूनगंडानें ! भाषण करायचें तर तें उत्तम वठलें पाहिजे, श्रोत्यांकडून मुळींच फजिती न झाली पाहिजे, इतरांपेक्षां कांहीं विशेष गुण चमकला पाहिजे, अशा विचारानें बऱ्यापैकीं वक्तृत्वकला

असणारे लोक मुळीं प्रारंभच करावयास टाळतात. असें भिऊन भिऊन त्याना बॅ. जयकरांसारखें वक्तृत्व कसें करतां येईल कोण जाणे ! त्यांना हें दिसत असतें कीं, नुसता धीटपणा असणारे पुष्कळ सामान्य लोक प्रसंग सांपडेल तेव्हां बोलतात. यांच्यापेक्षां आपण कितीतरी चांगलें बोलूं असें या भिडस्तांना नेहमीं वाटतें. पण यांचें एक ठरलेलें कीं, भाषण करायचें तें उत्कृष्ट वठलें पाहिजे ! चार जणांतहि हे बहुधा बिनबोलके असतात. यांची इच्छा अशी कीं, कोटी केली पाहिजे, सर्वांचें लक्ष वेधेल असें भाषण करतां आलें पाहिजे तें येत नाहीं म्हणून मौन हाच गुण ते प्रगट करतात. नुसतेंच रसिकपणें प्रसंग-विशेषीं हंसतात. यामुळें इतरांचा व यांचा समज होतो कीं, हे मोठे विद्वान् आहेत. झांकलेलें माणिक आहेत. मी एकदां एका सरकार-दरबारीं मान्यता असलेल्या गृहस्थांकडे शिफारस मागण्यास गेलों. ते म्हणाले, " मी प्रत्यक्षच तुमची शिफारस केली असती. पण साहे-बांच्यापाशीं आमचें वजन असतें तें अशानें कमी होतें ! " मला गंमत वाटली ती अशी कीं, जें वजन आहे तें केवळ फ्रेम करून लावण्यासाठींच कां !

यांतूनच एक गंमतीचा विचार सुचतो. न्यूनगंड असणाऱ्यांचा प्रामाणिक समज असा असतो कीं, ते फार विनयशील आहेत, स्वतः-कडे फारच कमीपणा घेत असतात. पण वस्तुस्थिति याच्या उलट आहे. न्यूनगंड हा अहंगंडाचीच उलटी बाजू आहे. माझी कोठें फजिती होतां कामा नये, उत्कृष्ट कर्तृत्वच मी दाखवीन. अपयशापेक्षां स्वस्थ बसण्यानेंच मी मूठ झांकलेली ठेवीन अशी आत्यन्तिक अहंभावाची बाधाच या प्रकारच्या लोकांना वस्तुतः झालेली असते. अपयशाची त्यांना मोठी भीति वाटते !

अपयशाला वाईट समजणाऱ्या लोकांची मला खरोखर कींव येते.

अहिल्याबाईच्या राज्यांत एक चोर पकडण्यासाठीं पुष्कळ यत्न होऊनहि सांपडेना म्हणून टीका होऊं लागली. तेव्हां त्या कर्तृत्वशाली राणीनें मोठें समर्पक उत्तर दिलें "चोर एकाच वाटेनें पळाला आहे. पण शोध सर्व वाटांचा करावा लागतो !" त्याचप्रमाणें यश ही वस्तु आहे. ती गांठण्यांसाठीं अनेक मार्गांनीं जावें लागेल; व ते सर्वच उपयुक्त होत. गौरीशंकराची टाळू शेवटी ज्यानें पाहिली तो खरोखर भाग्यवंत व यशवंत होय पण त्यापूर्वीं जाववेल तितकें जाऊन जे अपयश पत्करून परत फिरले त्यांनीं अपकीर्तीच मिळविली असें म्हणतां येईल कां ? यशाच्या उच्च मंदिरावर जाण्यासाठीं त्यांनीं अपयशाच्या पायऱ्या बांधून काढल्या असेंच म्हणणें जास्त खरें ठरेल. लोकमान्य टिळकांच्या एका आठवणींत त्यांचे असे उद्गार आहेत कीं, "अपयश माझ्या इतकें अंगवळणीं पडलें आहे कीं, मला अचानकपणें यश मिळालें तरच मला बावरल्यासारखें होईल !" श्री. केळकर यांनीं सार्वजनिक आयुष्यांत केलेल्या चुकांची यादी आपल्या समजुतीप्रमाणें श्री. बोडस यांनीं दिली. त्यांवर उत्तर देतांना श्री. केळकरांनीं कर्तृत्वाचें मर्मच सांगितलें आहे. ते म्हणतात, "केळकरांनीं पुष्कळ चुका केल्या असतील. सार्वजानिक कामाच्या नित्याच्या धबडग्यांत पडणाऱ्याच्या हातून त्या होतातच. पण कर्तृत्वशून्यपणें नुसते दोष दाखवीत बसण्यापेक्षां चुका करीत करीत कार्य करणाराच कर्तृत्ववान् होय."

असा विचार केला म्हणजे यशाच्या खालोखाल मिळविण्यासारखी कोणची गोष्ट असेल तर ती अपयशच होय हें उत्तमोत्तम पटतें !

* * *

# नास्तिकाच्या घरचा सत्यनारायण 

स्वतःला भोजनाचें आमंत्रण असलें कीं, सहकुटुंब जरी नाहीं, तरी सह परिवार जाण्याची कांहीं लोकांत प्रथा आहे. एखाद्या तरी मुलाला ते बरोबर घेऊन जातात. लहान मुलाला आगांतूक म्हणून कोणी समजतहि नाहींत; निदान परतून तर खासच लावीत नाहींत; मात्र मुलाला न्यायचें तर आपण बरोबर असावें हें बरें; कांहींजण काय करतात कीं, आमंत्रण येऊन आपल्याला जातां आलें नाहीं तर नगास नग म्हणून मुलाला एकटेंच पाठवून देतात. ते जरा धोक्याचें आहे. वऱ्हाडांतील जुन्या पिढींतले एक कोंकणस्थ शिक्षणतज्ज्ञ या बाबतींत जरा शिस्तीचे भोक्ते होते. त्यांच्या घरच्या एका कार्यप्रसंगीं पंक्तिमध्यें असाच एक बदली मुलगा बसलेला होता. त्याला पाहतांच त्याच्याजवळ जाऊन ते म्हणाले, "बाळ ! तुला बोलावलेलें नव्हतें. असें आगांतुक जेवायला जाणें वाईट आहे. हें लक्ष्यांत राहावें म्हणून तूं उठ व घरीं जाऊन जेव; मी उद्यां तुला मुद्दाम बोलावीन, तेव्हां निमंत्रित म्हणून ये!"

सुदैवानें आमच्या घरीं सहपरिवार अगर बदली जाण्याचा कुलाचार नव्हता. त्यामुळें लहानपणीं नकळत आगांतुक जाण्याचा प्रसंग माझ्यावर कधीं आला नाहीं. अवाचित वार करण्याचें कांहीं एक व्रत असतें म्हणतात. त्याच पालन असें कीं, चार महिने आठवड्यांतून एका ठराविक दिवशीं जेवायचे वेळीं एकदम दुसऱ्याच्या घरीं जाऊन 'दत्त,' म्हणून उभें राहायचें व तेथें जेवायचें ! अर्थात् हें व्रत यथासांग पार पाडण्यास नारायणाच्या कृपेबरोबरच इतक्या यजमानांच्या कृपेचीहि आवश्यकता असते ! कारण व्रताचे कष्ट करण्यापेक्षां ज्यांच्या घरीं तें

उरकलें जातें त्यांच्याकडे श्रमविभागाचा वाटा जरा जास्त दिलेला दिसतो. या व्रताचा संकल्प करण्याची अन्तःप्रेरणा मला अजून न झाल्यानें याहि पद्धतीचा आगांतुकपणा माझ्या हातून घडलेला नाहीं.

"मग मी कधींच आगांतुक जेवायला गेलेलों नाहीं ना?" असा कोणीं निर्णयात्मक प्रश्न विचारला तर 'नाहीं' असें स्वच्छ उत्तर मी कांहीं दिवसांपूर्वी देऊं शकलों असतों. पण आज माझी जीभ (संध्या लेखणी) जरा घोटाळते; कारण अगदींच आगांतुक नाहीं तरी आमंत्रण लावू देऊन भिडेखातर कां होईना, पण मुळींच ओळख नसलेल्या ठिकाणीं मी एकदां जेवलेलों आहे! सत्यनारायणाच्या प्रसादाचें भोजन कलें आहे! जेवून-खाऊन पुन्हां आगांतुक नव्हतों असें म्हणण्याचें दुर्धट पाप करणें कांहीं बरें नव्हे. तो प्रसंग असा:

कोर्टाच्या केससाठीं मी परगांवच्या एका मित्राकडे उतरलों होतों. संध्याकाळापर्यंत काम न संपल्यानें मला तेथें राहावें लागलें. संध्याकाळीं आम्ही फिरून परत येतांना मित्र म्हणाला, "मला आज रात्रीं एका मित्राकडे सत्यनारायणाच्या प्रसादाचें जेवायला जायचें होतें. पण मीं घरून निघतांच चिठ्ठी पाठवून दिली कीं, घरीं एक पाहुणा असल्यानें मला येतां येणार नाहीं." मी आश्चर्यचकित होऊन म्हणालों, "हें तूं कांहींतरीच केलेंस! तुझ्या घरीं मी जेवलों असतों. तुझ्या या चिठ्ठीचा परिणाम येवढाच होईल कीं, मलाहि सक्तीचें आमंत्रण येऊन बसेल." तो म्हणाला "येऊं दे रे! पाहूं तर खरें. ज्या मित्राकडे जायचे आहे ती मोठी अजब व्यक्ति आहे. एकदां तरी जरूर पाहण्यासारखी आहे. मोठा हुशार आणि बोलण्यांत फटकळ व विनोदी आहे. बिचारा पैशानें व संसारिक ओढीनें गांजलेला असल्यानें त्याच्या लायकीचें चीज झालेलें नाहीं त्यामुळें तो पक्का 'सिनिक'

बनलेला आहे." मी जास्त कांहींच बोललों नाहीं. मनांत आशा करीत होतों कीं, मलाहि नाइलाजानें आमंत्रण देण्याची दुर्बुद्धि त्या मित्राला न होवो! पण सत्यदेवाची इच्छा कांहीं निराळी होती. आम्ही घरीं येतांच "पाहुण्यांनाहि घेऊन अवश्य यावें" अशी चिठ्ठी आलेली टेबलावर दिसली मीं पुष्कळ आढेवेढे घेतले व पर्याय सुचविले. पण भिडस्तपणामुळें मला शेवटीं जावें लागलें. जेवावयास आणखीहि दोन-चार स्नेही होतें. यजमान मोठा गोष्टीवेल्हाळ होता. पाकसिद्धीबरोबर भाषणसाहित्यहि तोच एकटा पुरवीत होता. त्यामुळें मौन धरून व मधून मधून हंसून रसिक श्रोत्याची भूमिका वठविणें मला सोयीचें गेलें. जेवणाच्या सुरवातीसच माझा मित्र यजमानास म्हणाला, "तूं तर नास्तिक म्हणून मिरवतोस आणि हा सत्यनारायण कशाचा केलास?" यजमान ह्मणाला, "अरे, तुम्ही श्रीमंत असे बिलंदर आहांत कीं, तुम्ही देवालाहि तिजोरींत कोंडून ठेवलें आहे. त्याला आम्हां गरिबांकडे पाहायला फुरसतच नाहीं! या कलियुगांत देव बा-ला-जी म्हणजे बासुंदी, लाडू व जिलबी यांचा शॉर्ट फॉर्म झाला आहे! म्हणून विचार केला कीं, रवा, तूप, साखर, दूध, केळीं खाऊन तरी हा नवसाला पावणारा सत्यदेव आमच्याशीं खरा वागतो कां पाहावें! परवां फिरायला जातांना एक गंमत दिसली. एका हलवयाच्या दुकाना-वरून जातांना एका गाईनें त्याच्या धुळींत मांडलेल्या जिनसांत तोंड घातलें. त्या हलवायानें पाठलाग करीत तिला इतकें बदाबद मारलें कीं, विचारूं नका. गाईचा अपराध येवढाच कीं, ती बेटी भाव ठरविल्याशिवायच खाऊं लागली! तुमच्या देवाचें असें आहे. आधीं भाव ठरविल्याशिवाय तो हातीं घट्ट धरलेलें फळ सोडीत नाहीं. भाव कायम ठेवला पाहिजे!' म्हणून साधुसंत ने आपल्या

कानींकपाळीं ओरडत असतात त्यांतला भावार्थ हाच असला पाहिजे ! ''

आमच्यांत एक थिऑसॉफिस्ट होता. त्याचे कपडे तलम आणि अन्तःकरण मृदु होतें. या टीकेनें पाटीवर पेंन्सिल खरचटल्याप्रमाणें वाटून त्याला कसेंसेंच झाल्यासारखें दिसलें. तो म्हणाला, '' छे ! छे ! पूजेच्या दिवशीं तरी तूं ही नेहमींची अभद्र भाषा बोलूं नकोस ! शब्द काय अन् विचार काय, आपल्याला वाटतात तसे वायफळ व हवेंत विरून जाणारे नसतात. आसमंतात् त्यांच्या लहरी उठतात, त्या अविनाशी असतात आणि वर्तुलाकार न्यायानें बोलणारावरच पुन्हा आदळून बरा वाईट परिणाम करतात. तुझें आयुष्य दुर्दैवी आहे व तुझ्या गुणाचें चीज होत नाहीं याबद्दल आम्हां सर्वांनचा सहानुभूति वाटते. पण तूं कर्म ' थिअरी ' वाच; निदान मरणोत्तर जीवनाचा व आत्म्याच्या अमरत्वाचा मधून मधून तरी विचार करीत जा ! ''

यावर तो यजमान उसळून म्हणाला, '' मला तुमच्या थिऑसॉफिस्ट लोकांचा मोठा अचंबा वाटतो बुवा ! तुम्हीं जास्त लबाड आहां का जास्त अज्ञानी आहां याचेंच मला कोडें पडतें ! अरे या खडतर आयुष्याच्याच इतक्या जबाबदाऱ्या संभाळतां संभाळतां नाकी नऊ येतात कीं, मरणानन्तरच्या जीवनाच्या हवाल्याचा विचारच करायला वेळ कोणा लेकाला आहे ? पण तुमचें पाहावें तों मेल्यानंतरच्या जीवनांचीच तुम्हांला मोठी काळजी लागून गेलेली दिसते ! मग तुम्हीं आत्तांच कां मरत नाहीं ? तें कांहीं नाहीं. तुम्हीं लुच्चे दिसतां. थिऑसॉफी हें एक बांडगुळ आहे ! सोफिस्ट लोकांसारखी तुमची नुसती हातचलाखी चालू आहे. तुमच्या पंथांतले बहुतेक लोक श्रीमंत व पोटांतले पाणीहि न हालणारे आहेत. आम्हाला मात्र

मेल्यानन्तर सगळें ठीक होईल असे हवाले देत असतां ! " तो थिऑसॉफिस्ट असल्यानें रागावला नाहीं. तो शांतपणें म्हणाला, "थिऑसॉफीचाच राग येत असेल तर ती सोडून दे. पण हिंदुधर्मांतहि आत्म्याचें अमरत्व मानलेंच आहे ना ? "

पण यजमान जोरांतच होता. तो म्हणाला, " अमरत्वाची कल्पना मला मुळींच आकर्षक वाटत नाहीं. अमर राहून असलाच फेरा फिरायचा असला तर कायमचें मेलेलें बरें ! मृत्यूनन्तर ही कटकट आपल्या मागची निरंतर सुटणार आहे हा गोड संभवहि आमच्यापासून हिरावून घेण्याचें पाप तुम्हीं करीत असतां ! आणि वस्तूचा चांगुलपणा ती अमर असण्यांतच कां सांठविलेला असावा ? फुलांचें आयुष्य दोन घटकांचें असतें म्हणून कां तें सुंदर नाहीं ? तितक्या वेळ त्याचा आस्वाद घेण्यास कां अडचण पडावी ? आमचीं बायकापोरें आम्हाला फार प्रिय वाटतात आणि आम्हींहि त्यांना फार आवडतों. ' दोन दिवसांची माया ' या एकाच मुद्यावर त्यांच्याविषयीं उदासीनता कशाकरितां बाळगावी ? जिची पुरती कल्पनाहि करतां येत नाहीं असली कोठली तरी अमरत्वाची भूल आठवून मर्त्य परंतु तोंपर्यंत प्रत्यक्ष अशा सौन्दर्याचा व प्रेमाचा नीतिनियमानुसार मोठ्या रसिकतेनें व निःशंकतेनें आस्वाद कां घेऊं नये ? बरें, तुमची अमरत्वाची कल्पना पाहिली तरी कांहीं लोकविलक्षणच दिसते. 'मी ' म्हणून जो कांहीं अगदीं अन्तिम अर्थानें मला वाटतो तो अमर आहे कां असें विचारल्यावर तुम्ही म्हणतां तो 'अहंभाव' 'ईगो' 'व्यक्तिमत्व' जायला हवें ! आतां आणखी कुठें नाल्यांत जावें ! कांचन, कामिनीचा लोभ सोडा, माझें माझें वाटतें तो स्वार्थ सोडा, हें मी कबूल करीन. पण सध्यां आम्हाला जो 'मी' भाव वाटतो तोहि नश्वर अज्ञानजन्य व भ्रममूल आहे असें म्हटल्यावर 'अमर' 'अमर' जो आहे तो कोण हें कांहींच

लक्षांत येत नाहीं! ‘बहुतां दिवसां भेटले आपणांस आपण’ असें आम्हांस अजून कांहींच झालेलें नाहीं; मग या ‘मी’ ला खोटा ठरवून ज्याचें कधींच तोंड पाहिलें नाहीं असा आत्मा अमर आहे असा नुसता विचार जरी करूं लागलों तरी वेड लागायला लागलें आहे असा स्पष्ट इषारा मिळतो! अमरत्व अशी ही अजब तल्लफ आहे! सोमरस प्यायल्याशिवाय ती अंगांत येत नाहीं म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं!”

आमच्यांत एक वेदान्ती होता; तो हंसत म्हणाला, “तुझ्या या अशांततेवर व दुश्चितपणावर वेदान्त हेंच एक औषध आहे. तूं ज्ञानेश्वरीसारखा एखादा काव्यमय ग्रंथ वाचायला घे, मात्र नीट अर्थ लावून, शब्दाशब्दाची छाननी करून वाचन केलें पाहिजे!” या वेदान्त्यावर तर तो यजमान भारीच उसळला. तो म्हणाला, “मला एक वेळ थिऑसॉफिस्ट चालतील, पण तुम्हां शब्दपंडितांशीं माझें एक क्षण जमणार नाहीं! मला आजपर्यंत एकच वेदान्ती आढळला. त्याचें नांव आतां आठवत नाहीं, पण गाडगेबुवा, गोधडेबोवा, अशाच तऱ्हेचें कांहीं तरी होतें. एका गांवाला त्यांचें कीर्तन चालू असतांना मी सहज तेथें होतों म्हणून कीर्तनास गेलों. पाहिल्याच रांगेंत तहशीलदार बसले होते. त्यांचा सर्वच घेर गरगररीत होता. त्यांच्याकडे बोट करून बुवा म्हणतात, ‘पहा कसा तूप-पोळी भरून डेरा भरगच्च भरलेला आहे. समजा, हे उद्यां मेले तर यांना कोणी हिंगाच्या खड्यानेंहि पुसणार नाहीं; पण माझ्यासारखा भिकारडा मेला तर सगळें गांव जमा होईल! हा कशाचा परिणाम असावा? हें इंगित ज्याला कळलें त्याला सगळा वेदान्त उलगडला म्हणून समजावें!’

“असला पूर्वरंग भरून मग त्या बाबानें ज्ञानेश्वरीवर मोठें सुरेख प्रवचन दिलें. तें ऐकून त्या गांवच्या दोनचार वेदांत्यांना मोठेंच कुतूहल

उत्पन्न झालें. ते ज्ञानेश्वरीच्या निरनिराळ्या आवृत्त्या जमवून रोज वाचीत. त्यांतील शंका बुवांना विचाराव्या असें वाटून ते दुसऱ्या दिवशीं बुवांकडे गेले. ओळखीनें मीहि गेलों. त्यांनीं बुवांना प्रथमच सांगितलें कीं, ज्ञानेश्वरीचें तसें वाचन दोनतीनदां झालें आहें; पण कांहीं शब्दांच्या बाबतींत साखरेबुवा, त्र्यंकटस्वामी, कुंटे, भिडे यांची एकवाक्यता होत नसल्यानें कोणचा अर्थ सरस व बरोबर समजावा याविषयीं बुवाचे अधिकारवाणीनें मत हवें होतें. बुवा शांतपणें म्हणाले, ' ठीक आहे. स्तुत्य आहे. आधीं प्रारंभींच्या एक दोन ओव्या वाचा; ' ' श्रीगणेशायनम: ' अशी सुरवात करतांच ते म्हणाले, 'थांबा ! अर्थ नीट समजल्याशिवाय पुढें जाऊं नये. पहिलें अक्षर काय ? श्री. श्री म्हणजे काय ? लक्ष्मी. दुसरा अर्थ स्त्री; आतां चांभाराची श्री कोण सांगा बरं ! ' आम्ही सर्वजण तें समजून एकदम उद्गारलों 'गाढव !' बुवा म्हणाले, ' बरोबर आहे. शाबास ! आतां हीं तुमची पुस्तकें डोक्यावर घेऊन त्या गाढवावर बसून इथून चालते व्हा पाहूं ! ' यजमानाची ही गोष्ट ऐकून मंडळींत मोठाच हंशा पिकला.

शेवटीं एकजण त्याला म्हणाला, " तूं आपली पत्रिका नाहीं तर हात एखाद्या ज्योतिष्याला तरी दाखव ! म्हणजे तुझे ग्रह केंव्हां उच्चीचे होणार आहेत कां नाहीं हें तरी कळेल! " त्यावर यजमान त्याच्याकडे वळला. "ज्योतिषावर माझा मुळींच विश्वास नाहीं. भोंवतालची मंडळी पाहिली कीं मला तर कधीं कधीं वाटतें कां, ग्रह हे आकाशांत नसून पृथ्वीवरच वास करीत असावेत ! माझी पत्रिका मी केव्हांच फाडून टाकली. आतां हस्तरेषा दाखवायच्या म्हणशील तर ही पहा माझ्या हाताच्या मध्यभागीं क्रॉससारखी मोठी फुली आहे. याचा अर्थ असा आहे कीं, ब्रह्मदेवानें माझ्या आयुष्याचें गणित पहिल्यानें छान सोडवलें होतें. पण पुढें त्याला काय वाटले असेल कोण जाणें;त्या नें

सगळें चूक ठरवून त्यावर फुली मारलेली दिसते आहे." ज्योतिष सुचविणारा हंसून ह्मणाला, " तुझा नाहीं तर निदान कुटुंबाचा हात दाखव. पत्नीवरून पतीचेंहि कांहीं कळतें म्हणतात ! " यावर तो यजमान उत्तर देतो, "अरे ! ती दरिद्र्याची बायको; तिच्या हातांवर रेषा आहेतच कुठें दाखवायला ! जळकीं भांडीं घासून व पोतेरीं घालून तिच्या सर्व रेषा केव्हांच पुसटून गेल्या आहेत ! "

तो फटाकडा यजमान याप्रमाणें सारख्या लडीवर लडी उडवीत होता. गोफण घेऊन कठीण शब्दांच्या धोंड्यांनीं केशवसुतांनीं जशी दाणादाण उडवून दिली आहे, त्याप्रमाणें त्यानें त्या दिवशीं एकाहि मतपंथाच्या मूर्तीचें भंजन करण्याचें बाकी ठेवलें नाहीं. आमच्या कोर्टांत कोर्ट—फी लेबल, त्यावरील राजाचें डोकें पंच केल्याशिवाय उपयोगांत आलें असें धरीत नाहींत. तद्वत कोणचाही पंथ महा-विचार पुढें केला कीं, टीका करून त्याला मोडून काढणें एवढेंच तो जाणत होता. यजमान होता, स्वभाव माहीत होता किंवा बाव-दूक होता म्हणून म्हणा, पण मांजर कसेंहि पडलें तरी चार पायांवर उभें राहातें. तसा तो विजयीच ठरे ! अज्ञेयवाद्यांना किंवा नास्तिकांनाहि स्वतःच्या ह्मणून कांहीं श्रद्धा अगर मानबिंदु असतात. पण या अखिल जगांत पवित्र किंवा आदरणीय असें त्याला कांहींच नव्हतें ! तो होता त्या स्थितीत तरी कशाच्या बळावर जगत होता याचेंच मला आश्चर्य वाटलें. परमेश्वर कसा व कोठें असेल कोण जाणें ! पण याचेंहि रक्षण करतो यावरून कृपेचा सागर आणि करुणेचा जळधर खास असला पाहिजे अशी माझी त्या दिवशीं खात्री पटली.

जेवणें आटोपल्यावर परततांना नुसत्या चिठ्ठीवरून मी जेवायला आल्याबद्दल यजमानानें माझे आभार मानले व म्हणाला, " आमचीं ही रंगपंचमी नेहमींचीच आहे बरं का ! कांहीं विशेष सिरीअसली

घेऊं नका !" मी बोलायला भीत होतों. पण कांहींतरी बोललें पाहिजे म्हणून म्हणालों, "देवावर एकंदरींत तुमची बहुत खप्पा मर्जी झालेली दिसते !" तो उत्तरला, "अहो ! माझीच काय ! माझ्यासारखे हरिश्चंद्राचे बाप दुर्मिळ आहेत. नाहींतर पुष्कळांचाच देवावर मनांतून राग आहे. देव गुप्त कां राहातो याचें इंगित तुमच्या लक्षांत आलेलें दिसत नाहीं. मी सांगतों, तो गुप्त आहे म्हणूनच खरोखर आजवर बचावला आहे. नाहीं तर रोज बेटा एकाद्दुसऱ्याचे जोडे खाल्ल्याशिवाय खास रहाता ना !"

मी मित्राबरोबर घरीं परतलों तों जरा अस्वस्थच होतों. शाश्वत कल्पनांबद्दल, देवाबद्दल इतकें निंदाव्यंजक प्रवचन ऐकण्याचा तो माझा पहिलाच प्रसंग होता. तो प्रसंग आणि तें भाषण माझ्या मनांतून कांहीं केल्या जाईना. शेवटीं विचार केला कीं, सारांशरूपानें तो लिहून काढावा. लेखनाची ही मोठी कृपा आहे कीं, मनांत थैमान घालणाऱ्या कल्पना एकदां लिहून टाकल्या कीं अनायासें मनावेगळ्या होतात.

हें स्वभावचित्र वाचून मनुष्यस्वभावाचा प्रेक्षणीय नमुना म्हणून कोणाची करमणूक झाल्यास तो सत्यदेवाचा प्रसाद समजावा. आणि हें वाचण्याचा कंटाळा येत असेल त्यांनीं ते परिश्रम न घेतां एकदम लिफ्टप्रमाणें तळाशीं यावें. त्यांच्यासाठीं इसापाप्रमाणें एक तात्पर्य सांगून ठेवतों. कोणचेंही कारण असो, आगांतुक म्हणून जेवावयास कधीं जाऊं नये. त्याचे तोटे दीर्घपरिणामी असतात !

# दुःखाचें स्वरूपदर्शन : ६ :

भगवान् श्रीकृष्णांनीं सर्वांचा शेवटचा निरोप घेतला त्या वेळीं पांडवांना त्यांच्या त्यांच्या इच्छेनुसार वरप्रसाद दिला. या प्रसंगीं कुंतीनें मागितलेला वर लक्षांत ठेवण्यासारखा आहे. ती म्हणाली, "भगवन्ता ! मला सदैव विपत्तींत ठेव !" दुःखाचे इतर कितीहि तोटे असले तरी परमेश्वरस्मरणाचा लाभ करून देणारी ती भावना आहे, यामुळें कुंतीला दुःख ही विलोभनीय व मागून घेण्यासारखी गोष्ट वाटली. कांहीं योग्यांनींहि परमात्म्याजवळ अशी विचित्र प्रार्थना केली आहे कीं, 'मरणसमयीं आम्हांला अतिशय दुःखांत ठेव' सुखदुःखभावनांचें विश्लेषण करतांना त्यांना असें आढळून आलेलें दिसतें कीं, सुखाच्या परमावस्थेंत मनुष्य हा देहभान पूर्ण विसरून जातो. दुःखाचें तसें नाहीं. दुःखाच्या तीव्र दशेंतहि जाणीव कायम राहते व त्यामुळें परमेश्वराचें चिंतन शक्य होतें. आणि वेगळेपणानें दुःख पाहतां आल्यानें सूक्ष्म देहावर ते संस्कार कायम राहतात.

अशा प्रकारच्या गोष्टी ऐकल्या म्हणजे असें वाटायला लागतें कीं, सुखाची चव कळावी म्हणून दुःखाची जरूरी आहे असें दुःखाचें जें अभावरूपी वर्णन सामान्यतः करतात तें पुरेसें नव्हे तर ! दुःखाला स्वतःचें म्हणून कांहीं स्वतंत्र वैभव आहे. आणि 'दुःखादुद्विज्जते सर्वं सर्वस्य सुखमीप्सितम्' या न्यायानें सुखाचा कंटाळा करण्याची सर्वसामान्य जनरीत असली तर ती एकदेशीय व गतानुगतिकपणाचीच होय. स्वतंत्र विचाराचा व व्यापक दृष्टीचा अभाव गैरसमजुती व अज्ञान यांमुळेंच दुःखाचा बागुलबोवा आपण उभा केला आहे.

तसेंच पाहिलें तर सुख जवापाडें व दुःख पर्वताएवढें आहे हें

म्हणणें तरीं पूर्णांशानें खरें आहे कां ? सुख काय किंवा दुःख काय त्या त्या मनुष्याच्या मनाच्या व शरिराच्या विशिष्ट पातळीवर, परिस्थितीवर व संवयीवरहि अवलंबून आहे. नुसती भाकरी व पातळ वरण एका ताटांत वाढून पुढें ठेवलें तर श्रीमंताला त्यांतील एक घासहि जाणार नाहीं; पण तोच जर राजकीय चळवळींत चार–दोन वेळां तुरुंगांत जाऊन आलेला असला तर तेंच अन्न खाऊत त्याची भूक शमेल. त्याच्या डोळ्यांना व पोटाला तें नवीन नसतें. उलट एकाद्या रानगट मुलाच्या अंगाला सुवासिक तेलांचें मर्दन हळुवार हातानें केलें तर त्याचे ठिकाणी सुखभावना उत्पन्नच होणार नाहीं. तसेंच त्याला नाजुक फुलाचा अस्पष्ट व मधुर सुवास येणारच नाहीं. तें तें सुकुमार सुख अनुभवाइतकीं त्याचीं इंद्रियें तीव्र झालेलीं नसतात याचा अर्थच असा कीं, शारिरिक दुःखें जमेस धरूनहि दुःख ही वस्तु अशी अचल अशा स्वरूपांत जगांत रान माजल्यासारखी पसरली आहे ही आपली समजूत मुळांत खरी नाहीं. त्यांतली खरी गोष्ट अशी आहे कीं, दुःखें हीं आपणच सात्रणाच्या फुग्यासारखीं निर्माण करीत असतों. आपल्या मित्रपरिवारांत ‘ कुरकुरे ’ म्हणून जे प्रसिद्ध असतात, त्यांच्यावरून काय दिसतें ? इंग्रजींत त्यांना सिनिक किंवा पेस्सिमिस्ट असें भारतदस्त विशेषण आहे. पण लोकमान्यांनीं त्याचा पर्यायशब्द ‘ रडचे ’ हा उपयोजिला आहे ! कवींच्या चरित्रांत व काव्यांत हा गुण प्रकर्षानें पहावयास मिळतो. कै. श्री. पाटणकर नांवाच्या एका आधुनिक तरुण कवीच्या संग्राहास प्रस्तावना लिहितांना प्रा. माटे यांनीं या गुणांचें यथार्थ वर्णन केलें आहे. “ कांहीं व्यक्तींना विद्ध होऊन बसण्यांतच स्वाभाविक आनंद वाटतो. जगानें मजवर मोठाच अन्याय केला आहे. पण तो मुकाट्यानें सोशीत मी मनानें सती जाईन अशी कांहीं एक हतभागी-

पणाची अतएव दुर्बळपणाची भावना त्यांच्यांत दृष्टीस पडते," असा त्यांच्या म्हणण्याचा सारांश आहे. या काल्पनिक स्फुंदनांनीं काव्य-रचनेस काय मदत होत असेल तें कवीच सांगू शकतील. प्रत्यक्ष संसारांत किंवा परमार्थांतहि असल्या काल्पनिक दुःखांचा कांहींच उपयुक्त परिणाम घडत असेल असें वाटत नाहीं.

दुःखाची निर्मिती व विस्तार करणाऱ्या कल्पक कवींच्याप्रमाणेंच तत्त्वज्ञानांच्या कांहीं अभ्यासकांनाहि जगांत दुःख कां असावें याचेंच दुःख होतें. या त्यांच्या मूलगामी दुःखाचें परिमार्जन करण्यास अधि-कारी तत्त्वज्ञानीच हवा; पण त्यांची वाट दाखविणें शक्य आहे. श्रीमत् शंकराचार्यांनीं परमेश्वरावरील वैषम्यनैर्घृण्याचा दोष, जग हीच माया आहे, या सिद्धान्तानें खोडून काढला. श्री अरविंद घोष यांची विचारसरणी कांहीं निराळ्या पद्धतीची आहे. त्यांच्या मतें जग ही माया नसून सत्यच आहे आणि परमेश्वरस्वरूप आहे; व सर्वच जग ईशस्वरूप असल्यावर देव दुःख देतो ही द्वैताची भाषा चुकीची ठरते. फार तर आमच्या समजुतीनें जें दुःख तें तो स्वतःसच भोगावयास कां लावतो येवढेंच म्हणतां येईल. म्हणजे परमेश्वर हा विषमभाव उत्पन्न करणारा व निर्दय आहे, या शिव्या आपोआपच गळून पड-तात. थिऑसॉफिस्ट लोकांची विचाराची दिशा कांहीं निराळीच आहे. ते म्हणतात, दुःख हें निसर्गाचें एक शिक्षणसाधन आहे. मागच्या जन्मीं आपण कोणाचा विनाकारण डोळा फोडला असला तर या जन्मीं आपण एकाक्ष जन्मास येऊं. या जन्मभर त्या स्थितीचे हाल भोगल्यामुळें आपण तें पाप कधीं करणार नाहीं. भाऊबंदकी करून एकमेकांच्या जिवावर उठणाऱ्या भावांच्याबद्दल ते म्हणतात कीं, हे दोघे भाऊ मागच्या जन्मीं कट्टे शत्रु होते. त्यांच्या वैराचें टोंक हळूहळू बोथट करण्यासाठीं निसर्गानें त्यांच्यांत एकरक्ताचा संबंध उत्पन्न केला आहे!

परमार्थमार्गांतले ज्ञानी असेंहि सांगतात कीं, एकामागून एक दुःखें येऊं लागलीं तर तो सुयोग समजावा. पूर्वींच्या जन्मांतील संचित हें भोगल्याशिवाय संपत नाहीं. या जन्मांत जर परमार्थांत विशेष प्रगति झाली, तर तीं संचितें लवकर संपावीं म्हणून भराभर येऊं लागतात व साधक त्यांच्या ऋणांतून लवकर मुक्त होतो.

जगांतील दुःखाबद्दल विषाद मनणाऱ्या लोकांचा आक्षेप हा असावा असें वाटतें कीं, सज्जनांना दुःख कां व्हावें ? आम्ही दुर्जन राहूनहि दुःख नको असें कोणीच समंजस म्हणणार नाहीं. पण सदाचरण व दुःख एकत्र येऊंच शकत नाहींत हा युक्तिवाद बरोबर नाहीं. पण सर्व थोर व्यक्तींची चरित्रें पाहिलीं तर त्यांनीं दुःखें भोगलेलींच आहेत असें दिसतें. पांच पांडवांची मर्जी संपादन करावयाची असतांनाहि द्रौपदी हंसतमुख असते व आपल्या घरीं सदासर्वदा भांडणेंच सुरू असतात, असें कां असावें हा प्रश्न सोडविण्यासाठीं सत्यभामा द्रौपदीच्या घरीं बसावयास गेली असतांना “ भोगूनि सौख्य जगतीं सुखि कोण झाला । दुःखेंचि भोगुनि सती मिळवी सुखाला ॥ ” असा बहुमोलाचा उपदेश द्रौपदीनें केला आहे. द्रौपदी हें जें सुख म्हणते तें सदाचरणानें मिळतें यांत शंका नाहीं. शीलाचें रहस्य हेंच आहे. विपत्ति व दुःख यांना निर्जीव करण्याचें सामर्थ्य शीलानें अंगीं येतें !

दुःखाच्या उत्पत्तीचीं हीं कारणें दुःखहेतूचा शोध करणाऱ्यांना पटतात कीं नाहीं कोण जाणे ! मला सांगावेंसें वाटतें तें असें कीं, दुःख आहे ही जर निश्चित गोष्ट, तर तिच्या अनादि मूळाचा शोध करण्यांत दुःखित राहण्यापेक्षां दुःखाचें स्वरूपदर्शनाचा अभ्यास करून त्याचें रसग्रहण करणें जास्त श्रेयस्कर नाहीं का ?

दुःख हें सुखापेक्षां जास्त आहे, याप्रमाणेंच दुःख हें शाश्वत आहे

अशीहि गैरसमजूत पुष्कळ ठिकाणीं आढळतें. आमच्या येथील एक नामांकित वकील एक मोठा गमतीचा स्वानुभव सांगतात. ते म्हणतात, ' परगांवला केससाठीं मोटारीनें जात-येत असतां पुष्कळदां मोटारीचें कांहीं बिघडतें व तासनूतास आडरस्त्यांतच पडून रहावें लागतें. अशा वेळीं पुष्कळ प्रवासी चिडचिड करून निष्कारण मनस्ताप करून घेतात मी स्वस्थपणें एका झाडाखालीं जाऊन बसतों व मनाची समजूत करतों कीं, काळ हा न थांबतां चालला आहे. ही विपरीत परिस्थिति हळूहळू संपत आहे व संपेलच ! " काळाला दुष्ट म्हणून तुम्हीं कितीहि नावें ठेवा; दुःख हळुवार हातानें नंकळत हलकें करून शेवटीं तो तें स्मृतिमात्र करतो याबद्दल त्याला शतशः धन्यवादच दिले पाहिजेत. नवीनच वकील झालों त्यावेळीं एक साहेब मला उमेटपणानें बोलला. नवशिकेपणाच्या भित्रेपणामुळें म्हणा किंवा कितीहि झालें तरी साहेब होता म्हणून म्हणा, मी गप्प राहिलों. घरीं आल्यावर मात्र मी बेचैन होतों; व हें अपमानशल्य आपण कसें विसरणार याची मला चिंता पडली होती असें पक्कें स्मरतें. आठ दिवसांनीं त्याचा मागमूसहि राहिला नाहीं. त्यानंतर अनेक साहेबांशीं मीं पुष्कळच लढालढी केलेली आहे; व नरमगरम जखमा होऊनहि माझें अन्तःकरण आजच्या घटकेस चांगले मजबूत आहे. पण तो प्रसंग मला एखाद्या श्रुतिवचनाप्रमाणें उपकारक ठरलेला आहे. कधीं मनोव्यथा झाली कीं, सायकोत्रामप्रमाणें तो अनुभव मी उपयोजितों. आणि सर्वच दुःखांचें खरोखर असें आहे. आपण दुःख विसरतों ही कबुली देण्यांत निष्ठेला धक्का लागतो या समजुतीनें आपण ती गोष्ट कबूल करीत नाहीं.—आपणांस उघडपणें कबूल करावीशी वाटत नाहीं इतकेंच ! पतिनिधनाच्या तीव्र दुःखानें होरपळून आत्मघात करण्यास निघालेली स्त्री कालान्तरानें कन्यापुत्रांच्या संसारांत रममाण झालेली

दिसते. तिचें त्यावेळचें दुःख खोटें म्हणण्याचें पातक कोण करील? पण जगांतील सर्व वस्तूंप्रमाणें दुःखालाहि बदल व अन्त आहे हें सत्य कबूल केलेंच पाहिजे.

याप्रमाणें दुःख हें मनाच्या व शरिराच्या संस्कृतीवर व उन्नतीवर अवलंबून असतांना व कालानें नष्ट होणारें असतांना त्याचा बाऊ कशासाठीं करावा? परमार्थलालसेनें त्याचा वरप्रसाद मागावा कीं नाहीं हा ज्याचा त्याचा स्वतंत्र प्रश्न आहे पण संसारांतसुद्धां त्याची भीति बाळगूं नये व त्याबद्दल आणखी दुःख करूं नये येवढें खचीत म्हटलें पाहिजे. दुःख भोगण्याची पाळी आली ह्मणजे मनःशरिरावर जे चिरंतन सुपरिणाम होतात ते संसारिकांच्या अनुभवाचे आहेत. मला त्यांतील एक उल्लेखनीय वाटतो. श्री. विवेकानन्द हे श्री. रामकृष्णांचे निस्सीम भक्त होण्यापूर्वीं पराकाष्ठेचे तार्किक व संशयी होते. गुरूनीं त्यांची काय परीक्षा केली असेल ती असो; पण गुरूची अनेक प्रकारें व अनेकदां कसोटी पाहाणारा त्यांच्यासारखा शिष्य विरळा. रामकृष्णांनीं कनकावर खरोखरच विजय मिळविला असेल कां, हें पहाण्यासाठीं विवेकानन्दांनीं गुरु झोपेंत असतांना त्यांच्या हातावर एक रुपया ठेवला. त्या हातानें तो झिडकारून बाजूस फेकून दिला; पण श्रीरामकृष्ण गाढ झोपेंतच होते! तसेंच श्रीरामकृष्ण शांत झाल्यावर हे सदा म्हणत तसे खरोखरच परमेश्वरावतार होते कां असा श्री. विवेकानन्दांना विकल्प आला. त्यांनीं विचित्र तोड काढली कीं खूप दूरच्या भलत्याच संस्थानच्या राजानें त्या क्षणीं कलकत्त्यांत त्यांना भेटायचें आमंत्रण दिलें तर गुरूचें म्हणणें खरें समजावें. चमत्कार असा कीं, हा विचार पूर्ण संपण्यापूर्वींच बाहेरून निरोप आला कीं ते संस्थानिक कलकत्त्यास आले असून श्री. विवेकानन्दांची भेट घेऊं इच्छितात. या प्रसंगीं श्री. विवेकानन्दांच्या अंतःकरणांत उठलेला अनु-

तापाचा कल्लोळ केवळ अवर्णनीय होय. ते सांगतात, ' मी धांवत जाऊन श्रीशंकराच्या पिंडीवर मस्तक वारंवार आपटून घेतलें व त्यांतून रक्तधारा निघाल्यानंतर माझें कांहींसें समाधान झालें ! " मनुष्याच्या हातून कळत नकळत घडणाऱ्या पापांचें व चुकांचें परिमार्जन करण्यास व मनाची शांति परत मिळण्यास दुःखच्या उपभोगाइतकें दुसरें कोणचें उत्कृष्ट साधन सांपडूं शकेल ?

# " भीतीच्या रम्य कथा ! "                    : ७ :

आमच्या कॉलेजमध्यें एका स्नेहसंलनाच्या नाट्यप्रसंगीं एका विद्यार्थ्यानें राणा भीमदेवाचें वीरश्रीयुक्त भाषण ह्मणून दाखविलें होतें. जाहीर भाषण करण्याचा त्यांचा तो पहिलाच प्रसंग असावा. कारण उजवा हात उंचावून तो जोरजोरानें शौर्यवचनें म्हणत असतांना त्याचे पाय खालीं लटलट कांपत होते. भीति आणि वीर या दोन्ही रसांचा एकाच वेळीं विलास पाहून त्या दिवशीं थिएटरमध्यें मोठाच हास्यरस उत्पन्न झाला.

खरें बोलायचें म्हणजे स्वतःला धीट समजणें मला जरा जडच जाणार आहे. भित्रे व धीट असे दोनच ठळक विभाग पाडले तर मला वरच्या गटांतच सामील व्हावें लागेल. समाधानाची गोष्ट अशी कीं तेथें आपल्यातले पुष्कळच येण्याची खात्री असल्यानें त्या ठिकाणीं एकटेपणाचें भय मला खास वाटणार नाहीं. आहारनिद्रेप्रमाणें भय हा जर मानवधर्म आहे तर भीतीचा आणखी ओशाळेपणा कशाला धरावा ? पण युद्ध संपल्यावरच त्याच्या कथा रम्य वाटतात त्याप्रमाणें भीतिप्रसंग नसतांनाच त्याविषयीं मीमांसा करणें मोठें सोयीचें असतें ! त्यांतून, भीतीवर जाहीर भाषण करण्यापेक्षां घरीं बसून दुरून त्यावर लिहिणें तर फारच सोपें वाटतें. भीतिचें विवेचन केल्यास तेथेंहि वर्गवारी लागून भित्र्यांतील धीट असा कांहीं वर्ग निघण्याचाहि संभव आहे.

उदाहरणार्थ सापाची मला भीति वाटते, फिरायला जातांना कुठें दिसला तर रामरक्षेबरोबर तुकोबाचा अभंग आठवून त्या नारायणाला मी दुरूनच वंदन करतों. घरांतहि मारणारे कोणी असले म्हणजे मी

मदतनीसाची भूमिका घेतों. पण स्त्रिया व मुलेंच घरीं असतांना जेव्हां एकदां साप निघाला त्या वेळीं शेजाऱ्यास बोलावून आणावें आणि 'हे पहा, डोक्याच्या जवळ चांगला एक तडाखा द्या, डोक्याकडून ठेंचा' अशा युक्तीच्या चार गोष्टी सांगाव्या असें माझ्या मनांतसुद्धां आलें नाहीं; किंवा मांत्रिकास बोलावून मंतरलेली वाळू टाकून घ्यावी असेंहि वाटलें नाहीं. आमच्या एका धडधाकट गड्याला साप न मारण्याचा शंकराचा मंत्र होता; आणि एक शेजारी, नाग ब्राह्मण आहे या श्रद्धेनें त्याच्यावर हात उगावीत नसत. या दोन्ही दीक्षा घेण्याचा मोह मला कधीं झाला नाहीं. तसेंच दोन कुत्रीं अगर मुंगसें पिसाटल्यासारखीं रस्त्यांत भांडत असलीं तर लांबून निघून जाण्यास कांहींच हरकत नाहीं. पण एखादें लहान मूल भेदरून त्या ठिकाणीं अडकल्या सारखें झालें असल्यास त्याला न घेतां पळ काढणें अनुचित होय. स्वभाव भित्रा असणें व मनांतून भीति वाटणें साहजिक आहे. पण प्रसंग विशेषीं, कर्तव्यबुद्धीच्या जोरावर धीटपणा दाखविणें अशक्य नाहीं; किंबहुना माणुसकीच्या दृष्टीनें अवश्य आहे. काहींजणांचा भित्रेपणा तर हास्यापद असतो. एकदां आम्ही मित्रमंडळी घरचीं मुलें त्रास देतात म्हणून दारें लावून पत्ते खेळायला बसलों होतों. कसा आला कोणास ठाऊक पण जवळच साप निघाला. खिडकीजवळ बसलेल्या एका मित्रानें ताडकन खिडकींत उडी मारली व गजाच्या बाहेर आपले दोन्ही हात काढून तो उभा राहिला ! शरीराचा तेवढाच भाग निदान सुरक्षित राहिल असें त्यांस वाटलें कीं काय कोण जाणे !

येथें एक गंमतीचा विचार सुचतो. माझ्या एका मित्राचा रामदर्शनाचा नियम कडक असे. परगांवाहून येतांना मोटार नादुरुस्त झाली म्हणून आम्ही दोघे एकदां रात्रीं ११ ला परत आलों. तेव्हां

प्रथम राममंदिरांत जाऊन मग तो घरीं गेला. दुसऱ्या एका प्रसंगीं आम्हा दोघांनाहि सत्यनारायणाचें आमंत्रण होतें. पण फिरण्याच्या व गप्पांच्या नादांत आम्ही तें विसरलों. रात्रीं ९ वाजतां उशीर झाल्यानें परततांना आम्हांला आठवण झाली. तेव्हां माझा मित्र आधीं प्रसाद घेऊन मग घरीं गेला. त्याला सोबत असावी म्हणून मीहि त्याच्याबरोबर गेलों ! मी कधीं कधीं एकटाच विचार करीत बसलों कीं माझ्या आपलें मनांत येतें कीं या बाबतींत खंड पडूं नये अशी आपण जी काळजी घेतों त्यांचें कारण भीतीच नव्हे कां ? आणि देवावरील निष्ठेचा पाया 'भीति' असावा हें बरोबर आहे काय ? अशानें देवाला आपण जवळजवळ फौजदारच समजतों असें नाहीं कां ठरत ? गगनचुंबित नगराज, धीरगंभीर ध्वनि करून नभ आक्रमिणारे मेघ, विद्युल्लतांचें तांडवनृत्य, दारुण संताप देणारा अंशुमाली यांच्यामुळं गांगरून जाऊन त्या भयांतून देवाची कल्पना मानवजातीच्या पूर्वजांनीं काढली असेल; पण तेव्हांपासून लाभलेल्या ज्ञान व संस्कृतीनंतरहि आपण तीच भीतिची भावना मूलभूत ठेवली तर मानवजातीला सुदीर्घ जीवन दिल्याबद्दल देवाला पश्चाताप होईल यांत शंका नाहीं आणि अनंत कालाचा मालक असूनहि इतकी युगानयुगें फुकट गेलीं असेंच त्याला खास वाटेल. नम्रतापूर्वक वन्दन करून श्रीसत्यदेवाला असें सांगावेसें वाटतें कीं ती कन्या कलावती प्रसाद न घेतां पतिदर्शनाच्या उत्सुकतेनें समुद्रतीरावर गेली तेव्हां तिच्या नवऱ्याचें जहाज बुडलें; आणि चूक लक्षांत येतांच घरीं परतून प्रसाद ग्रहण करून पुन्हां जाऊन पहातें तों जहाज एखाद्या रत्नाप्रमाणें समुद्रांतून वर आलें ही कथा ऐकून आमच्या मनावर पडणारें दडपण कांहीं विशेष हितावह नाहीं. असा परिणाम उभयपक्षीं चांगला नाहीं. असल्या बडग्यानें देवाविषयीं उत्कट भाव कसा उत्पन्न होणार ? हा दंड-वाद

आणि हुकुमशाही यांत कितीसें अन्तर आहे ? परमेश्वरावरहि भीतीचें प्रेम करायचें तर मग प्रीतीचें प्रेम कोठें करावें ? श्रोतृवृन्द विद्वान् व अधिकारी असतांना त्यांना ज्ञानेश्वरी सांगण्याचें धाष्टर्य आपण कां करतों असा प्रश्न उपस्थित करून श्रोते हे बापासारखे प्रेमळ व कौतुक करणारे आहेत असें श्रीज्ञानेश्वरांनीं मोठें काव्यमय उत्तर दिलें आहे. ते विचारतात " येथेंहि सलगी करण्या भिवो। तरी निवो के पां ? " परमेश्वराच्या साधनेंत दासबोधांतील सख्य भक्ति व श्री तुकारामाच्या अभंगांत व्यक्त झालेली तळमळ व उत्कटता ध्येयभूत समजली पाहिजे. ' कबीर, क्या कहे जा जमुनाके तीर। एक गोपीके प्रेममे बह गये कोटि कबीर।' असे ज्यांच्याविषयीं कबीरानें धन्योद्गार काढले आहेत त्या गोपींचा केवळ प्रेमसंभवच देवाविषयीं धरावयास हवा. भीतीनें देवदर्शनास जाणाऱ्यांना भिऊन देवहि चार पावलें मागेंच हटत असावा. भेकडाचा पाठिराखा होण्याची दगदग तो करीत नाहीं. श्रमविभागाच्या तत्त्वानुसार भित्यापाठीं त्यानें ब्रह्मराक्षस लावून दिलेला आहे !

या एक दोन आणि इतरहि उदाहरणांवरून मला एक सर्वसामान्य सिद्धान्त काढावासा वाटतो तो असा कीं, जीवितांतील आकस्मिक घडामोडींबद्दल व साधारण धाडसाच्या प्रसंगाबद्दलहि आपण भारीच भीति बाळगतों. अशा वेळीं शहाणपणाची माघार घेण्याची प्रवृत्ति आपल्यांत फार दिसते. ' तुमच्यांत हें आहे आणि माझ्यांत नाहीं ' असें म्हणून नाहीं 'हें अज्ञजन हो !' असा प्रेषितपणाचा आव आणून मी संबोधीत नाहीं. ही माझ्या अन्तरंगांतील स्फुट गुणगुण आहे. आगगाडींतील डब्यांत न्याय्य अशी धक्काबुक्की करण्याचा प्रसंग आला असतांना आपण कटकट नको म्हणून माघार घेतों. आपले म्हणणें असें असतें, कीं ' कुठें मवाल्यांशीं मारामारी करा ?

त्यांना गमवायाचें कांहींच नसतें. आपल्याजवळ सामान असतें, खिशांत पैसे असतात. घालवायला वेळ नसतो. पुढें कामें अडलेलीं असतात. शिवाय फटकन् कुठें लागलें तर काय करतां ? घरीं बायकापोरें असतात. शेकडों जबाबदाऱ्या असतात. ' ही विचारसरणी चुकीची अगर हास्यास्पद आहे असें मी म्हणत नाहीं. आणि उठल्या सुटल्या मारामाऱ्या कराव्या असाहि माझा आग्रह नाहीं. मी अशा फंदांत पडल्याचें उदाहरण सध्यांतरी चटकन् आठवत नाहीं ! पण माझ्यानें येवढें म्हटल्यावांचून मात्र रहावत नाहीं कीं सारखें जपून जपून वागण्याचें हें धोरण आपल्या जीवनांत आपण अतिशयोक्तीनें वापरतों ! त्यांतली खरी गोष्ट अशी कीं अनेक वर्षें महान् बलवत्तर अशा राज्यसंस्थेच्या शीतल छायेखालीं अनेक बिनभानगडीचें सरळ चाकोरीचें आयुष्य घालविण्याची अनेक वर्षें संवय झाल्यानें येवढीशी कोठें गडबड अगर बदल झाला कीं आपण नाखूष होतों. असें असेल तर शांतपणाची अतएव भ्याडपणाची प्रवृत्ती हा गुलामगिरीचा सर्वांत मोठा तोटा समजला पाहिजे !

स्वतंत्र देशांतील पुरुषांची चरित्रें पहा. ' आपापलें हितगुज ' या पुस्तकांत बिस्मार्कच्या आत्मचरित्रांत वाचलेलें आठवतें कीं तो पन्नास वेळा घोड्यावरून पडला ! आणि एक दोनदां तर जबर दुखापत होऊन त्याला कांहीं काल स्मृतिभंशहि झाला ! लोकमान्यांविषयींहि एक आठवण आहे कीं ब्राह्मणेतर चळवळीच्या वेळीं विवक्षितस्थळीं ते निघाले असतांना त्यांच्यावर कोणी आघात करतील अशी शंका व्यक्त करतांच ते उद्गारले ' मारूं दे रे ! खुशाल मारू देत ! मी सत्कार्य करीत आहे ना ? मला कोण मारणार ? परमेश्वर माझें रक्षण करील ' ही मोठ्या पुरुषांचीं उदाहरणें आहेत हें खरें. पण स्वतंत्र देशांतील मध्यम पुरुषांच्याहि हकीगती वाचल्यावर व ऐकल्यावर एक गोष्ट चट-

कन् आपल्या मनांत भरते कीं जीविताविषयीं कांहींशीं बेगुमानपणाची, निदान बेफिकिरीची प्रवृत्ती त्यांच्यांत सर्वसाधारतः आढळते. जीवनाचा अर्थ त्यांनाच खरा कळला असें वाटायला लागते. तेंच खरे जगतात! जीवनाच्या चौकोनांत सुरेख बसविलेल्या वड्या थोड्याशा विस्काळित होऊं लागतांच प्रत्येक वेळीं आपण कचरूं लागलों तर आपलें उदंड आयुष्य भीतीची एक प्रदीर्घ रम्य कथा होऊन बसेल !

★ ★ ★

## " साधुसंतांच्या उपरती. " : ८ :

प्रसिद्ध इंग्रज कवी लॉंगफेलो याच्या ' Lives of great men all remind us; we can make our lives sublime. ( थोर पुरुषांच्या चरित्रापासून आपणहि असें होऊं असें उत्तेजन मिळतें ) या ओळी पुष्कळांनीं वाचल्या असतील. मला कांहीं त्या पटत नाहींत. तुम्हीं थोर पुरुषांचीं चरित्रें पहा. त्यांचें श्रेष्ठत्व जन्मजात असतें. त्यांचे गुण सहज व ईश्वरदत्त असतात. श्रीज्ञानेश्वरांनीं १८ व्या वर्षी ज्ञानेश्वरीसारखा लोकोत्तर ग्रंथ लिहिला यापासून काय बोध घ्यावा ? मारुतीनें बालपणींच सूर्यबिंबाकडे धांव घेतली तसेंच हें अद्‌भुत वाटत नाहीं कां ? स्वामी रामकृष्ण परमहंस, लो० टिळक, श्री. अप्पासाहेब पटवर्धन यांचीं चरित्रें, मला तर, आकाशांतील चांदण्याप्रमाणें केवळ आश्चर्यदायक वाटतात. अरबी भाषेंतील सुरस गोष्टीप्रमाणें त्यांच्या वाचनानें चित्तरंजन होतें; कांहीं उदात्त रसहि निर्माण होतो. पण अनुकरणात्मक बोध होत नाहीं. कल्पकतेचा आधार घेऊन आपली तुलना करूं लागलों तरी लगेच मनांत येतें ". कहां भोज राजा ! कोठें टिळक व कोठें आपण ! " टेनिसन कवीच्या " आइडील्स ऑफ किंग आर्थर " या काव्यांत आर्थरची पत्नी गिनिव्हीअर ही दाखविली आहे. तिचें स्वसमर्थन मोठें विचार करण्यासारखें आहे. ती म्हणते " आर्थर हा सूर्यासारखा देदीप्यमान वाटतो. त्याच्यांत मानवी, सहवास करण्यासारखें, समरस होता येईल असें कांहींच नाहीं ! " प्रतिभासंपन्न कवींचीहि गोष्ट अशीच आहे. त्यांचें अनुकरण काय करावें ? आपल्याला तर तें सुचत नाहींच; पण खुद्द कवींना विचारलें तर ते सुद्धां म्हणतील कीं

" आम्हांस स्फुरतें तें आम्ही लिहितों. कसें व कोठून स्फुरतें कोण जाणे ! " याच अर्थानें वेदांना श्रुति व ऋषींना द्रष्टे म्हणतात तें यथार्थ होय. विष्णुबुवा ब्रह्मचारी आत्मचरित्रांत लिहितात " अरे ! वादांत माझा पराभव कोण करूं शकणार ? मला दत्ताचा वर आहे ! " म्हणून असलीं हीं अद्वितीय व लोकोत्तर चरित्रें वाचलीं कीं ती लॉंगफेलो म्हणतो तशी उत्तेजनात्मक मला कधींच वाटत नाहींत. त्यापेक्षां मोरोपंताचे " वाटे चारित्र कांहीं आपण त्याचें तरावया गावें " हे उद्गार श्रद्धाळूपणाचे असले तरी जास्त प्रामाणिक व खरे वाटतात.

वरील विचारसरणी खरी असली तरी उदास व निराशाजनक आहे. आणि मग आणखी विचार करीत गेलें कीं थोडी निराळीं दिशा दिसते. सगळेच मोठे लोक जन्मतःच मोठे होते असें दिसत नाहीं. किंबहुना पूर्वार्धांत ते आपल्यासारखेच किंवा आपल्यापेक्षांहि वाईट होते. सर्वांच्या परिचयाचें वाल्या कोळ्याचेंच उदाहरण घ्यांना ! तुलसीदासाचा बाईलवेडेपणा तर सामान्य मनुष्यालाहि लाजविणारा होता; आणि भगवद्भक्तांचा राजा सूरदास हा तर धडधडीत परस्त्रीच्या अभिलाषेनें तिच्या मंदिरांत शिरला होता ! गौतमबुद्धाला तरुणपणीं रस्त्यावरून जातांना तें प्रेत दिसलें नसतें तर एखाद्या खुशालचेंडू संस्थानिकाप्रमाणें तो राज्योपभोगांत व विलासांत लोळत राहिला असता. व्हिक्टर ह्यूगोच्या ला मिझरेबलस् या कादंबरींतील नायक जॉन व्हॉल जॉन याचें चरित्र या दृष्टीनें फारच उद्बोधक आहे. चोरीबद्दल शिक्षा होऊन सुटून आल्यावर भुकेमुळें व आसऱ्यासाठीं तो वणवण हिंडला; पण त्याचा काळा शिक्का पहातांच जेथें गेला तेथून एखाद्या कुत्र्याप्रमाणें त्यास हाकून देण्यांत आलें. हा मनुष्य आपल्यापेक्षां श्रेष्ठ म्हणावा कां ? सुदैवानें तो एका धर्मोपदेशाकाकडे गेला. तेथें आसरा मिळाल्यावर निघून जातांना त्यानें चांदीचीं शामदानेंच चोरलीं ! त्यास

पकडल्यावर त्या उदात्त धर्मगुरूनें बचाव केला कीं " मी याला तीं बक्षीस दिलीं होतीं ! " जॉनचा हा उपरतीचा क्षण ठरला; व पुढें तो एक असामान्य पुरुषश्रेष्ठ व सन्त झाला ! वर उल्लेखिलेल्या सर्व श्रेष्ठ पुरुषांच्या चरित्रांत असे उपरतीचे क्षण आलेले आहेत. ते क्षण येण्यापूर्वी ते पुरुष सामान्य, किंबहुना व्यसनी व दुष्टहि होते. साधूंचें पूर्वायुष्य कलंकित असतें व पाप्यांचा भावी काल उज्ज्वलित होण्याचा संभव असतो ( Saints have a past and sinners have a future ) अशी जी इंग्रजींत म्हण आहे ती याच कोटींतल्या लोकांची होय. असे हे उपरती झालेले साधुसंत मला जवळचे वाटतात. त्यांच्याबद्दल मला फार जिव्हाळा वाटतो. त्यांच्या चरित्रवाचनानें लाँगफेलो म्हणतो तसें उत्तेजन खचित मिळतें; मनांत येतें कीं अमक्यालाच व अमक्याच वयांत उपरती होते असें थोडेंच आहे ? रामदासांना बालपणीं, बुद्धाला तरुणपणीं तर वाल्मीकींना म्हातारपणीं ती झाली ! ६० वर्षांचा होईपर्यंत अब्राहम लिंकन हा कोणाला माहीत सुद्धां नव्हता !

मात्र एक गोष्ट लक्ष्यांत घ्यावयास हवी. या उपरतीवाल्या साधुसंतांच्या अंगीं पूर्वायुष्यांत कांहीं गुण नसले अथवा दुर्गुण असले, तरी एक असामान्य गुण त्या सर्वांमध्यें होता. तो म्हणजे भावनांची प्रखर उत्कटता ! मोरोपंत खर्डेघाशा असेल; पण एक पैची चूक सांपडेपर्यंत त्यास झोंप येत नसे हें विसरतां कामा नये. बायकोकरितां कां होईना; पण तुलसीदासाला सापाऐवजीं दोरी दिसण्याइतकी तन्मयता उत्पन्न झाली होती. उपरतीचें खरें मर्म हेंच आहे. तन्मयता केंद्रित झाली कीं, सूर्यकिरणापासून कापसांत निघतो, तसा उपरतीचा स्फुल्लिंग तिच्यांतून निघतो. हेच साधुपुरुष पुढें मनमोकळेपणानें सांगतात " परमेश्वर पापाला भीत नाहीं. तो पापाचे डोंगरच्या

डोंगर नष्ट करितो. परमेश्वरापुढें पाप काय टिकेल ? त्याला चीड फक्त एकाच गोष्टीची, ती म्हणजे वंचकता ! " हे उद्गार ऐकले कीं माझ्या-सारख्या सामान्य मनुष्याला फार बरें वाटतें. मला तर असें म्हणा-वेसें वाटतें कीं, असल्या साधूंच्या पुढील उज्ज्वल चरित्रापेक्षां त्यांचें पूर्वचरित्रच जास्त उपकारक होय. उत्कटता, तन्मयता व उपरतीचा क्षण सामान्य मनुष्याच्या चारित्रांत येऊं शकतो हा केवढा उत्ते-जनाचा आदेश त्यापासून मिळतो !

यांतूनच आणखी एक गमतीचा विचार सुचतो. मानवी देह धारण करून अवतार घेण्यांत परमेश्वराचा हाही एक प्रमुख उद्देश असावा. इंद्र वज्रानें मेघांना वडवतो व शंकरानें तृतीय नेत्र उघडून मदनाला भस्म केलें या कथांनीं देवाचें देवत्व तेवढें सिद्ध होतें. पण गर्भवास पत्करून, मानवी देह धारण करून व चारचौघांसारखें संसारिक सुख-दुःख भोगून अवताररूपानें परमेश्वर हाच संदेश देतो कीं दैवी ऐश्वर्य हें मानवांतहि प्रगट होऊं शकतें ! म्हणूनच रावणानें सीता चोरून नेल्याबरोबर श्रीरामचन्द्रानें रावणाला मदनाप्रमाणें भस्म केलें नाहीं. त्यानें विलाप केला, मदत मिळविली, रावणाचा पराभव केला ! आणि श्रीकृष्णानें सामान्य शिष्याप्रमाणें, लोकविडंबनार्थ, सांदीपनी गुरूकडे विद्याभ्यास केला व त्यांची सेवा केली !

## तंबाखू



परवां आमच्या घरीं मंत्रजागराचा पाठ म्हणण्यासाठीं आलेल्या भटजींनीं एकापेक्षां एक खड्या स्वरांत आपला सूर चढविला तेव्हां, त्या नादाचें कौतुक वाटण्याऐवजीं मला दुसऱ्याच एका गोष्टीची गंमत वाटली. ते वेदपाठक स्वर चढवितांना उजव्या हाताचा अंगठा व त्याजवळचें बोट जुळवून तो हात समोर धरीत; व खुलल्यारखी मुद्रा करून मधून मधून तो हलवीतहि. कापसांतून धागा धरून तो लांबवत न्यावा त्याचप्रमाणें काढलेला सूर या आविर्भावाच्या सहाय्यानें ते उंच उंच नेत. मंत्रजागर संपल्यावर मी विचारलें, " गायकाला सांथीचा तसा तुम्हाला या हस्तन्यासाचा उपयोग होत असेल नाहीं ?" त्यावर एकानें उत्तर दिलें. "गायनाचें तंत्र काय असेल तें असो, श्रीगणनायकाचें ध्यान असें असतें म्हणून आम्ही मंत्रजागर म्हणतांना तसा हस्तविक्षेप करतों " या उत्तरानें माझ्या मनांत नवीनच विचार सुरू झाले.खरंच ! श्रीवेदमूर्तिं गजाननाच्या मूर्तीचा उजवा हात अशाच पद्धतीनें वर उचललेला पुष्कळ चित्रांत दिसतो. याचे मर्म काय असावें ? पुराणवस्तुसंशोधनाची विद्या मला अवगत नाहीं. पण कल्पनाच लढवावयाची तर श्रीमूर्तीकडे पाहून मला वाटतें, श्रीगणराय हा तंबाखू खात असावा; व सुग्रास मोदकाचें व यथेच्छ भोजन झाल्यावर तांबूल भक्षण करून प्रसन्नचित्तानें तम्बाखूची चिमूट वर उचलून तिच्या आस्वादानें होणाऱ्या आनन्दाचें कल्पनाचित्र रंगविण्यांत दंग असावा. आणि ज्या चित्रकारानें गणेशाच्या या प्रसन्न मनःस्थितीची निवड आपल्या चित्रासाठीं प्रथम केली त्याच्या सूक्ष्म निरीक्षणाचें व कल्पकतेचें जेवढें कौतुक करावें तेवढें थोडचें

होईल! मला तर खात्री वाटते कीं, तो चित्रकारहि तम्बाखू भक्त असावा; आणि श्रीगणराय हा बुद्धीचा जनक आहे यावरून तर माझा तर्क जास्तच सुप्रतिष्ठित ठरतो.

हा बुद्धिवाद लढविण्याची मला इच्छा झाली, याचें कारण तंबाखूच होय. आणि पन्तांनी संशयरत्नमालेंत म्हटल्याप्रमाणें, 'कीं मागें गुप्त उभा असासि प्रेमें उभारुनी बाहे' अशी तिची पाठराखणीची तऱ्हा नसून, हा लेख लिहित असतांना अगदीं समोर मुखांत रससोय करून ती मोठ्या कौतुकानें व अभिमानानें या भक्ताच्या स्तुतिकीर्तीगायनाचा आस्वाद घेत आहे! हो, या कैफियतीचें कारण असें घडलें कीं येथील एका तऱ्हेवाईक डॉक्टरांच्या सल्ल्यावरून आमच्या मंडळांतील दोन तीन सभासदांनीं तंबाखू सोडून दिल्याच्या शपथा घेतल्या; आणि वेळींच कडक उपाय न योजल्यास ही सांथ फैलावण्याची धास्ती आहे! तम्बाखूनें शरीरप्रकृतीवर फार अनिष्ट परिणाम होतो, पचन बिघडतें व दांत खराब होऊन किडतात हें पुराण मी इतक्यांदा व इतक्या ठिकाणीं ऐकलें आहे कीं, सतत दहा वर्षे तम्बाखूचें मनसोक्त सेवन करूनहि माझे दांत किडण्याऐवजीं कानच किटले आहेत! पुण्यांतील एक प्रसिद्ध दंतवैद्य तर दातांची कीड वगैरे रोग घालविण्यासाठीं तम्बाखूची चिमूट दातांत धरण्यास सांगतात! मग आपली प्रॅक्टिस वाढावी म्हणून त्यांनीं हा धंदा सुरू केला असेल, अशी टीका करावयाची असल्यास उपाय नाहीं! तम्बाखूनें दांत खराब होतात या ह्मणण्याचें मला हंसूच येतें. आणि टीका करणारा दंतवैद्य असेल तर माझे दांत खराब झाले नसूनहि ते दाखवावेसे व काढावेसे वाटतात! दांत आणखी पुष्कळ गोष्टींनीं खराब होतात. किंबहुना निसर्गतःच ते घाण होतात. जेवून रात्रीं नुसतें निजलें कीं सकाळीं दांत खराब होतात म्हणून झोप

सोडावी काय ? आणि इतर पुष्कळ गोष्टींनीं ते घाण झाल्यावर जर आपण त्यांना स्वच्छ करतों, तर तम्बाखू खाल्ल्यावरच ते घाण रहाण्याचें काय कारण ? या ठिकाणीं मला प्रसिद्ध डॉ. ग. कृ. गर्दे यांची एक आख्यायिका आठवते. त्यांना अशाच एका विचित्र गृहस्थानें प्रश्न केला " डॉक्टर, सारखी तंबाखू खाल्ल्यानें मनुष्याचें आयुष्य किती कमी होतें ? " ते म्हणाले " चार वर्षें ! " तो न समजून उद्गारला " म्हणजे ? " त्यांनीं उत्तर दिलें म्हणजे काय ? " तो शंभर वर्षें जगणार असला तर ९६ व्या वर्षीं मरेल ! " गेल्या पिढीच्या एका नामांकित डॉक्टरचें हें सर्टिफिकेट पाहिल्यावर डॉक्टरांनीं व भोळया भाबड्या भीतिग्रस्तांनीं तंबाखूच्या दुष्परिणामांचा ध्यास व धास्ती सोडून द्यावी हें श्रेयस्कर नव्हे काय ?

अन्वयव्यतिरेकन्यायानें तम्बाखूचे सुपरिणाम पाहिले तर ते तिच्या-इतकेच मिष्ट आहेत. तिच्या प्रत्यक्ष संचाराचा साक्षात्कार मुखांत होत असला तरी कायावाचामनसेंद्रियाच्या पलीकडे नैतिक व अध्यात्मिक क्षेत्रावरहि तिची दृष्टि असते असें सप्रमाण सिद्ध करून देतां येईल. वाचाळपणा या दुर्गुणावर तर तिच्यासारखें रामबाण औषध सांपडणें कठीण ! आमच्या बाररूममध्यें एक दोन वाचस्पती असे होते कीं, ते हजर असतांना वर्तमानपत्र वाचणें किंवा इतर गप्पा मारणें अशक्य होऊन बसे. एकदां तम्बाखूचा रसास्वाद घेत असतांनाच मला इलाज सुचला. त्या वाग्भटांना मी आमच्या मंडळाची दीक्षा दिली. थोड्यांच दिवसांत त्यांची सरबत्ती सुरू होण्याचें तर राहोच; पण कामाच्या वेळींहि ते बोलेनासे झाले ! जरा निवांत वेळ मिळाला कीं बार भरून कोणी मध्येंच बोलायला लावण्याचें संकट आणील म्हणून ते कोपऱ्यांत जाऊन वर्तमानपत्रें वाचण्याचें सोंग करून दीर्घकाल बसूं लागले !

महात्मा गांधींनीं मौनाचा अभ्यास कसा केला व वाचेवर जय

कसा मिळविला याची माहिती त्यांच्या आत्मचरित्रांत नाहीं. परंतु मौनासिद्धीच्या खडतर व्रताला तम्बाखूसारखी उपकारक दुसरी कोणतीच साधना सांपडणार नाहीं. तम्बाखूचे बार वारंवार भरीत असलें म्हणजे, आपण होऊन बोलण्याचें तर राहोच; पण बोलणें भाग पडलें म्हणजे मोठा राग येतो या अनुभवाची प्रतीति यापेक्षां जास्त वर्णन करणें अशक्य आहे !

आणि मौनसंपादनाबरोबरच दुसऱ्या एका नामांकित कलेचा अभ्यास न कळत होत असतो. ती म्हणजे ॲक्टिंग. म्हणून सर्व उत्तमोत्तम नट नाट्यदेवीचे भक्त होण्यापूर्वी तंबाखूचे परमभक्त असले पाहिजेत असा माझा निश्चित तर्क आहे. आंकडेशास्त्राच्या अभ्यासकांनीं या दृष्टीनें नटांचीं चरित्रें जरूर पडताळून पहावींत. मनांतील विचार व्यक्त करतांना त्याबरोबर अंगविक्षेप कोणते करावे हें मनानें ठरविण्यापेक्षां प्रत्यक्ष अनुभवानें ठरविणें कितीतरी जास्त उपयुक्त आहे. त्यांतून मूक चित्रपटांतील नटांना तर भाषेचा सर्वच आशय हावभावांतूनच व्यक्त करावा लागतो; तंबाखूभक्त हा थोड्यांच दिवसांत मूकपटांतील उत्कृष्ट नट अगदीं सहजगत्या तयार होतो. त्याला प्रथम कांहीं दिवस अडचण पडते. पण संवयीनें कितीहि सूक्ष्म व गुतांगुतीचे भावप्रदर्शन करावयाचा प्रसंग आला तरी त्याला हावभावांची अडचण पडत नाहीं. मुखांतील रसाच्या अधिकाधिक उत्कर्षासरसें ते त्याला सहज स्फुरतात. कांहीं अरसिकांना शंका येईल कीं ते इतरेजनांना कसे कळत असतील ? त्यांना नसेल कां फार अडचण वाटत ? या शंकेवर शाब्दिक वाद घालण्यापेक्षां मुकाट्यानें मूकचित्रपटाकडे अंगुलिनिर्देश करावा हें बरें. आणि यानेंहि समाधान न झाल्यास मी अशांना प्रेमिकांचा सल्ला घेण्यास सांगेन. ते मोठ्या काव्यमय व पटणाऱ्या भाषेंत सांगतील कीं, भाषा हें भावप्रदर्शनाचें फारच ओबडधोबड व्यक्त साधन होय. भावांचें

यथायोग्य प्रदर्शन करण्याऐवजीं अवगुंठण किंवा विपरीतदर्शन करण्याचेंच पाप भाषेच्या हातून पुष्कळदां घडतें. हावभावांतील ध्वनिकाव्य परमरंजक असतें. भावव्यक्तीकरणास हावभावांसारखें सोयीचें व्यंग्यसाधन सांपडणार नाहीं !

दीर्घकाळ तंबाखू सेवन केल्यानें शरिरावर व रक्तावरहि मोठे अद्भुत परिणाम घडत असतात. नीलकंठानें हालाहल पचविल्यामुळेंच तो चिरंजीव झाला आहे ! तंबाखूचें विनाशक द्रव्य एकदां रक्तांत भिनल्यावर साधेसुधे रोग तर राहोतच; पण विंचवाचें विषहि चढत नाहीं अशी ग्वाही अनेक तंबाखूभक्त देतील ! कुत्र्याचें विषहि अपाय करीत नाहीं कीं काय याविषयीं मला निश्चित पुरावा मिळालेला नाहीं. मागें एकदां एका वर्तमानपत्रांत वाचलेलें आठवते कीं, एका निःसीम तंबाखूभक्ताला एक कुत्रा एकदम येऊन डसल्यावरहि त्या माणसाला कांहींच इजा न होतां कुत्राच कांहींसा वेड्यासारखा करूं लागला ! पण वर्तमानपत्रांत पुष्कळ थापाच येत असतात अशी माझी खात्री असल्यानें ही गोष्ट खरी घडलेली असेल असें वाटत नाहीं.

पण विंचू व साधारण विषारी सर्प यांच्यापासून निर्भयता प्राप्त होते ही गोष्ट निश्चित आहे. पूर्वी मद्रासच्या राजाजींच्या बंदिशाळेंत सर्प निघाला व तो त्यांनीं मारला या बातमीवर टीका करतांना हिंदुसभेंतील एक राव म्हणाला, " या निर्भेळ अहिंसावाद्यांनीं जबर तंबाखू खाण्याची तरी संवय ठेवावी, म्हणजे बिचारे सर्प-विंचवांच्या व अहिंसाचक्राच्या तडाख्यांतून तरी सुटतील ! " यांतील विनोदाचे रसग्रहण करून मी म्हणालों, " तुझा विनोद मला फार आवडला. कारण तो एका सत्यतत्त्वावर अधिष्ठित आहे ! " आणि खरेंच ! एकदां सर्प, विंचू इत्यादि विषारी जीवांच्या व आपल्या शरीरांतील ईशतत्त्व एकच

करून टाकलें म्हणजे तुकोबाचा सल्ला न जुमानतां त्या नारायणांना जवळूनहि वंदन करण्यांत भय कसलें !

आणखी असें कीं, नफातोट्याच्या बेरीजवजाबाकीनेंच जगाच्या व्यवहारांत नेहमीं इष्टानिष्टता ठरत नसते. आम्हांला सुपारीचे सुद्धां व्यसन नाहीं असें अभिमानानें सांगणारे व या अभावरूपी गुणाचाच गौरव करणारे कांहीं विचित्र प्राणी भूमंडलावर आहेत हे खरें. पण त्यांच्या अस्तित्वामुळें वसुंधरेला बहुरत्ना हें विशेषण परमार्थाने लागूं पडतें इतकेंच म्हणतां येईल. धांवत्या गाड्यांला किंवा इंजिनला तेल, त्याप्रमाणें व्यवहाराच्या जिकिरींत त्रस्त झालेल्या मनाला लहान लहान व्यसने श्रमपरिहारक व पुनर्नवता देणारीं असतात. कांहीं गुणकारी औषधें पोटांतून घेण्यास व बाहेरूनही लावण्यास अशी द्विविध उपयुक्त असतात. तशीं हीं व्यसनें एकाकीपणांत कालहरण करण्यास तर उपयोगी पडतातच; पण अनोळखी लोकांशीं समानशीलत्वाचे सख्य जोडण्यासहि यांचे बहुमोल साहाय्य होतें.याचा अनुभव प्रवासांत अनेकदां येतो. आगगाडीच्या डब्यांत शेजारी बसलेल्या प्रवाशानें चंची मांडीवर सोडून विडा खाण्यास प्रारंभ केला कीं, एखादा तंबाखूभक्त अगदीं अबोल व मनुष्यबाणा असला तरी त्या शेजाऱ्याशीं मैत्री करण्याचा मोह त्याला आवरणें कठीण जाते. आणि तंबाखूचे व्यसन हे विशेषत: श्रमजीवी, दलितवर्ग, हरिजन, भूमिजन इत्यादिकांमध्यें अधिक प्रमाणांत असल्यानें लोक-लगटीच्या या काळांत तर तंबाखूवर बहिष्कार घालणें राष्ट्रीय ऐक्य, समता, बंधुत्व वगैरे वगैरे मोठमोठ्या दृष्टींनीं अत्यंत हानिकारक आहे हें उघड आहे.

माझ्या मित्रसंघांत कसलेंच व्यसन नसणारे कांहीं महाभाग आहेत. त्या पुण्यश्लोकांना नांवें ठेवूं लागलों कीं, ते मला शेपटी तुटलेल्या कोल्ह्याची उपमा देतात ! पण त्या टीकेचा मला विषाद

वाटत नाहीं. कारण मरहूम इसापाच्या प्राचीन काळापासून आपल्या बुद्धिमत्तेबद्दल प्रसिद्ध असलेल्या, त्या चतुर प्राण्याचे उपनांवच माझा मुद्दा सिद्ध करण्यास उपयोगीं पडतें. या आत्यन्तिक निर्व्यसनी लोकांविरुद्ध माझी तक्रार ही असते कीं, ते बहुधा माणूसघाणे असतात; विनाकारणच गंभीर मुद्रा सदैव ते धारण करतात; आणि बिचाऱ्या केशवसुताला साऱ्या विषयांत मोठा आशय कधींकाळीं एकदां सांपडला पण यांना ते तिन्हीत्रिकाळ ढेकणांसारखे सांपडतच असतात. जणूं ते भूमीपासून फूटभर उंच असून त्याच वातावरणांत संचार करतात. आणि वाईट वाटतें तें हें कीं, इतकेंहि करून ते बहुधा निर्बुद्धच असतात. माझ्या मतें याचें कारण असें असावें कीं, बुद्धि ही देखील कामिनीप्रमाणें बाल, तरुण व वृद्धावस्था या दशेंतून जात असावी. आणि त्या त्या काळांत तिला ते ते रसिकतेचे रस घेण्याची आवड असावी. चोवीस तास गूढगूढ विषयांत व आचरणांत बुद्धीला कोंडल्यावर ती वृद्धाकुमारी होणार नाहीं तर काय होईल ?

तंबाखू, तपकीर, सिगरेट यांच्या सेवनानें बुद्धि उत्तेजित होऊन रसिक बनते. मोठमोठ्या कलावंतांची या प्रकरणांत साक्ष घेण्यासारखी आहे. वॉल्टर रॅले तर तंबाखूचा जनकच आहे, तेव्हां त्याचे पितृहृदय तिच्यासाठीं कळवळेल यांत नवल नाहीं. पण एका इंग्रज कवीला त्याच्या मॅगी नामक प्रेयसीनें अनुमोदनाच्या बद्दल सिगरेट सोडून देण्याची अट घातली; सकाळपासून सायंकाळपर्यंत कसा तरी मनोनिग्रह करून त्यानें अखेर सिगारेट पेटविली; व तिच्या धूम्रवलयांत एक सुंदर कविता करून आपल्या प्रेयसीस उत्तरादाखल खुशाल पाठवून दिली. त्या कवितेच्या शेवटच्या ओळी अशा होत्या;

A thousand Maggies are born
every year to bear the yoke

A woman is a woman; but a
cigar is a good smoke !

तंबाखूवरून मी सिगरेटकडे वळलो यावरून मी विषयांतर करीत आहे असें कांहीं चाणाक्ष वाचकांना वाटेल. पण हा त्यांचा गैरसमज आहे. या चराचर विश्वमंडलांत एकच ईशतत्त्व भरलेले आहे असें आचार्य सांगतात. तितक्याच अधिकारवाणीनें मी ह्मणेन कीं, तंबाखू, तपकीर, सिगरेट, गुडाखू या नानाविध मनोरंजनांत एकच तत्त्व भरलेलें आहे. आकाराभिन्नत्वामुळें भ्रम होऊं देण्याचें कारण नाहीं. रुचिभेदामुळें मला तंबाखूचें व्यसन असूनहि एकदां मित्रमंडळींत मी प्रथमच दोनतीन सिगरेट्स लीलया ओढल्या व मला ठसकाहि लागला नाहीं. याबद्दल जो तो आश्चर्य व्यक्त करू लागल्यामुळें त्यांच्या भ्रमनिरसनार्थ मी वेद-वाणीचा आधार घेऊन उद्‌गारलों, 'एकं तं सद्विप्रा बहुधा वदन्ति ।' अहो आम्हाला हें नवीन असलें तरी आमच्या रक्ताला हें नवीन नाहीं ! वाटल्यास तपकीरहि ओढून दाखवितों !" मात्र यांतहि फरक करावयाचा झाल्यास तंबाखूसच मी प्राधान्य देईन. याचें कारण असें कीं लो. टिळकांना १९०८ सालीं सहा वर्षांची भयंकर शिक्षा झाली त्या वेळीं मी विल्सन कॉलेजमध्यें शिकत होतों. त्या वेळीं मनाचा निश्चय केला कीं, यापुढें विदेशी वस्तु म्हणून वापरायची नाहीं; आणि चैनीची वस्तु तर नाहींच नाहीं. तंबाखूच्या नानाविध रूपांत खाण्याची तंबाखू ही शुद्ध स्वदेशी आहे. कंदमूलफलपर्ण या सदरांत ती पडत असल्यानें उपवासाच्या दिवशींहि ती निषिद्ध नाहीं. शिवाय जागतिक आर्थिक हलाखीच्या या काळांत तिच्यासारखें स्वस्त व्यसन दुसरें साप-डणार नाहीं. चाऱ्याच्या लहानांत लहान जुडीच्या आकाराची एक जुडी आणल्यास एका नरपुंगवाचें सबंध साल निघतें !

स्वस्ताईसंबंधी हा खुलासा करण्याचे आणखी एक कारण असें

कीं, कांहींना अशी शंका येण्याचा संभव आहे, कीं या बेकारीच्या काळांत तंबाखूचा जोड धंदा करण्याचें या पुरस्कर्त्याच्या डोक्यांत घोळत असावें! पण तसा प्रकार असणें शक्य नाहीं हें वरील विवेचनावरून खास पटेल. या तरफदारीला आर्थिक बाजू नाहीं तशी प्रचारकाचोाह भूमिका नाहीं. कारण असल्या बाबतीत शाब्दिक अनुनयापेक्षां प्रत्यक्ष दीक्षाच परिणामी ठरते असा अनुभव आहे. शेतांतून तंबाखूची जुडी आणली म्हणजे तिच्यांतिल माती वगैरे काढून टाकून ती शुद्ध करावी लागते त्याप्रमाणें तंबाखूसारख्या अश्राप व उपकारक वस्तूवर गैरमाहीतगार व आपमतलबी लोकांनीं टीका करण्याचे परिश्रम घेतले असल्यानें तिच्यातर्फे शास्त्रशुद्ध कैफियत सादर करण्याची आवश्यकता वाटली. इतकाच या लेखनाचा माफक हेंतु आहे. याव्यतिरिक्त आणखी कांहीं हेतूंचें संशोधन करणाऱ्यांना गूढगुंजनाच्या क्षेत्रांत शिरावें लागेल. आतां इतक्या अल्प हेतूनें प्रेरित झालेले लिखाणहि कांहींना तंबाखूइतकेच लागले तर त्या आद्य तंबाखुभक्ताजवळ प्रार्थना आहे कीं, हे गणनायका! तुझी ती अनंतकाळ चिमटीत धरलेली संजीविनी तोंडांत टाक; व त्या परमानंदांत मग्न होऊन ही तंबाखूची रसरागिणी श्रवण कर; आणि प्रसन्न होऊन येवढाच वर दे; "अरसिकेषु कवित्वनिवेदनं शिरसि मा लिख मा लिख मा लिख।"

★ ★ ★

# " सॉक्रेटीस चुकला होता काय ? " : १० :

Knowledge is Virtue (ज्ञान होणें हाच सद्‌गुण; व पाप म्हणजे केवळ अज्ञान होय.) हें सॉक्रेटीसचें वचन सुप्रसिद्ध आहे. नीतिशास्त्र–सिद्धान्तांचें विवेचन करतांना प्रो. वा. म. जोशी यांनीं या वाक्यावर टीका केली आहे. ते म्हणतात 'जानामि धर्मं नच मे प्रवृत्तिः । जानाम्यधर्मं न च मे निवृत्तिः । ' 'The Soul is willing but the flesh is weak' अशी माणसाची स्थिति असते. वाईट काय हें कळूनहि माणसें दुर्बलतेमुळें पाप करतात. कळते पण वळत नाहीं हें सॉक्रेटीस विसरला ! ' प्रो. वामन जोशी मल्हार यांच्या म्हणण्याचा मी जो वर सारांश दिला आहे तो पुष्कळांनां पटेल यात शंका नाहीं. मलाहि तो पहिल्यानें पटला. पण सॉक्रेटीसचें वचन चुकीचें आहे असें मात्र मला कधींच वाटलें नाहीं. तत्त्वज्ञान या विषयाचा कॉलेजमध्यें अगर नंतर मी शास्त्रीय अभ्यास केलेला नाहीं. म्हणून त्या भूमिकेवरून सोपपत्तिक असें उत्तर मला देतां येत नाहीं. पण सामान्य मनुष्यालाहि आयुष्यांत येणारे अनुभव बारकाईनें पाहिले तर सॉक्रेटीसकडेच आपलें मत झुकतें कसें तें पहा.

क्रॉसवर्ड पझल्स् सुरू झाली त्यावेळीं मला त्यांचा विलक्षण छंद लागला. मी ती स्वतंत्र डिक्शनरी बोलावली, इलस्ट्रेटेड वीकलीच्या एकाच अंकाच्या पुष्कळ प्रती कूपन्ससाठीं विकत घेतल्या, मित्रांशीं चर्चा केल्या, जागरणें केलीं ! निरनिराळे संच तयार करून अगदी शेवटीं पाठवतांना निश्चय करावयांच्या वेळीं माझा कोण गोंधळ उडे ! चूक न होता नियमानुसार सगळें तयार करून पोस्टांत टाकीपर्यंत मी केवळ अस्वस्थ असे. हा उद्योग अपजयानें कंटाळून मी सोडून दिला

नाहीं. ओघांत येतें आहे म्हणून सांगितलें पाहिजे कीं निरनिराळे शब्द शोधण्यांत व त्यांचा तरतमभाव ठरविण्यांत माझी चांगली गती असे. मला हा बौद्धिक व्यायाम चांगला वाटे; आणि एक दोनदां मला लहान लहान बक्षिसेंहि मिळालीं आहेत ! मला पहिल्यानें बक्षीस मिळालें तो चेक आम्ही सर्वजण में महिन्यांत परगांवाला गेलों असतांना घरीं आला; व त्याची मुदत संपून गेल्यावर कित्येक महिन्यांनीं तो रद्दी कागदांत अचानक मला सांपडला ! दुसरें बक्षीस मात्र मला समक्ष मिळालें. त्या दिवशीं मी मोठ्या आनंदांत होतों. त्याच दिवशीं एका केससाठीं मी परगांवला गेलों. परत येतांना गडबडीत मोटारस्टँडवर माझें पैशाचें पाकीटच चोरीस गेलें ! त्यांत तें बक्षीस व आणखीहि पैसे होते. मोटारीतून घरीं परत येतांना माझ्या विचारांना कांहीं निराळीच दिशा लागली. मनांत येई, " आपल्या दोन्हीं बक्षिसांचें असें कां व्हावें ? एक प्रकारच्या जुगारीचा आणि हजारों पराजित जीवांच्या तळतळाटाचा हा पैसा आहे म्हणून तर याचा असा विनियोग होत नसेल ना ? आणि असें असेल तर आपल्याला दहा हजार रुपयांचें बक्षिस मिळालें तरी ती गोष्ट चांगली व सुखकारक ठरेल कां ? ते पैसे असेच हातोहात जातील किंवा आणखीं वाईट तऱ्हेनें खर्च होतील. त्या पैशांचा हाच स्वभावधर्म निश्चित असला पाहिजे. " तुम्हांला खोटें वाटेल, पण एखाद्या व्यसनाप्रमाणें त्या कोड्यांच्या बद्दल असलेली माझी ओढ एका चुटकीसरशीं कायमची बंद झाली !

आणि सर्व सद्गुणांचेही असेंच आहे. प्रो. वा. म. जोशी यांनींच आपल्या 'नीतिशास्त्रप्रवेश' या पुस्तकांत सद्वर्तनाची कसोटी ठरवितांना फार मार्मिक विवेचन केलें आहे. पुष्कळांचें पुष्कळ सुख, परोपकारबुद्धी, कीर्तीची लालसा, दूरदर्शी स्वार्थ, इत्यादि अनेक हेतू अपुरे ठरतात. सज्जन हा सद्वर्तन आचरतो याचें एकच अन्तिम

कारण हें कीं, त्यामुळें त्याच्या संस्कृत अन्तःकरणास प्रसन्नता वाटते ! प्रो. दत्तो वामन पोतदार हे एका संमेलनाचे अध्यक्ष असतांना शेवटी हिशोब जमेनात; तेव्हां ते जूळवून घ्यावे असा कोणी बूट काढला ! प्रो. पोतदार शांतपणें म्हणाले "तसें करायला कांहीं हरकत नाहीं. पण मग मला यापुढें रात्रीं झोप येणार नाहीं !" "हिशोब स्वच्छ तयार करा व जी तूट पडेल ती माझ्या पगारांतून घ्या. मी पगार मुद्दाम अजून घेतलेला नाहीं" असें सांगून स्वारी घरीं गेली. श्री. अण्णासाहेब पटवर्धन यांच्या चरित्रांत अशीच एक गोष्ट आहे. रेल्वेंतल्या त्यांच्या एका भक्ताने त्यांना विनतिकीटामेंच पुण्यास आणून गुरुभक्ती व्यक्त केली ! हें त्यांना कळतांच त्याला रागें भरून भाड्याची मनिऑर्डर त्यांनीं रेलवेकडे पाठवून दिली ! सज्जनांना सदाचरणावांचून चैन पडत नाहीं हेंच खरें !

म्हणून असें म्हणावेंसें वाटतें कीं, सज्जनांना नीतिनियम हें सृष्टि-नियमच वाटत असले पाहिजेत. सदाचरण हें सहज व नैसर्गिक आहे आणि त्याच्या विरुद्ध जाणें शक्य नाहीं म्हणून जाण्यांत कांहीं फायदा नाहीं. असें कांहीं तरी ज्ञान त्यांना होत असावें. "दुसऱ्याचा पैसा लुबाडला तर तो जातोच, पण त्याबरोबर सव्याज आपला पैसा घेऊन जातो. दुसऱ्यास दुःख दिलें तर आपल्या निरपराधी मुलाबाळांचे दुःख पाहण्याचें तीव्रतर दुःख आपणांस भोगावे लागते. वाईट चिंतन केलें तर वर्तुलाकार गतीने तें आपलेच वाईट करते" असे कांहीं तरी गूढ सिध्दान्त त्यांना चित्रपटाप्रमाणें स्पष्ट प्रतीत होत असले पाहिजेत. ॲना कॅरेनिना या कादंबरीत 'पापावर उभारलेल्या भावबन्धनापासून रूपगुणसंपन्न अशा ॲनाचे मनःस्वास्थ्य कायमचे जाऊन तिला आत्महत्या करावी लागली' हें अतिशय कला-त्मक पध्दतीनें दाखविले आहे. "शेक्सपीरियन ट्रॅजेडीज्" चा लेखक

प्रो. ब्रॅडले यानें ट्रॅजेडीजचें मनोज्ञ रसग्रहण करतांना पाप व दुःख या बद्दल मोठे उद्बोधक विचार प्रकट केले आहेत. तो म्हणतो "दुःखान्त नाटकांत शोकघटना घडवून आणणारी शक्ती नेहेमी पापीच असते. त्या घटनेला उदात्त नायकच जबाबदार असला तरीहि त्याच्या अंगचा एखादा मोठा दोष हेंच दुःखनिर्मितीचें कारण असतें. म्हणून ही दुष्ट शक्ती जगाच्या आदिशक्तीच्या विरुद्ध व तिची वैरिणीच असली पाहिजे. तसेंच पाप हें नेहेमीं नकारात्मक, वांझोटें, मन दुर्बल करणारें, सगळ्या गोष्टींचा छेद नाश करणारें असतें. आणि मौज ही कीं भस्मासुराप्रमाणें तें शेवटीं स्वतःचाहि नाश करते. शेक्सपीयरच्या शोकान्त नाटकावरून एखादी भव्य कल्पना सुचत असेल तर ती ही कीं, जगातील पाप अगर उदात्त नायकामधील त्याच किंमतीचा दोष जगाच्या आदिशक्तीला बिलकुल खपत नाहीं. ती त्यावर इतक्या आवेशानें तुटून पडते कीं पाप तर नष्ट होतेंच; पण त्याच्याशी संलग्न असा निरपराधी व पवित्र पुण्यमय भागहि कापला जातो. पण तिला त्याचें भान रहात नाहीं. निर्लेप सत्य हाच तिचा आदर्श असतो ! "

असल्या प्रकारची विचारसरणी ज्याला सतत चिंतनानें पटली त्यालाच ज्ञान झालें असें म्हणतां येईल. सद्गुण--दुर्गुणाचा हिशोब त्यालाच खरोखर कळला. सरकारी कचेऱ्यांतील कारकून विनाकारण क्यॅजुअल लीव्ह जास्त घेत नाहींत. त्यांना हें माहित असतें कीं तुंबलेलें काम आपल्यालाच अधिक बसून निस्तरावें लागेल.

आणि खरें पाहिलें तर "ज्ञान होणें" हे शब्द व्यवहारांत आपण फारच सवंगपणें वापरत असतों. खोटें कऽऽधीं बोलूऽ नये' ही ओळ पाठ झाली म्हणजे मुलाला खोटें बोलू नये हें ज्ञान झालें असें म्हणतां येईल काय ? तसेंच पहिलें तर प्रत्यक्ष ज्ञान म्हणून ज्याला सर्वोत्तम समजात तेंहि खरें ज्ञानच नव्हे असें म्हणण्याची पाळी येईल.

प्रो. ब्रॅडले यानें ट्रॅजेडीजचें मनोज्ञ रसग्रहण करतांना पाप व दुःख या बद्दल मोठे उद्बोधक विचार प्रकट केले आहेत. तो म्हणतो "'दुःखान्त नाटकांत शोकघटना घडवून आणणारी शक्ती नेहेमी पापीच असते. त्या घटनेला उदात्त नायकच जबाबदार असला तरीहि त्याच्या अंगचा एखादा मोठा दोष हेंच दुःखनिर्मितीचें कारण असतें. म्हणून ही दुष्ट शक्ती जगाच्या आदिशक्तीच्या विरुद्ध व तिची वैरिणीच असली पाहिजे. तसेंच पाप हें नेहेमीं नकारात्मक, वांझोटें, मन दुर्बल करणारे, सगळ्या गोष्टींचा छेद नाश करणारें असतें. आणि मौज ही कीं भस्मासुराप्रमाणें तें शेवटीं स्वतःचाहि नाश करते. शेक्सपीयरच्या शोकान्त नाटकावरून एखादी भव्य कल्पना सुचत असेल तर ती ही कीं, जगातील पाप अगर उदात्त नायकामधील त्याच किंमतीचा दोष जगाच्या आदिशक्तीला बिलकुल खपत नाहीं. ती त्यावर इतक्या आवेशानें तुटून पडते कीं पाप तर नष्ट होतेंच; पण त्याच्याशी संलग्न असा निरपराधी व पवित्र पुण्यमय भागहि कापला जातो. पण तिला त्याचें भान रहात नाहीं. निर्लेप सत्य हाच तिचा आदर्श असतो ! "

असल्या प्रकारची विचारसरणी ज्याला सतत चिंतनानें पटली त्यालाच ज्ञान झालें असें म्हणतां येईल. सद्गुण--दुर्गुणाचा हिशोब त्यालाच खरोखर कळला. सरकारी कचेऱ्यांतील कारकून विनाकारण कॅज्युअल लीव्ह जास्त घेत नाहींत. त्यांना हें माहित असतें कीं तुंबलेलें काम आपल्यालाच अधिक बसून निस्तरावें लागेल.

आणि खरें पाहिलें तर " ज्ञान होणें " हे शब्द व्यवहारांत आपण फारच सवंगपणें वापरत असतों. खोटें कऽऽधीं बोलूऽ नये' ही ओळ पाठ झाली म्हणजे मुलाला खोटें बोलू नये हें ज्ञान झालें असें म्हणतां येईल काय ? तसेंच पहिलें तर प्रत्यक्ष ज्ञान म्हणून ज्याला सर्वोत्तम समजात तेंहि खरें ज्ञानच नव्हे असें म्हणण्याची पाळी येईल.

जी गोष्ट स्वतः प्रत्यक्ष पाहिली अगर समक्ष ऐकली नाहीं तिला ‘ ऐकीव पुरावा ’ म्हणून त्याज्य मानण्याची न्यायालयाची प्रथा आहे. पण वस्तूचें प्रत्यक्ष ज्ञान म्हणजे तरी इंद्रियामार्फत मिळविलेली दुय्यम प्रतीची माहितीच कीं नाहीं ? अन्तिम अर्थानें बोलायचें झाल्यास एका वस्तूचें ज्ञान फक्त त्याच वस्तूला किंवा तन्मय होणाऱ्या दुसऱ्या वस्तूलाच होऊं शकेल ! श्री. अरविन्द घोष यांनीं आपल्या Life Divine या पुस्तकांत या Knowledge by Identity लाच फक्त ज्ञान ही संज्ञा शोभते असें यथार्थ म्हटलें आहे. ए. जी. गार्डिनर या प्रसिद्ध लेखकानें शेक्सपिअर हा नाटककार या दृष्टीनें बर्नार्ड शॉपेक्षा कितीतरी श्रेष्ठ आहे असें मत देतांना हेंच कारण दिलेलें आहे. तो म्हणतो “ शॉच्या नाटकांतील पात्रें शॉला जसें तीं बोलायला हवींत तशीं बोलतात, वागतात. शेक्सपीयरची पद्धत समरसतेची, तन्मयतेची आहे. एखादी म्हातारी बाई व्यवहारांत जशी बोलेल, वागेल, जे विचार प्रगट करील तेंच तिच्या रूपास पूर्ण तादात्म्य पावून शेक्सपीअर रंगवितो. ”

म्हणून माझें म्हणणे असें कीं, तत्त्वज्ञानासारख्या गंभीर विषयाचा विचार करतांना “ ज्ञान होणें ” या शब्दाचा व्यापक आणि उदात्त अर्थ करणें अवश्य आहे. आणि या मौलिक अर्थानें ज्यांना सदसद्विवेकाचें ज्ञान झालें त्यांचे आचरण आपोआपच सदाचरण घडणार यांत शंका नाहीं. प्रो. फडके यांच्या कादंबरींत कोठेंतरी वाचल्याचें स्मरतें कीं, “ तत्त्वज्ञान ही एक प्रकारची धुंदी असते. तें बुद्धीत भिनलें कीं नैसर्गिकच विलक्षण कर्तृत्वशक्ती येते. ” या दृष्टीनें पाहिलें म्हणजे ‘ कळत्ते पण वळत नाहीं, ’ हें सॉक्रेटीस विसरला असें कसें म्हणतां येईल ? मी तर असें म्हणेन कीं ‘ ज्ञान म्हणजेच सद्गुण ’ हें वाक्य तो अक्षरशः खरें आणि खरोखर लाख मोलाचें बोलला !

## "वाद-विवादातील मौजा !" : ११ :

वादे वादे जायते तत्त्वबोधः ( पुष्कळ साधकबाधक चर्चा केली कीं त्यांतून सार निघतें ) असें संकृत सुभाषित आहे. श्रीशंकराचार्य व मंडनमिश्र यांचा इतिहासप्रसिद्ध वाद झाला त्यांतून तर्कशास्त्र-शुद्ध निर्णय निघाला असेलहि. मी स्वतः त्या तोडीचे वाद ऐकलेले नाहींत; व व्यवहारांत जे नेहमीं ऐकतों त्यापासून मला कांहीं निराळाच तत्त्वबोध होतो ! मला स्वतःला वाद मुळींच करतां येत नाहीं. त्यामुळें माझा मात्र एक फायदा झाला आहे. वाद चालतो त्या ठिकाणीं मी गप्प असल्यानें त्या कसरतीतील पुष्कळसे प्रयोग मला चांगलें न्याहाळतां येतात.

वादविवादकलेत माझी कांहींच गती नसली तरी सुशिक्षित शिष्ट म्हणून शाळांतील वादप्रसंगी, माझी परीक्षकाच्या जागीं पुष्कळदां नेमणूक होते. एकदां हायस्कूलमधील मुलींच्या वादविवादाचा विषय "आधुनिक शिक्षण स्त्रियांना हानिकारक आहे" असा होता. या ठिकाणीं मला अशी गंमत दिसून आली कीं, दोन्ही पक्षाच्या वक्त्यांनीं आपापले विषय स्वतंत्रपणें तयार केले व त्यावर भाषणें केलीं ! आधुनिक शिक्षण हानिकारक नाहीं म्हणणाऱ्यांनीं शिक्षण या सामान्य विषयाचेच गुणगायन केलें ! म्हणजे असें कीं दोन्ही पक्षाचा एकमेकांशीं वाद असा झालाच नाहीं. मुंबई ते कल्याण या भागांत दोन लोकल गाड्या एकाच दिशेनें आपापल्या रुळावरून स्वतंत्र धांवतात तसें येथें झालें ! मी त्या मुलींना नावें ठेवीत नाहीं. कारण वक्तृत्व शिकणें हाच त्यांचा एकंदरीत उद्देश होता. पण मोठ्या माणसांच्या वादांतहि तुम्हाला हीच तऱ्हा दिसेल; वादांमध्यें आपला मुद्दा मंडित करण्या-

चाच सगळा अट्टाहास असतो. दुसऱ्याचें म्हणणे काय आहे व तें तर्कानें कसे चूक आहे हें दाखविण्याची कटकट फारशी कोणी करीत नाहींत.

बरें, आपला मुद्दा मांडतांनाहि आपण जे आधार घेतो ते मोठे पाहण्यालायक असतत. तुम्ही पुष्कळदां पहात असाल, वाद करणारा म्हणतो " मग काय तुमच्यामतें आपले पूर्वज मूर्ख होते ? मनू गाढव होता ? अन् तुम्हीच मोठे शहाणे निघालांत ! " या तर्कपद्धतीला 'गर्दभन्याय' असें नांव द्यावेसें मला वाटतें. पायाची दासी या सिनेमा-मध्यें नवऱ्यामुलाची ती कजाग आई आपल्या पतीला दटावते " तुम्ही कुठें मला पाहिली होतीत ? पण आपण संसार केलाच नां ! अडलं कां आपलं कुठें ? तशांतलाच हा प्रकार होय. या नैय्यायिकांना असे सांगावेसे वाटतें कीं पूर्वज मूर्ख नसतील; नव्हते. त्यांच्या काळांत ते नियम, त्या चाली योग्यहि असतील; पण सध्यां गैरलागू आहेत. पूर्वजांच्या वाशिल्याचे तट्टू आपण किती दिवस दामटणार ? आपल्या प्रश्नाला पुर्वजांच्या कांठीशिवाय स्वतंत्रपणे उभें राहतां येत नाहीं अशीच यांत एक प्रकारें कबुली नाहीं कां ? "

त्याचप्रमाणें वादामध्यें पुष्कळदां उपमेचाच शस्त्र म्हणून उपयोग करण्यांत येतो. उपमेयाला शस्त्राची उपमाच द्यायची तर ती काव्यरूपी वसन्ताच्या पुष्पधनूची द्यावी लागेल. युद्ध संपल्यानंतर त्याच्या कथा रम्य कशा करावयाच्या या बाबतींत उपमेचा सल्ला घ्यावा. पण वाग्युद्धांत उपमांचा उपयोग करणें म्हणजे धूळफेंक करून प्रतिपक्षाला चीत करण्यासारखे आहे. वादामध्यें ही उपमांची रंगपंचमी खेळण्यानें कांहींच निष्पन्न होत नाहीं. " पांचामुखीं परमेश्वर " असें तुम्हीं म्हणालांत तर मी म्हणेन " ऐकावें जनाचें करावें मनाचें ! " जपानी पंख्यांचे जसे निरनिराळे सुंदर आकार बन-

वितां येतात तसें उपमांचें आहे. ती ती गोष्ट उठावदारपणें मांडणें येवढेंच तिचें कार्य आहे. मीं तर याच्यापुढें जाऊन असें म्हणेन कीं उपमा ही निरूपयोगीच नव्हे तर औचित्यभंग करणारी व आड-रानांत नेणारीहि आहे. ज्यांत स्त्रियांचा संबंध येत नाहीं. त्या विषयांत त्या वाद घालू लागल्या म्हणून " विधवेला कुंकवाची उठाठेव कशाला ? " असें म्हणून तुम्हीं त्यांना गप्प कराल कां ? कांहीं उपमा साम्यविरोध दाखवूनच गप्प बसत नाहींत, तर भोंवतालीं चिखलहि उडवतात. एकदां आमच्या मित्रमण्डळींत कांग्रेस व हिंदुसभा यावर वाद चालला होता. कर्मधर्मसंयोगानें कांग्रेसवाले देशस्थ व हिंदुसभावाले कोकणस्थ होते. ठराविक मुद्दे निघत होते. शेवटीं कॉंग्रेसवाला म्हणाला, " कॉंग्रेसची अहिंसा हें एक खूळ असेल; पण सर्व राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीं आपण झगडत असतांना सर्व जमातींची संग्राहक अशीच संस्था हवी. उघड उघड हिंदूंचीच म्हण-विणारी तुमची हिंदुसभा अखिल राष्ट्राची म्हणून एकमुखी मागणी कशी करणार ? " यावर सयुक्तिक उत्तर देण्याऐवजीं अहिंसेच्या मुद्यावर विजय मिळविला याचाच हिंदुसभावाल्यांना हर्षोन्माद झाला. ते म्हणतात " वा ! देशस्थांत एक बायको मेली कीं तिच्या बहिणीशींच लग्न करतात तसेंच तुम्हीं चालविलें आहे ! " यावर तो तिखट कॉंग्रेसवाला देशस्थ उत्तरला " देशस्थांत एक बायको मरा-यची तरी वाट पहातात; तुम्हीं कोके असे बिलंदर आहांत कीं पहिली बायको जिवंत असतानांच तिच्या बहिणीशीं लग्न लावतां !" आणि मग कॉंग्रेस हिंदुसभा हा वाद सुटून देशस्थ कोकणस्थ वादा-वादी सुरू झाली !

वादांत ज्या अनेक दुष्ट पद्धती आहेत त्यांमध्यें व्यक्तिविषयक भाग आणण्याच्या पद्धती इतकी दुसरी कोणतीच घातुक नसेल.

एका कविमित्राच्या काव्याचें परीक्षण करीत असतांना मी त्यांतील दोष दाखवूं लागलों. कांहीं वेळ धीर धरल्यानन्तर कवी संतापला ! तो म्हणाला "आपण एकदां स्वतः काव्य करून पहा म्हणजे टीका करणें किती सोपें असतें हें समजेल. !" परिक्षण करण्यापेक्षां काव्य करणें अवघड असेलहि. पण काव्य करतां आल्या-शिवाय परिक्षण करण्याचा अधिकार नसावा हा कुठला न्याय ? किंबहुना उत्तम उत्तम वाङ्मय टीकाकारांना स्वतःला आदर्श वाङ्मय लिहितां येत नव्हते असेंच दिसून येईल. एकदां सार्वजनिक गणपतीउत्सवांत "आधुनिक मराठी वाङमयानें समाजाचा ऱ्हास होतो आहे" असा वादविवाद होता. त्यावेळीं भिक्षुक मंडळीपैकीं एक गृहस्थ ठरावाच्या विरुद्ध चांगले बोलले. मूळ ठराव मांडणारा समारोपादाखल बोलतांना म्हणाला "भिक्षुक मंडळीतील एकानें या ठरावाविरुद्ध बोलावे यापेक्षां समाजाच्या अधोगतीचा दुसरा कोणचा उत्तम पुरावा मिळणार !" व्यक्तिविषयक टीकेचें मी नुसतें दिग्दर्शन केलें आहे. या वाटेनें पुढें गेलें कीं अफाट अरण्यें लागतात !

पण वादविवादातील गंमतीचें संमेलनच मला पहावयास मिळालें तें आमच्या गांवात एक सार्वजनिक जंगी वाद तीन चार दिवस झाला त्या वेळीं ! "आचारः प्रथमो धर्मः" हा विषय होता. दोन तीन नामांकित वकील नास्तिक निदान अज्ञेयवादी होते; ते ठरावाच्या विरुद्ध पक्ष मांडणारे होते. हा वाद शेवटी 'ईश्वर आहे व नाहीं' याच वळणावर गेला; ईश्वर आहे म्हणणारे खूपच लोक होते; व त्यांत लहान मोठे, सुशिक्षित अशिक्षित सर्वच प्रकारची मंडळी होती. एक कारकून म्हणाला "ईश्वर नाहीं म्हणतात मग वकील साहेबांनीं आपल्या मुलाची मुंज कशी केली !" एका वेदान्ती पेन्शनराची अड-चण तर मोठीच बिनतोड होती. तो म्हणतो "देव नसता तर

गर्भात सोऽहं सोऽहं व बाहेर आल्यावर कोहं कोहं असें जीव कसें म्हणाला असता !" नास्तिक वकीलांनीं डार्विनच्या सिद्धान्ताचा आधार घेतला होता व चंद्राला राहू ग्रासतो अशा पुराण कल्पनांचा उपहास केला होता. त्यावर एका सुशिक्षितानें सणसणीत उत्तर दिलें. तो म्हणाला " वकीलसाहेबांनीं डार्विनच्या सिद्धान्तास अनुसरून खणण्याचे शोध करावे म्हणजे त्यांना ईश्वराचीहि हाडें सांपडतील अशी मी ग्वाही देतों ! आणि भास्कराचार्यांची लीलावती वाचल्यानंतरहि चंद्राला राहू खरोखरच ग्रासतो असे त्यावेळचे विद्वान समजत होते असें मानतां येईल काय ? या जगांत काव्यकल्पनेला कांहीं अवसरच असूं नये असें वक्त्यांना वाटते काय ?" एक गरीब स्थितीतला अर्जनवीस मोठा धीट पण चबढव्या होता. त्याला कोर्टांत वकील झटकारून टाकीत असत; उट्टे काढण्याची ही उत्तम संधी पाहून तो बोलावयास उठला व म्हणाला " हे वकील लोक चांगला पैका कमावून गबर झाले आहेत म्हणून यांना देव दिसत नाहीं. पण दारिद्र्याचा बडगा बसला म्हणजे डोळ्यांपुढें देव चमकेल !" मुद्यावर बोला, मुद्यावर बाला ' असा श्रोतृवृन्दांतून ओरडा झाला. तेव्हां हा धीट वक्ता क्षणभर स्तब्ध राहून उद्गारला " हाच तर मुद्दा आहे !" वक्तृत्वाची ही मैफल झडतांना पाहून कधीच न बोलणाऱ्या एका भिडस्त गृहस्थाला प्रथमच बोलण्याची स्फूर्ती झालेली पाहून आम्हां सर्वांनांच आश्चर्य वाटलें. तो व्यासपीठावर येऊन म्हणाला " अध्यक्ष महाराज ! व सभ्य गृहस्थहो ! बोलण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग आहे. भगवद्गीता सांगणारा कृष्ण ईश्वराचा अवतार म्हणता तर मग यज्ञाद्भवति पर्जन्यः हें त्याचें वचन खोटें कसें ठरलें असतें ? यज्ञ केल्यानें पाऊस पडेल असा तुमच्यापैकीं एकाचा तरी विश्वास आहे कां ?" यावर श्रोत्यांतून दोघांनीं हात वर करून म्हटलें

"आमचा आहे!" या अडथळयानें वक्ता घाबरला. त्याच्या विचाराची सांखळी तुटली. मला तर वाटतें वरील दोन तीन वाक्यें तो घोकून आला असावा; कारण पुढें तो स्तब्धच राहिला! श्रोत्यांत जास्तच गडबड सुरूं झाली; शेवटीं 'माझी आतां बोबडी वळली! मी खालीं बसतों' ही वाक्यें मात्र स्पष्ट बोलून तो खालीं उतरला! त्यावेळीं जो हंशा पिकला तो मला अजून आठवतो!

वादविवाद करणाऱ्या कांहीं गृहस्थांमध्ये एक निराळाच दुर्गुण सांपडतो. तो म्हणजे अहंमन्यपणा. ते सॉक्रेटीसचे अनुकरण करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगतात कीं काय न कळे; पण प्रत्येक गोष्टीची ते तुम्हांस व्याख्या करावयास लावतात व अधिकार वाणीनें सारखे प्रश्न विचारतात. आमच्या मित्रमंळीत असे एक होते. '१३ कोटी जप केल्यावर राम दर्शन देतात अशी तुमची श्रद्धा आहे काय?' त्यांनीं एकदां प्रश्न काढला. खरें पाहिलें तर अशा गोष्टींवर आपली श्रद्धा म्हटली तर आहे म्हटली तर नाहीं अशीच परिस्थिती असते. पण या गृहस्थांच्या अहंकारामुळेंच विरोधभाव निर्माण होतो.मी म्हणालो "माझी श्रद्धा आहे." याचे पुढचे प्रश्न सुरूं झाले, राम दर्शन देतात म्हणजे काय करतात? ते नेहमी कोठें रहातात?" मी समोर बोट करून म्हणालों 'ते तेथें आहेत!' या उत्तरानें तो गप्पच झाला. दुसरें कांहीं गृहस्थ वाद सुरूं झाला कीं बोलावयास लागतात ते दुसऱ्यास बोलूंच देत नाहींत. त्यांच्या सहवासांत वाद म्हणजे त्यांचें व्याख्यान असेंच समीकरण मांडावयास हवें. हा फोनोग्राफ सुरूं करतांना किल्ली देणें व प्लेटची निवड करून पिन तिच्यावर ठेवणें येवढीच इतरांची कामें होत. कांहीं क्रमिक पुस्तकांतून "खडू म्हणजे काय?" असा प्रथम प्रश्न करून उरलेला धडा खडूच्या माहितीनें भरलेला असतो. तशीच येथें अवस्था असते.

वाद म्हणजे विरोध केलाच पाहिजे असेंहि नाहीं. कित्येकांना विरोधदर्शनाचीच विलक्षण चटक असते. जॉन्सनच्या संवादांतून हा मनोधर्म उत्तम पहावयास मिळतो. या प्रकारच्या लोकांना वावदूकपणा चांगला साधत असल्यानें ते कोणचीहि बाजू घेऊन उत्तम लढूं शकतात. जॉन्सनच्या उत्तराचा प्रारंभ बहुदा "No sir" या शब्दांनीं झालेला सांपडेल. 'आपण रिकामें असलों कीं आपणांस कंटाळा येतो,' असें बॉस्वेल म्हणाला. यांत तो काय चुकीचे बोलला ! पण जॉन्सन उत्तर देतो. "मला हें कबूल नाहीं. रिकामपणाला आपण कंटाळतो याचें खरें कारण इतर लोक उद्योगांत असतात. आपण सर्वच आळसावलों तर एकमेकांच्या सहवासांत आपणांस खूप आनंद वाटेल ?" एकदां आमच्या मित्रमंडळींत एकजण सहज म्हणाला "एकनिष्ठतेचा लाभ हवा असेल तर विधवेपेक्षां कुमारीशीं लग्न केलेले चांगलें" यावर आमचे विरोधमार्तंड म्हणतात "पुरुषाला संसारात किती खस्ता खाव्या लागतांत याचा प्रत्यक्ष अनुभव असल्यामुळें विधवाच जास्त एकनिष्ठ राहूं शकेल. कुमारिका हक्काच्या उन्मादांत असतात !" अशा लोकांना स्वतःचें मत नसतेंच कीं काय अशी शंका येते. आपला जो पक्ष असेल त्याच्या विरुद्ध आपण बोलूं लागावें म्हणजे हे लोक आपलीच मतें आपल्यापेक्षां चांगल्या रीतीनें मांडून दाखवतात.

वादविवादांतलि या नानाप्रकारच्या मौजा पाहिल्या कीं माझ्या कधीं कधीं मनांत येतें वादानें तत्त्वबोध होतो तो वादविषयाचा नव्हे; तर 'तुटे वाद संवाद तो हीतकारी' हा रामदासांनीं मनाला बोध केला आहे त्या तत्त्वाचा ! पण यामुळें वाद करूच नयेत असें मी अरसिकपणानें म्हणत नाहीं. माझें म्हणणें येवढेंच कीं व्यवहारातल्या आपल्या वादविवादाचा हेतू तत्त्वनिर्णय नसतो हें लक्षांत ठेवून आनु-

षंगिक आनंदासाठीं वाद अवश्य करावें. आपण फिरावयास जातो त्यावेळीं आपणांस विवक्षित स्थळीं असें जायचें नसतें. पाय मोकळे करणें व जिकडे जाऊ तेथील शोभा पहाणें हाच आपला उद्देश असतो. तसेंच वादविवादाचें आहे. हें माझें म्हणणें पुष्कळांना कदाचित पटणार नाहीं. त्यांच्याशीं वाद घालण्याऐवजी मी इतकेंच म्हणतो, कीं हा सुखसंवाद म्हणजेहि वादविवादाचाच एकनमुना आहे !

# " सिद्धींची भ्रामकता "      : १२ :

चमत्कार व सिद्धी यांना लोकभ्रमांत काढणें हें आधुनिक विज्ञान-युगांत बुद्धिवादीपणाचें लक्षण समजलें जातें. पण त्याच्याबद्दल कुतूहल असणें हा मानवी मनाचा सहजधर्म आहे. त्यामुळें बाहेरून नास्तिक व आंतून आस्तिक अशीच त्यांच्याबद्दल पुष्कळांची भूमिका असते.. मजविषयीं म्हणाल तर एका बाजूनें ' आहेत ' आणि दुसऱ्या बाजूनें ' नाहींत ' अशा साइन बोर्डसारखी माझी द्विविध स्थिति नाहीं; मला त्यांच्याबद्दल उत्कटउत्कट जिज्ञासा व कौतुकभाव आहे.

या विद्यार्थी वृत्तीमुळें असल्या गोष्टी पहाण्याचा कोठें प्रसंग आढळला कीं मी तो सहसा वायां जाऊं देत नाहीं. कांहीं वर्षांपूर्वी पुण्यास एका मित्रांकडे रात्रीं गप्पा करीत असतांना गोष्टी निघाल्या कीं, एक मद्रासी गृहस्थ गांवात आला आहे व तो मनांतील गोष्टी ओळखतो. मला दुसऱ्या दिवशीं गांवास जायचें असल्यानें आम्हीं एका मध्यस्थाच्या मार्फत रात्रींच त्या मद्राशाकडे गेलों. तो झोपलेला होता; पण वशिल्यामुळें उठला. तो आम्हांस म्हणाला " मला अफू खाण्याची संवय आहे. त्यामुळें अशा स्थितींत शक्ती चालतील कीं नाहीं कोण जाणें. पण तुम्हीं मुद्दाम आलाच आहांत तर प्रयत्न करतों. " नंतर त्यानें तीन चार सिगारेटस् ओढल्या; आणि दूर बसावयास सांगून तो ध्यानस्थ बसला. अमेरिकेतल्या एका नदीचे नांव मनांत धरावयास त्यानें मला सांगितलें. माझ्या मनांत " मिसिसिपी " असें आलें; पण मी विचार केला कीं ती तर प्रसिद्ध आहे. म्हणून मी ओव्हिओ हें नांव कायम केलें, लगेच त्या

मानसद्रष्टऱ्यानें एका चिठ्ठीवर कांहीं खरडून ती आम्हांस दिली. तीवर लिहिलें होतें " मिसिसिपी चेंजड् टु ओव्हिओ ! " अशाच कांहीं प्राथमिक प्रयोगानंतर त्याच्यावरील अफूचा आसर पूर्ण उतरला असावा. कारण त्यानंतर मी मनांत धरलेलीं वाक्येंच्या वाक्यें त्यानें एका अक्षराचीहि चूक न करतां कागदावर लिहून दाखविली.

असाच दुसरा एक प्रयोग मला मोठा नवलाचा वाटला. आमच्या घरीं एका जादुगार मुलाला एका खोलींत बसवून त्याचे डोळे आम्ही घट्ट बांधले. नंतर हॉलमध्यें येऊन खडूनें एका कोपऱ्यापासून दुसऱ्या कोपऱ्यापर्यन्त वेडीवांकडी, वर्तुळें घेतलेली एक रेषा काढली. आणि मग त्या मुलाला हॉलमध्यें आणून त्या रेषेच्या एका टोकांवर उभे करून दिले. चमत्कार असा कीं एखाद्या डोळसाप्रमाणें तो बरोबर त्या रेषेनुसार शेवटपर्यन्त चालत गेला. मी त्यांस शेवटीं विचारलें कीं " ही विद्या तुला कशी मिळाली ?" त्यावर तो म्हणाला कीं "उत्तर हिंदुस्थानांत एका साधूची सेवा केल्यानंतर त्यानें मला परतताना ही सिद्धी दिली !"

यापेक्षांहि चमत्कृतिजनक प्रकार पुष्कळांनीं पाहिले असतील. जादूच्या खेळासंबंधीं मी कांहीं म्हणत नाहीं. त्यांत हातचलाखी व नजरबंदी असेल. पण मनांतलि गोष्टी ओळखण्यांत कोणची फसगत शक्य आहे ? याहि गोष्टी खोट्या म्हणण्यांत बुद्धिवादापेक्षां अज्ञानाचेंच जास्त प्रदर्शन होतें. कारण, असें पहा कीं ' नाहीं ' असें ठासून सांगायला अस्तिपक्षीच ज्ञान हवें. तें जर नसेल तर ' माहीत नाहीं, अजून आढळलें नाहीं ' असेंच म्हणणें प्रामाणिकपणाचें व खरें ठरेल. मला याबाबतींत प्रो. केरुनाना छत्र्यांचें उदाहरण नेहेमी आठवतें. ते पूर्ण नास्तिक असले तरी मोठे गणिती होतें. ते गंध लावीत व रोज विष्णुसहस्रनाम म्हणत आणि शालिग्रामाला तुलसीदळ वहात. यावर

एकानें त्यांना प्रश्न केल्यावर ते म्हणाले " अरे ! देव आहे कां नाहीं या प्रश्नाचा विचार करण्यास मला वेळच मिळाला नाहीं व मला त्याची गरजही वाटली नाहीं. पण मी हिशोबी आहे. देव नसला तर या रोज लागणाऱ्या १५ मिनिटांचा मीच मालक आहे. पण असला तर त्याला सांगेन कीं रोज हा इतका वेळ तुला दिलेला आहे !'

' विज्ञान बोध ' या ग्रन्थाला लिहिलेल्या विद्वत्तापूर्ण प्रस्तावनेंत प्रो. माटे यांनीं हाच पक्ष स्वीकारला आहे. ' विश्वाचें आम्हास संपूर्ण ज्ञान झालें आहे, आम्हांस अविदित असें कांहींच नाहीं ' अशी पारमार्थिक जी अहंता भोगतात त्यावर त्यांनी पुष्कळ आक्षेप घेतले आहेत. पण ' सृष्टिव्यापार सूक्ष्म नियमानी अंकित आहेत व ब्रह्मसत्य आहे." हे सिद्धान्त प्रो. माटे खरेच मानतात. त्यांच्या म्हणण्याचा सारांश असा:— " विलक्षण बुद्धिमान व वैचारिक कसोटी सांभाळण्याच्या लोकांची आत्मवंचना झाली असेल असें कसें म्हणावें ? शारीरिक व मानसिक दगदग करून त्यानीं स्वानुभव घेतलेले आहेत, ज्या मार्गानें जावें असें ते म्हणतात त्यानें प्रथम जावें व मगच म्हणावें कीं तेथें कांहीं नाहीं ! "

भूत-योनी आहे ही गोष्ट कदाचित् खोटीही असेल ( सुदैवानें मला भूत अजून दिसलेलें नाहीं ! ) पण भूतदर्शनाच्या संदर्भानें हॅम्लेटनें काढलेले उद्गार मात्र त्रिवार सत्य होत. हॅम्लेटच्या बापाचें भूत हॅम्लेटला व त्याचा मित्र होरेशिओ याला दिसल्याबरोबर होरेशिओचा आपल्या डोळ्यावर विश्वास बसेना व तो त्या दृश्याला चमत्कारिक, अघटित म्हणूं लागला. तेव्हां हॅम्लेट त्याला म्हणतो " चमत्कारिक आहे म्हणूनच या दृश्याकडे जिज्ञासू बुद्धीनें पहा ! आपल्या संकुचित ज्ञानाला अज्ञात अशा कितीतरी अद्भुत गोष्टी या सृष्टीच्या व विश्वाच्या पोटांत आहेत ! "

मानसद्रष्ट्यानें एका चिठ्ठीवर कांहीं खरडून ती आम्हांस दिली. तीवर लिहिलें होतें " मिसिसिपी चेंजड् टु ओव्हिओ ! " अशाच कांहीं प्राथमिक प्रयोगानंतर त्याच्यावरील अफूचा आसर पूर्ण उतरला असावा. कारण त्यानंतर मी मनांत धरलेलीं वाक्येंच्या वाक्यें त्यानें एका अक्षराचीहि चूक न करतां कागदावर लिहून दाखविली.

असाच दुसरा एक प्रयोग मला मोठा नवलाचा वाटला. आमच्या घरीं एका जादुगार मुलाला एका खोलींत बसवून त्याचे डोळे आम्ही घट्ट बांधले. नंतर हॉलमध्यें येऊन खडूनें एका कोपऱ्यापासून दुसऱ्या कोपऱ्यापर्यन्त वेडीवांकडी, वर्तुळें घेतलेली एक रेषा काढली. आणि मग त्या मुलाला हॉलमध्यें आणून त्या रेषेच्या एका टोकांवर उभे करून दिले. चमत्कार असा कीं एखाद्या डोळसाप्रमाणें तो बरोबर त्या रेषेनुसार शेवटपर्यन्त चालत गेला. मी त्यांस शेवटीं विचारलें कीं " ही विद्या तुला कशी मिळाली ?" त्यावर तो म्हणाला कीं "उत्तर हिंदुस्थानांत एका साधूची सेवा केल्यानंतर त्यानें मला परतताना ही सिद्धी दिली !"

यापेक्षांहि चमत्कृतिजनक प्रकार पुष्कळांनीं पाहिले असतील. जादूच्या खेळासंबंधीं मी कांहीं म्हणत नाहीं. त्यांत हातचलाखी व नजरबंदी असेल. पण मनांतलि गोष्टी ओळखण्यांत कोणची फसगत शक्य आहे ? याहि गोष्टी खोट्या म्हणण्यांत बुद्धिवादापेक्षां अज्ञानाचेंच जास्त प्रदर्शन होतें. कारण, असें पहा कीं ' नाहीं ' असें ठासून सांगायला अस्तिपक्षीच ज्ञान हवें. तें जर नसेल तर ' माहीत नाहीं, अजून आढळलें नाहीं ' असेंच म्हणणें प्रामाणिकपणाचें व खरें ठरेल. मला याबाबतींत प्रो. केरूनाना छत्र्यांचें उदाहरण नेहेमी आठवतें. ते पूर्ण नास्तिक असले तरी मोठे गणिती होतें. ते गंध लावीत व रोज विष्णुसहस्रनाम म्हणत आणि शालिग्रामाला तुलसीदळ वहात. यावर

एकानें त्यांना प्रश्न केल्यावर ते म्हणाले " अरे ! देव आहे कां नाहीं या प्रश्नाचा विचार करण्यास मला वेळच मिळाला नाहीं व मला त्याची गरजही वाटली नाहीं. पण मी हिशोबी आहे. देव नसला तर या रोज लागणाऱ्या १५ मिनिटांचा मीच मालक आहे. पण असला तर त्याला सांगेन कीं रोज हा इतका वेळ तुला दिलेला आहे !'

' विज्ञान बोध ' या ग्रन्थाला लिहिलेल्या विद्वत्तापूर्ण प्रस्तावनेंत प्रो. माटे यांनीं हाच पक्ष स्वीकारला आहे. ' विश्वाचें आम्हास संपूर्ण ज्ञान झालें आहे, आम्हांस अविदित असें कांहींच नाहीं ' अशी पारमार्थिक जी अहंता भोगतात त्यावर त्यांनी पुष्कळ आक्षेप घेतले आहेत. पण ' सृष्टिव्यापार सूक्ष्म नियमानी अंकित आहेत व ब्रह्मसत्य आहे." हे सिद्धान्त प्रो. माटे खरेच मानतात. त्यांच्या म्हणण्याचा सारांश असा:— " विलक्षण बुद्धिमान व वैचारिक कसोटी सांभाळण्याच्या लोकांची आत्मवंचना झाली असेल असें कसें म्हणावें ? शारीरिक व मानसिक दगदग करून त्यानीं स्वानुभव घेतलेले आहेत, ज्या मार्गानें जावें असें ते म्हणतात त्यानें प्रथम जावें व मगच म्हणावें कीं तेथें कांहीं नाहीं ! "

भूत-योनी आहे ही गोष्ट कदाचित् खोटीही असेल ( सुदैवानें मला भूत अजून दिसलेलें नाहीं ! ) पण भूतदर्शनाच्या संदर्भानें हॅम्लेटनें काढलेले उद्गार मात्र त्रिवार सत्य होत. हॅम्लेटच्या बापाचें भूत हॅम्लेटला व त्याचा मित्र होरेशिओ याला दिसल्याबरोबर होरेशिओचा आपल्या डोळ्यावर विश्वास बसेना व तो त्या दृश्याला चमत्कारिक, अघटित म्हणूं लागला. तेव्हां हॅम्लेट त्याला म्हणतो " चमत्कारिक आहे म्हणूनच या दृश्याकडे जिज्ञासू बुद्धीनें पहा ! आपल्या सकुंचित ज्ञानाला अज्ञात अशा कितितरी अदभुत गोष्टी या सृष्टीच्या व विश्वाच्या पोटांत आहेत ! "

मला ही तर्कपद्धतीच खरी सुप्रतिष्ठित वाटते. चमत्काराचे व सिद्धीचे शास्त्रीय समर्थन करणारे त्या विषयांतील तज्ज्ञ आहेत त्यांचें म्हणणें आपण ऐकून घेतले पाहिजे. ते म्हणतात " विज्ञानशास्त्राची ठोवळ चूक कोणाची होत असेल तर ती ही कीं जो संशोधन करतो त्या मानवास व त्याच्या मनास संशोधनाच्या कक्षेंतच घेतलें जात नाहीं ! सिद्धी या प्रयोगक्षम आहेत. योगशास्त्र हें आमचें प्रयोगशास्त्र आहे. मानव देह ही प्रयोगवस्तू आहे. आणि अष्टांग योग हीं साधनें आहेत. येथे देवावरील आंधळ्या श्रद्धेची वगैरे कांहीं गरज नाहीं. पातंजल-योगांत संयम, निदान ध्यान, इतकी पायरी नास्तिकास सहज गांठता येईल; व सिद्धींचा प्रत्यक्ष अनुभव घेतां येईल. मात्र शिस्तीला कंटाळतां कामा नये. तुमच्या विज्ञान-शास्त्रांत ती काय कमी कडक आहे ? नायट्रो-ग्लासरिनच्या कारखान्यांत हलुसुध्दां आवाज होतां कामा नये ? सिनेमा डेव्हलपमेंट-खात्यांत धुळीचा कण तरी चालतो कां ? तसेंच येथें आहे. ती शिस्त पाळून जरूर ते प्रयत्न केले कीं सिध्दी सहज प्राप्त होतील. त्यांना गप्पा म्हणण्याचें कारण उरणार नाहीं. व त्यांच्यांत कांहीं चमत्कार आहे असेंहीं वाटणार नाहीं. तुमच्या अंगावर पडलेले किरण परावर्तित होऊं न देतां तुमच्याच अंगात समाविष्ट करतां आले कीं तुम्ही अदृश्य व्हाल ! पहाणाराचा डोळा व स्वतःचें शरीर यांच्यांत प्रकाश किरणांचा संयोग होऊं न देण्याची शक्ती वापरूनच योगी गुप्त होतात ! योग्य ती शक्ती वाढविली कीं पुस्तकाची मागचीं पाने उलटून वाचावी तसे पूर्वजन्म वाचतां येतात ! "

त्यांचें आणखी म्हणणें असें कीं या चराचर विश्वसृष्टींत एकच ईशतत्त्व भरलेलें आहे. एकच मूलतत्त्व अनेक बनलें आहे; पण आपलें एकत्व न सोडतां. शास्त्रीय परिभाषेंत बोलायचें झाल्यास, सर्व वस्तु

म्हणजे केवळ भिन्न भिन्न विद्युत्समूह होत. मग वस्तु-वस्तूत फरक कां आहे हें समजून घेतलें पाहिजे. परमाणु हे ऋण व धन असतात हें प्रसिद्ध आहे. एका केंद्राभोंवतीं किती निगेटीव्ह परमाणू फिरतात त्यावर त्या त्या पदार्थाचें पदार्थत्व अवलंबून असतें. एका पदार्थाच्या परमाणूंची संख्या अगर नुसता वेग बदलला तरी तो पदार्थ बदलून दुसराच पदार्थ निर्माण होईल. केमिस्ट्रीतलें उदाहरणें पहा. गोंद व साखर यांच्या घटकांचे प्रमाण सारखेंच आहे. फरक फक्त एकत्र मिळण्याच्या प्रकारांत आहे.

याप्रमाणें जर वस्तुस्थिती असेल तर एका वस्तुचें दुसरींत रूपान्तर करणें कां अशक्य वाटावें ? परमाणूंच्या संख्येंत व वेगांत ज्याला बदल पाडता येईल त्याला हें सहज शक्य आहे. मनांतील गोष्टी ओळखण्याच्या बाबतींतही असें म्हणतात कीं, 'अमक्याच्या मनांतील मला कळावें' असा संकल्प करून ध्यानस्थ झालें कीं त्या दुसऱ्या मनाशी एकरूप होऊन आपलें मन तेथील ठसा घेऊनच परत फिरतें. दूरचें दिसण्याच्या सिद्धीची मीमांसा अशी करतात कीं इंद्रियांचें एकीकरण करून ती सूक्ष्म केल्यानें हीं गोष्ट करता येते. जडशास्त्रांतहि दगड हा स्थूल दृष्टीला अविभाज्य वाटतो. पण क्षकिरण त्यांतून जातातच नां ?

कोणच्या व्रतानें कोणची सिद्धी मिळतें याविषयींची माहितीही मनोरंजक आहे. अहिंसा-पालनानें व्याघ्रादि क्रूर पशूपासून भय नाश पावतें; अपरिग्रहानें जन्मान्तराचें ज्ञान होतें. ब्रह्मचर्यानें इच्छा मरणाची सिद्धी येतें. सत्यपालनानें वाचासिद्धी मिळते. माझ्या परीचयाच्या एका संत पुरुषास वाचासिद्धी असावी असा तर्क मी व्यक्त केल्यावर एका मित्रानें त्याच्या सिध्यर्थ दिलेली कारणपरंपरा मार्मिक आहे. तो म्हणाला "ते नेहेमीं सत्यच बोलतात. आज कित्येक वर्षे त्यांच्या वाणीला असत्याचा

गंधही नाही. म्हणून ते जे बोलतील ते खरे करण्याची जबाबदारी परमेश्वरावर साहजिकच पडते ? ''

पातंजल योग-शास्त्राच्या तज्ज्ञांकडून जिज्ञासू बुद्धीनें जे विचार ऐकले ते वर दिले आहेत. त्या शास्त्रांत मला कांहीं गम्य आहे असा गैरसमज उत्पन्न होणें साहाजिक व जरा बरेंच असलें तरी मला अभिप्रेत नाहीं. माहीतगारांना या विवेचनांत कदाचित् कांहीं चुकाही आढळतील. पण मला त्याची खंत वाटत नाहीं. कारण पातंजल-योगशास्त्राची सशास्त्र माहिती देणें हा कांहीं माझा उद्देश नाहीं. त्या शास्त्राला लोकभ्रमांत काढूं नये, तें प्रयोगशास्त्र आहे असें घडधडीत विधान असतांना निदान कांहीं मर्यादेपर्यन्त त्याचा अनुभव घेणें ही त्याला खोटें म्हणण्यावर जबाबदारी पडते, येवढेंच मला सुचवायचें आहे.

'पातंजल योगशास्त्राचे येवढे गोडवे गातां; मग तुम्हीच त्याचा कां अनुभव घेऊन पहात नाहीं ?' असा मला चवकस प्रश्न विचारावासें पुष्कळांना वाटेल. पण मला हा प्रश्न नवीन नाहीं. तो पुष्कळदां माझ्या मनांत आलेला आहे. आणि त्यावर विचार केल्यावर माझ्यापुरता तो प्रश्न मी सोडवूनही टाकला आहे. सिद्धी या खऱ्या, प्रयोगक्षम आहेत असें मी मानतों. त्यांचा प्रयोग पाहाण्याचेंहीं मला कुतूहल आहे. पण त्या स्वतः मिळवाव्या असें त्यांच्यांत आकर्षक मला कांहींच वाटत नाहीं ! त्या सृष्टिनियमांनीं अंकित आहेत व प्रयोगाच्या कक्षेंतील आहेत हें कळलें म्हणजेंच आधीं त्यांच्यातील पुष्कळशीं जादुगिरी नष्ट होते. पारमार्थिक दृष्टीनें पाहिलें तर साधकाच्या पंथावरच्या त्या अधःपतनाच्या जागा होत. प्रगती होऊं लागली कीं त्या आपोआप प्राप्त होतात व त्यांच्याशीं झगडून त्यांचा मोह जिंकणें हेंच एक साधन आहे म्हणतात ! साधूसंतांच्या चरित्रा-

कडे पाहिले तर कांचन कामिनीइतकाच सिद्धींचा त्यांना तिटकारा असलेला दिसतो. श्री. रामकृष्ण परमहंसांनीं तर शेवटीं त्या श्री विवेकानन्दाना देऊन टाकल्या व हंसून म्हाणाले "मी आतां खरा भिकारी झालों! "नदीवरून चालत जाण्याची सिद्धी मिळविल्याची हकीगत गर्वानें एक साधक सांगू लागला तेव्हां ते म्हणाले "बेटा! ही सिद्धी प्राप्त होण्यासाठीं हाडाचीं काडें करून तूं चार आण्यांचाच काय तो फायदा करून घेतलास. ते नावाड्याला दिलें कीं हा चमत्कार आम्हीही करून दाखवतों!" बरें, व्यावहारिक दृष्टीनेंही पहाल तरी या व्यवहार-सृष्टींत अशा सिद्धी असणें फायद्यापेक्षां जास्त तोट्याचें व धोक्याचेंच आहे. त्यांचा दुरुपयोग करण्याकडेच मानवी स्वभावाचा काल राहील. गुप्त होऊन गावांतल्या लोकांच्या घरांतील संभाषणें रात्रींअपरात्रीं ऐकण्याची सिद्धी कोणा सिद्धानें मला देऊं केली तर मी हात जोडून म्हणेन "योगिराज! अशी अवकृपा मजवर करूं नका!" मी ज्यांची चटकदार संभाषणें गुप्तपणें ऐकेन त्या बापड्यांचे कदाचित् विशेष नुकसान होणारही नाहीं. पण माझ्या मनाचें केवढें अध:पतन होईल!"

म्हणून माझें म्हणणें असें कीं सिद्धी आहेत ही समजूत भ्रामक नसावी; त्या मिळवाव्या अशी इच्छा मात्र भ्रामकता ठरेल!

## " स्तुतीचें इन्द्रधनुष्य ! " : १३ :

स्तुतिपाठकांनीं आजपर्यंत जितकी दुसऱ्यांची स्तुती केली असेल तितकीच इतरांकडून त्यांची स्वतःची निंदा झालेली आहे. वामनपंडितानीं त्यांना श्वानाची उपमा दिली आहे; एका संस्कृत पंडितानें तर स्तुतीला अखंड-कुमारिका ठरवून टाकलें आहे. कारण सज्जनांना माळ घालण्याची तिची इच्छा असतांना. ते तिला नकार देतात, आणि दुर्जन तिला मागणी घालतात पण ती त्यांना झिडकारते ! उठल्या सुटल्या तोंडपुजेपणा करणाऱ्यांचा तिटकार यावा हें स्वाभाविक आहे. वरिष्ठ नालायक असला तरी " हे दगडा ! तूं किती वजनदार आहेस ! आणि अतिशय गुळगुळीतहि आहेस रे ! नर्मदेच्या शीतल तरंगात जलविहार करण्याचें सोडून आम्हा पामरांच्या उद्धारासाठीं तूं या उच्चासनावर विराजमान होण्याचे परिश्रम घेतोस ! " अशा प्रकारची स्तुती ऐकली म्हणजे ऐकणारालाहि लाजल्यासारखें होते. पण अशाप्रसंगी चीड येते ती स्तुतिपाठकाच्या लाचारपणाची होय. लो० टिळकांना कांहीं परप्रांतातले विद्यार्थी भेटावयास आले त्यावेळीं लोकमान्यांच्या पायावर डोके ठेवून ' आपलें दर्शन घडल्यानें आज आमच्या जन्माचें सार्थक झालें ! आमचा देह पवित्र झाला ! " अशा प्रकारचे उद्गार त्या विद्यार्थ्यांनीं काढल्यावर टिळकांना चीडच आली ! ते म्हणाले " महाराष्ट्रीय विद्यार्थी असली स्वाभिमानशून्यता कधींच दाखवणार नाहींत ! " कधीं कधीं स्तुतीला आचरटपणाचेंहि स्वरूप येतें. एक युरोपियन अधिकारी खेडेगावांत सहकुटुंब फिरतीवर गेला असतां सरबराई करणारा पाटील कांहीं चुकला; म्हणून तो अधिकारी त्यास

'यू ब्लडी फूल ! ' असें म्हणाला. पिङ्यानपिळ्या हांजी हांजी करणाऱ्या त्या स्वामीनिष्ठ सेवकाला भाषेच्या अज्ञानमुळें कांहीं निराळाच अर्थ बोध होऊन तो गहिंवरून उद्गारला "छे ! छे ! साहेब ! आपण फूल ! मेम साहब फूल ! छे ! छे ! छे ! मी कसचा फूल ! " स्तुतीबद्दल तिरस्कार उत्पन्न होण्याचे आणखी एक कारण म्हणजे तिच्या पोटीं पुष्कळदां स्वार्थ बुद्धी असते. एकदां एक विशेष न येणारा गृहस्थ माझ्याकडे येऊन माझ्या काव्याचीच स्तुती करूं लागला ! मी कांहीं काव्यरचना करतो हें खरें. पण माझ्या काव्यशक्तीचें महत्वमापन करतांना सुदैवानें मला कल्पकतेची स्फूर्ती होत नसल्यानें माझी योग्यता मी जाणून होतों. मी चक्रावून गेलों कीं हा येवढा रसिक केव्हां झाला आणि आपण येवढे अभिजात कवी असल्याचें आपल्यासच कसें माहीत नाहीं ? थोड्या वेळानें तो गृहस्थ जावयास निघाला; आणि मागाहून सहज आठवण व्हावी असा आविर्भाव करून परतला व म्हणाला "खरंच ! तुमच्याकडे ती मोठी सतरंजी आहे ना ? ती द्याल कां उद्यापुरती आम्हाला ? घरीं कांहीं कार्यक्रम आहे. " मी "होय " म्हणालों हें सांगावयास नकोच !

वरील प्रकारचे प्रशंसापंडित हे निंदास्पद होत यांत शंका नाहीं. पण त्यांनीं केलेलें गुणगायन लाचारपणा, स्वाभिमानशून्यता, आचरटपणा व स्वार्थबुद्धी या दोषांनीं कलंकित असल्यानें तें कर्णकटू व तिरस्करणीय वाटतें. यांच्यापेक्षां मग ते पूर्वीचे पगारी भाट फार चांगले ! भाटांचा धंदाच प्रशंसेचा असतांना त्यांनीं दुसरें काय करावें ? श्रीमंतांच्या अंगाला मालिश करणाऱ्याला आपण नांवें ठेवीत नाहीं. मग त्यांच्या मनाला गुदगुल्या करून त्यांचें रंजन करणाराला कां दोष द्यावा ? शिवाय हे भाट स्वतःचा निर्देशही न करतां स्तुती करीत; व तीही मोठ्या काव्यमय भाषेंत ! " हे राजेन्द्रा ! तुझ्या

करार्ग्री भाग्यलक्ष्मी नांदते व जिव्हाग्रीं सरस्वती नृत्य करते; या दोघींच्या सहवासातच तूं सदा सर्वदा मग्न असल्यानें रुष्ट होऊन तुझी स्त्री कीर्ती ही देशान्तराला गेली आहे !" अशा प्रकारची स्तुती सर्वांनाच मनोरंजक वाटते !

म्हणून माझ्या मनांत पुष्कळदां असा विचार येतो कीं आपमतलबी व कलाहीन लोकांनीं स्तुतीचें नांव बदनाम केलें असलें तरी वस्तुतः ती कांहीं वाईट नसावी. तसें पाहायला गेलें तर प्रत्यक्ष परमेश्वर हाही स्तुतिप्रिय आहे. सीझरच्या बाबतींत असें सांगतात कीं "सीझरला स्तुती अगदीं आवडत नाहीं" असें म्हटल्यानेंच तो मोठा खूष होत असे. याचा अर्थच असा कीं, लहान असो, मोठा असो, स्तुती ऐकल्यानें बरें वाटावें हा मनुष्यस्वभावच आहे. आणि दुसऱ्याबद्दल आपला भाव व्यक्त करण्याची आणि आपल्या बद्दल त्याचें चांगलें मत बनविण्याचीं जीं अनेक नाजुक आणि कौशल्याची साधनें आहेत त्यांतच योग्य व मर्यादित स्तुतीचा अन्तर्भाव अवश्य केला पाहिजे. आमच्या गांवी महाराष्ट्रांतील एक नामवंत वक्ते रहातात. मी त्यांस एकदां म्हणालों "शास्त्रीबुवा ! तुमची ती रामायणावरील व्याख्यानें पुन्हां एकदां करावीं असा फार लोकांचा आग्रह आहे. तशी रसाळ व्याख्यानें एकायलाच सांपडत नाहींत पहा ! " आणखी एकदां त्यांच्या समक्ष मी इतर मित्रांना म्हटलें "शास्त्रीबुवांना लेख अगदीं लिहितां येत नाहींत. ते बोलायला उभे राहिले कीं त्यांची प्रतिभा जागृत होते. ते जातिवन्त वक्ते आहेत हें त्यांना लेखनकला साधत नाहीं यावरूनच उत्कृष्ट सिद्ध होतें !" ज्या गृहस्थांना उद्देशून मी हें बोललों ते कांहीं भोळे नाहींत पण माझ्या बोलण्यानें त्याना आनंद झाला असावा हें निश्चित आणि तें फार नैसर्गिक आहे असें वाटतें. स्तुती ही तोंडानेंच करावी लागते

असें नाहीं. मी कोठें परगांवास गेलों कीं जेथें उतरेन त्या घरच्या वृद्ध मंडळींनां अवश्य लवून नमस्कार करतों. माझा असा अनुभव आहे कीं त्यांचे आपल्याविषयीं एकदम चांगलें मत होतें ! परगांवच्या एका स्नेह्याच्या घरून मी घरीं आल्यावर त्यांस पत्र पाठविलें. त्यांत इतर मजकुरानंतर मी लिहिलें "....तुमच्या सर्वांच्या प्रेमळ सहवासांत माझा काळ फार आनन्दाचा गेला. वर्षभर कज्जेदलाली केल्यानन्तर चार आठ दिवस कोठेंतरीं दूर रहायला जावें असें फार वाटतें. अशा प्रसंगी मला प्रथम आपली आठवण होते. आपल्या घरी कसें घरच्यासारखें मोकळें वाटतें.... " या पत्रानें त्या स्नेह्यांना आल्हाद वाटला असेल असें खास वाटतें. कारण मला असें पत्र आलें तर तसा तो वाटेल. परस्परांच्या स्नेहसंबंधांत व व्यवहारांत याप्रमाणें स्तुतिकुसुमांचा अहेर करण्यांत व स्विकारण्यांत स्वभावाचा गोडवेपणा व मनुष्यस्वभावाचें ज्ञान हेच गुण आपण व्यक्त करतों यांत शंका नाहीं. याप्रकारची स्तुती दूषणीय तर नव्हेच; पण या कलेचा अभ्यास करून त्यांत वाकबगार होणें हा एक सद्गुण समजला पाहिजे.

इतकें कशाला, स्वतःची स्तुतीसुद्धां माफक व मोठ्या कौशल्यानें केलेली असेल तर ती काव्याइतकीच हृद्य वाटते. आपली आपण स्तुती करणाऱ्याला श्रीरामदासांनीं मूर्खांत काढलें आहे खरें. पण बावळटपणानें भरमसाट आत्मस्तुती करण्याबद्दलच तें खरें आहे. आमच्या येथें एक बुद्धिमान वयस्क वकील होते. त्यांचा चातुर्यानें आत्मप्रशंसा करण्यांत हातखण्डा होता. मित्रमण्डळींत त्यांनीं मला एकदां विचारलें " कांहो ? बडोद्याकडे ती कन्सेशन तिकिटें अजून आहेत का ? " मी म्हणालों " काकासाहेब ! कां, कशाकरितां ? " ते म्हणतात " अहो ही एक भानगड आली आहे ना ! तिथल्या

वाङ्मयपरिषदेचे अध्यक्ष व्हा म्हणूनच ती मंडळी मागें लागली आहेत. मी लिहिलें कीं ' मला ही दगदग होणार नाहीं ' पण त्यांचे पुन्हां उत्तर आलें ' तें कांहीं चालणार नाहीं. तुह्मांला आलेंच पाहिजे. नाहींतर दुसरा इतका चांगला माणूस तरी सुचवा. '' माझ्या परगांवच्या एका मित्राला सांगायचें होतें कीं त्याची दुसऱ्या नंबरची मुलगी मॅट्रिकमध्यें पहिल्या वर्गांत आली; आम्हांला ती गोष्ट माहीत नव्हती; सगळे बसलों असतां तो म्हणाला " कांहो ! आमच्या थोरल्या मुलीला कांहीं स्थळें सुचवा ना ! '' आम्हीं म्हणालों " कां '' ती तर कॉलेजमध्यें शिकते आहे ना ? मग लग्नाची घाई कां ? त्यावर तो म्हणाला " अहो ! मला तरी कुठें घाई आहे ? पण दोन मुलींचा कॉलेजचा खर्च आपल्यासारख्या गरिबाला कसा झेपणार ? आमची दुसरी मुलगी यंदा मॅट्रिक पास झाली. तिचे मास्तर लोक सगळे आमच्याच आळींत राहातात. परीक्षेच्या वेळीं आमच्या घरीं कोण अडचणी व त्यांतून पाहुणे ! या गडबडींत ती पास झाली म्हणजे मिळविली असेंच मला वाटत होतें. ही सगळीं परिस्थिती ते मास्तर पहातच होते सुदैवानें ती परवांच मॅट्रिक बेटी पहिल्या वर्गांत पास झाली. अन मग ते सगळे मास्तर आमच्या घरीं पेढे मागायला आले. त्यांनींच मार्क वगैरे आणून सांगितलें कीं या प्रान्तातल्या मुलींत हिचा तिसरा नंबर आहे ! सगळ्या मास्तरांनीं मला साफ सांगितलें. " आम्हीं तुमचें कांहीं एक ऐकणार नाहीं. हिला कॉलेजमध्यें घातलेंच पाहिजे. येवढ्या बुद्धिमान् मुलीची हुशारी वाया दवडणार कीं काय ? '' आतां तुम्हींच सांगा काय करावें ? म्हणून ठरविलें कीं थोरलीचें लग्न करूं व हिला कॉलेजमध्यें ठेवूं ! पहिल्यापासून भिडस्त स्वभाव हा. आमचा एक दोषच आहे हें तर तुम्हाला माहीतच आहे ! ''

या आत्मस्तुतीचा आणखी एक प्रकार पहाण्यासारखा आहे. माझे मित्र बाबूराव व बापूसाहेब या कलेत मोठेच निष्णात आहे. त्या दोघांच्याही घरीं एकदां आम्हाला मेजवान्या झाल्या; त्यानंतर बाबूराव म्हणतात. " बापूसाहेबांच्या घरचा बेत फारच उत्तम होता बुवा ! सगळे पदार्थ सुंदर झाले होतें ! " आतां आम्हांला म्हणणेंच भाग आले " छे ! छे ! तुमच्या घरचा बेत खरोखरच दोहोंत चांगला होता ! तुमच्या घरीं फारच मजा आली. दुसऱ्या एका प्रसंगीं दोघांनीं मोठीच मजा केली; त्या दोघांचे मुलगे कॉलेजमध्यें शिकत होतें. बाबूराव म्हणतात " बापूसाहेब ! तुमचा मुलगा मोठा हुशार आहे. आमचा अगदीच बावळट व आळशी ! सुटीत नुसताच उनाडतो ! " बापूसाहेब उत्तरलें. " छे ! छे ! त्यानें शरीरप्रकृती किती सुधारली आहे पहा ! सुटीत हेच कार्यक्रम केलें पाहिजेत. मला तर आमच्या मुलाची चीड येतें. नेहमीं पुस्तकांत डोकें घातलेला ! " आपल्या मुलाची निंदा करून स्तुती करवावयाची हा त्यांचा डाव मला अनुकरणीय वाटला. मीही म्हणालों " आमचा छोटा मुलगा आजोळीं गेल्यानें फारच बावळट झालेला दिसला हो परवां ! " ते दोघे मित्र बेटे असें खमंग कीं आश्चर्यानें उद्गारले " खरंच कां ? आजोळीं नाहीं तरी मुलें फार दिवस ठेऊंच नाहींत !"

स्तुतीचे असे नानाविध प्रकार मला एखाद्या इंद्रधनुष्याप्रमाणें रमणीय वाटतात ! विशेष हेतू अगर दोष नसलेली आत्म वा पर स्तुती ही एक शिकण्यासारखी कला आहे असें मला वाटतें. आणि मर्यादित क्षेत्रांत ती निर्दोष, आल्हाददायक आणि रसात्मक आहे हें कबूल करावें लागेल. प्रीती व्यक्त करण्यास तर तिच्यासारखी दूती मिळणें कठीण. म्हणून तर प्रेमाच्या प्रथमावस्थेत परस्पर स्तुतीशिवाय

दुसरें संभाषणच होत नाहीं. आपलें आपल्यावर प्रेम असणें जर नैसर्गिक आहे तर आपल्याला बरें म्हटल्यानें आनंद वाटणें हेंही तितकेंच साहजिक असावें यात नवल कसलें ? माझेंच उदाहरण घेऊं. स्तुतीच्या नानाविध प्रकारांची व अंगोपांगांची मी चर्चा केली आहे ना ? पण ' हा लेख बरा लिहिला आहेत कीं ! ' असें कोणी म्हटलें तर मला मनांतून तरी आनंद झाल्याशिवाय रहाणार नाहीं हें खचित !

## " आर्यांचा ॲटम बॉंब !" : १४ :

वाणीची तिच्या मर्यादित क्षेत्रांत आपण कितीही महती गात असलों तरी क्रियेशीं तुलना करतांना आपण तिला वाचाळता असेंच अधिक्षेपक नांव देतों. नुसती क्रियाशून्य बडबड करणाऱ्याविषयीं श्रीसमर्थ म्हणतात, 'जैसें सुणें मुंकोनि गेलें !' ज्या लौकिक भाषेनें आपण व्यवहार करतों तिच्यासंबंधीं ही गोष्ट खरीच आहे. पण मन्त्र या नांवाचें आपल्याकडे एक प्राचीन शास्त्र आहे त्यातले जाणते लोक सांगतात कीं दैवी व मानुषी असे वाणीचे दोन भिन्न प्रकार आहेत. दैवी वाक् ही अत्यन्त सामर्थ्य-संपन्न असून तिच्या-पासूनच सृष्टीची उत्पत्ती झालेली आहे. आपले वेद हा अशाच दैवी वाणीचा बहुमोल संग्रह आहे. वेद ही सिद्ध वाणी असून ते मन्त्र-मय आहेत. त्यांच्या दिव्य स्वरांत उत्पादनसामर्थ्य आणि प्रत्यक्ष परिणाम घडवून आणण्याची शक्ती आहे.

शब्दांचा केवळ उच्चार वस्तू उत्पन्न करूं शकतो किंवा कार्य करूं शकतो हें विधान आपणास हास्यास्पद वाटतें. कावळ्याच्या शापानें गाई मरत नाहीत या म्हणीत आपला हा उपहास आपण ग्रथितही केलेला आहे. मन्त्रशास्त्राचा आपणहून अभ्यास करावा किंवा नाहीं हा ज्याच्या त्याच्या प्रवृत्तीचा प्रश्न आहे. पण मी म्हणतों, त्या शास्त्राच्या अभिमान्यांचें म्हणणें ऐकून घेण्याचें कुतूहल आपणास कां नसावें ? तें म्हणणें आपणास पटलें नाहीं तरी निदान नवीन विनोदस्थळें तर आपणास हस्तगत होतील ना ? बरें, मन्त्रशास्त्रज्ञानीं आपलें शास्त्र सांगतांना गूढगुंजनांची पद्धती स्वीकारली तर तें ज्ञान ग्रहण करणेंही कठीण

जाईल हें खरें आहे. कम्यूनल ॲवॉर्डच्या बाबतीत महात्मा गांधींशीं विरोध आल्यावर त्या प्रश्नावर व्याख्यान देतांना श्री. बापूजी अणे एकदां म्हणाले " आमची ही अशी तर्कशुद्ध विचारसरणी आहे. व सामान्य माणसांना कळेल अशा भाषेंत वाद करायचा असला तर ती पटवून देण्यासही आम्ही तयार आहों. पण या महात्म्यांची सगळीच तऱ्हा कांहीं लोकविलक्षण आहे. यांना असें कांहीं दूरचें दिसतें, कांहीं आंतून ऐकूं येतें. यांच्याशीं सरळ वाद करण्याची मुळीं सोयच नाहीं ! " याच्या उलट पारमार्थिक विवेचन करतांना श्रीसमर्थांनीं दासबोधात एकें ठिकाणीं स्वतःस पडलेली अडचण मोकळ्या मनानें व्यक्त केलेली आहे. रंगाच्या बाबतींत मुख्यतः काळा व पांढरा आणि त्यांच्या मिश्रणानें होणारे इतर येवढेच रंग आपणास ज्ञात आहेत. परब्रह्म हें कसें दिसतें हें सांगण्याचा प्रयत्न करतांना श्रीरामदास म्हणतात " नव्हे तें प्रकाशासारिखें। अथवा नव्हें काळोखें। आतां तें कासयासारिखें। सांगावें हो !॥ "

मन्त्रशास्त्र जाणणारे जर याप्रमाणें गूढ व अडचणीची भाषा बोलत असते तर त्यांचें ऐकून घेण्याचा सोशिकपणा दाखविण्याचें कांहींच कारण नव्हतें. पण ते तर्काच्या भूमिकेवरून बोलतांना दिसतात आणि तरीही आपण त्यांची उपेक्षा करूं लागलों तर आपल्याजवळ ज्ञानलालसा तर नाहीच पण रसिकता आणि सौजन्यही नाहीं असें सिद्ध होईल.

त्यांचें म्हणणें असें कीं, हें विशाल विश्व जेथून उत्पन्न होतें त्या मूलस्थानीं प्रथम फक्त ध्वनी असतो. ध्वनी नामक बीजरूपांत विश्व अर्थातच एकरूप व अभेदरूप असतें. सृष्टीचा आरंभ व्हायचा असला म्हणजे हा ध्वनीच स्पष्ट होतो. नंतर साहजिकच मर्यादित होतो; आणि शेवटीं तो ध्वनिच साकारस्वरूप दिसूं लागतो. म्हणजे असें कीं, ध्वनी व

तो घनीभूत होऊन बनणारी वस्तू ही एकाच तत्त्वाचीं भिन्न रुपें होत. सृष्टींत दिसणारी प्रत्येक वस्तू आणि ती ज्या ध्वनीपासून झाली तो ध्वनी यांचा हा असा जन्यजनक व नित्य संबंध आहे. प्रत्येक बाह्य वस्तूच्या मूलस्थानीं असणारा हा ध्वनी कळला व तो प्रथम जसा झाला तसा काढता आला तर ती वस्तू उत्पन्न झालीच पाहिजे ! या दृष्टीनें ' पदार्थ ' म्हणजे वस्तू या शब्दाची व्युत्पत्ती पहाण्यासारखी आहे. पद म्हणजे नाम किंवा शब्द; आणि अर्थ म्हणजे परिणाम किंवा रूप. शब्दाचा जो परिणाम तो पदार्थ. शब्दाला ' वर्ण ' असा जो उपशब्द आहे त्याचीही गंमत पहाण्यासारखी आहे. वर्ण म्हणजे रंग. कोणत्याही तत्त्वाला रंग येऊं लागला कीं तें साकार या सदरांत आलें. रंग हे साकारतेचें प्रमुख चिन्ह होय. ध्वनी हा स्पष्ट म्हणजे व्यक्त होऊं लागला कीं त्याला रंग येतो. म्हणून व्यक्त ध्वनीलाच वर्ण हें यथार्थ नांव दिलें आहें !

याप्रमाणें प्रत्येक वस्तूच्या मूलस्थानाचा जो ध्वनी असेल तेंच त्याचें खरें नांव होय. उदाहरणार्थ पाणी या वस्तूला आपण पाणी म्हणतों, इंग्रजीत वॉटर म्हणतात, संस्कृतात जल, उदक वगैरे निराळेच शब्द आहेत. पण जो ध्वनी प्रथम व्यक्त होऊन पाणी हें रूपान्तर पावला असेल त्या ध्वनीचीं जीं अक्षरें असतील तेंच पाण्याचें खरें नांव होय ! यावरून व्यवहाराच्या विविध संकेत भाषा आणि मूल भाषा असा साहजिकच भेद पडतो. वस्तूंचे मूलध्वनी मूलस्थानीं उत्पन्न करणारी ही जी मूलभाषा तिलाच छंद किंवा गूढ, झांकणारी असें म्हणतात. त्या तुलनेनें संस्कृत ही देखील सुलभ व्यावहारिक संकेत-भाषा होय !

मन्त्रशास्त्रज्ञांचा असा सिद्धान्त आहे कीं वेद हे त्या मूलभाषेचा संग्रह होत. मूलभाषेमुळें सृष्टी उत्पन्न होते म्हणूनच वेदांना सृष्टीचे

जनक किंवा सृष्टी हें वेदांचें व्यक्त स्वरूप होय असें म्हणतात. " वेद हे कोणीच लिहिलें नाहींत, नुसते ऐकले हें कसें काय बुवा ?" असा पुष्कळांना प्रश्न पडतो. आणि ते अपौरुषेय म्हणजे एखाद्या स्त्रीनें रचिले असावेत अशी कोटीही करण्यांत येते. पण वर दिलेली विचारप्रणाली मान्य केली तर वेदांना श्रुति किंवा अपौरुषेय कां म्हणतात हें उत्तमोत्तम लक्ष्यांत येईल. कोणच्या ध्वनीपासून किंवा शब्दामुळें कोणची वस्तू उत्पन्न होते याविषयींचे नियम कोण याच मानवानें ठरविलेले नाहींत. शब्द व वस्तू यांच्यामधील हा जो संबंध आहे तो स्वयंभू नित्यसिद्ध व अखंड आहे. अशा शब्दांचा जो संग्रह आहे त्यास अपौरुषेय, श्रुत म्हणू नये तर काय म्हणावें ? सृष्टीची उत्पत्ती करणारे ध्वनी त्यांत आहेत म्हणून वेदांना सृष्टिपूर्व म्हणतात. आणि म्हणूनच त्यांचे ध्येय सृष्टिकार्य होय असें मानतात.

वस्तूंना आपण दिलेलीं नांवें हीं संकेतासाठीं कांहींतरी जुजबी टोपण-नांवें असून त्यांचीं खरीं नांवें ते ते ध्वनी होत असें मानल्यावर ध्वनीचा सूक्ष्म अभ्यास करणें क्रमप्राप्तच आहे. या ठिकाणीं जड विज्ञानशास्त्रही कोणीकडे झुकत चाललें आहे पहा. सायन्सप्रमाणेंही सृष्टीला आधारभूत असें मूलद्रव्य आहेच. सृष्टीचा सर्व खेळ मूळ पर-माणूंच्या गतिस्वरूपानें होतो असें सायन्सचें आत्ताआत्तापर्यंत मत होतें. पण आतां जेम्स जीन्स वगैरेंनीं वेव्हथीअरी काढली आहे. मन्त्रशास्त्रज्ञ याच्याही मागें एक पाऊल जाऊं इच्छितात. ते म्हणतात सर्व ब्रह्मांडाचें मूलरूप आकाशतत्त्व आहे. हें जें आकाशरूप शक्ति-केंद्र यांतील एकेक बिंदू गतिमान होऊं लागला कीं बिंदूचीच रेषा तयार होते विज्ञानशास्त्रालाही मान्य असलेला गतीचा असा नियम आहे कीं ती नेहेमी वर्तुलाकारच असते. म्हणून रेषा या शेवटीं वर्तुळें किंवा कला बनतात. आकाशतत्त्व याप्रमाणें भयंकर गतीनें

आंदोळलें जातें. त्याची फार सूक्ष्म रूपें दिसतात तो प्रकाश होय. व त्याची आंदोलनें किंवा वर्तुलांचा संघात म्हणजे ध्वनी होय. मंत्र-शास्त्रज्ञांचें म्हणणें असें आहे कीं एकाच मूलद्रव्यांत ठराविक वेळांत घडलेल्या आंदोलनाच्या भिन्न संख्या म्हणजेच प्रकाश व ध्वनी होत. या दृष्टीनें ज्योती व ध्वनी हे एकच होत. किंबहुना गती व ध्वनी हेही एकच होत !

ध्वनी हा चित्शक्तियुक्त, प्रकाशमय, गतिमय व उत्पादनक्षम आहे असें निश्चित केल्यावर मन्त्रशास्त्रज्ञांनीं असेंहीं ओळखलें आहे कीं प्रत्येक ध्वनीला विशिष्ट रंग, वज़न, घनता व कंपताही आहे. स्थूल-दृष्टीनें एका अक्षराला एकच उच्चार असतो. उदाहरणार्थ ' अ ' हें अक्षर तुम्ही, मी, आपण सर्वजण सर्वसाधारण एकाच पद्धतीनें उच्चारतों. पण त्या ' अ ' चेही भिन्न भिन्न पद्धतीनें लांब, आखूड, हळू मोठ्यानें असे निरनिराळे उच्चार करतां येतील. म्हणून मूलध्वनी जो काढायचा तो अगदीं जशाच्या तसाच निघाला पाहिजे. आकाश-तत्त्वाच्या आंदोलनस्वरूपांत तो जितक्या संख्येनें म्हणजे जसा कोणाच्या दिव्य कर्णेंद्रियांस ऐकूं आला असेल तसाच तो काढला तरच परिणामदायक ठरेल. वेदांतील स्वरांचें या दृष्टीनें माहात्म्य आहे. मान खालीं वर केल्यानें लवकर पाठ होतें म्हणून किंवा मानेला आपण सहसा स्वतंत्र व्यायाम देत नाहीं तो सहजासहजीं देण्यासाठीं स्वरांचा जन्म झालेला नाहीं. स्वरांचा कांहीं निराळाच गंभीर हेतू आहे. फोनोची मूळ प्लेट रेखांकित केली कीं मग त्यांतून प्रत्येकवेळीं जसा तोच ध्वनी निघतो तसें स्वरांच्या साहाय्यानें विशिष्ट ध्वनी हुबेहुब मूल स्वरूपांत उच्चारण्याची सोय केलेली आहे.

ध्वनीचें हें दिव्य स्वरूप ओळखून सृष्टिकार्यासाठीं त्याचा उपयोग करण्याची महत्त्वाकांक्षा मंत्रवेत्ते बाळगतात. आतां तो उच्चारायचा

म्हणजे मानवी शरिराच्या वाक्शक्तीमार्फतच, हें उघड होय. वाक्शक्ती ५२ मातृकांनींच प्रगट होते. मानव शरिराची तात्त्विक दृष्टीनें कितीही निंदा होत असली तरी त्याचें मूलभूत माहात्म्य मंत्रवेत्त्यांनीं जाणलेलें आहे. शब्दाचा उपयोग मनुष्येतर प्राण्यांना करून घेतां येत नाहीं हेंच मानवी शरिराचें पहिलें वैशिष्ट्य होय. हें शरीर इतर कोणत्याही शरिरापेक्षां परिपूर्ण आहे 'God created Man after His own image' किंवा 'पिंडी तें ब्रह्मांडीं' या न्यायानें मानव शरिराचें ब्रह्मांडाशीं साधर्म्य आहे. सर्व रेषा केंद्रांत मिळतात या दृष्टान्तानुसार मानवी शरीर हें लहान असले तरी वर्तुळ रूपानें परिपूर्णच आहे. म्हणून पिंड हा ब्रह्मांडाचा केंद्र होऊं शकेल! सर्व दृष्टींचा समतोलपणा त्यांत आणणें शक्य तरी खास आहे. पिंड व ब्रह्मांड एकच असल्यावर एकात क्रिया केली तर दुसऱ्यात परिणाम झालाच पाहिजे हें उघड आहे

सायन्समध्येंही कॅटलेटिकल एजन्ट म्हणून कांहीं एक लागतें. शब्दशक्तीनें संकल्पाला प्रत्यक्ष रूप द्यावयाचें तर शरीर हेंच फक्त तें एजन्ट होऊं शकतें. इतकें ठरल्यावर तें शरीरयंत्र नीट हवें हें ओघानेंच येतें. ७२००० विविध प्रवाहांनीं शरीर चालतें. हे सर्व नाडीप्रवाह परस्परांशीं संबद्ध व मोकळे हवेत. शरीरांतील प्राण-शक्तीचे नानाप्रवाह व केंद्रबिंदू व्यवस्थित व शुद्ध असले पाहिजेत. वेद किंवा मूलध्वनी यांचा पुनरुच्चार करायचा तर शरिराचें तंतुवाद्य अनुकूल सुरांत लावलेलें हवें; तरच काढलेला स्वर हा सिद्धसंकल्प ठरेल! पातन्जल योगशास्त्राच्या साहाय्यानें शरीर याप्रमाणें प्रकृतिस्थ होतें असें मंत्रशास्त्राचें म्हणणें आहे.

पातन्जलयोग हें काय प्रकरण आहे, मंत्राला बीज असतें म्हणतात व त्यांत मंत्रांत फरक काय, मन्त्रांना लौकिक अर्थ असतात कां नसतात,

कांहीं ऋषींना मन्त्रांचे कर्ते म्हणतात तें कोणत्या अर्थानें, परा, पश्यन्ती वगैरे ज्या सूक्ष्म वाणी आहेत त्या सोडून वाक् हीच मंत्रोच्चाराला कां निवडावी वगैरे प्रश्न स्वतंत्र आहेत. हे किंवा असेच प्रश्न ज्यांना सुचतील त्यांनीं मन्त्रशास्त्राचा पद्धतशीर अभ्यासच करावयास हवा. मन्त्रशास्त्रावर म्हणून हल्लीं जीं पुस्तकें उपलब्ध आहेत, त्यांत मूलभूत सिद्धांतांचें विवेचन फारसें सांपडत नाहीं. निरनिराळ्या मन्त्रांची यादी, त्यांचे परिणाम व आलेले अनुभव यांचाच भरणा त्यांत असतो. नाममाहात्म्यावरील पुस्तकांत भाविकपणाचाच भाग अधिक आढळतो. मुलें कोणच्या मन्त्रानें होतील, संपत्ति कशानें मिळेल, चोरी कशी सांपडेल, विंचू सापावर कोणचा मंत्र घालावा इत्यादि गोष्टी माझ्यामतें गौण होत. जरा स्पष्टच बोलायचें झाल्यास, मन्त्रशास्त्रासारख्या दिव्य व पवित्र शास्त्रास आपल्या सांसारिक गाड्यास जुंपणें अनुचित होय. "वाळामन्त्र, बगुळामन्त्र" अशी यादी देऊन श्रीसमर्थांनींही या प्रकाराची दासबोधांत कांहींशीं थट्टाच केली आहे. जारणमारणादि निंद्य कर्माचेही मन्त्र आहेत व ते फलदायी होतात असें म्हणतात. मन्त्र ही एकदां शक्ती मानल्यास ती दुहेरी उपयोजितां येईल हें शक्य आहे. पण मन्त्रांचा पवित्र इतिहास व भूमिका पाहिली कीं हें विकृत स्वरूप नाशिवन्त व शेवटीं कर्त्याचाच नाश करणारें असलें पाहिजे असें निश्चित वाटतें.

सारांश, मन्त्रशास्त्र हा आर्यांचा एक प्राचीन व अद्‌भुत ॲटम-बॉंब आहे! ॲटमबॉंबचा शोध लागल्यावर सर्व जगाचे डोळे त्याजकडे लागले आहेत. सृष्टीचें रहस्यच कळलें, प्रलयकाल म्हणतात तो जवळ आलेला दिसतो, असे उलट सुलट उद्‌गार निघूं लागले आहेत. सध्यांतरी ॲटमबॉंबची भयंकर विनाशक शक्तीच प्रतीत झाली आहे. व नाशापेक्षांहि जास्त बलवत्तर सृजनशक्ति त्यांत आहे

असा हवाला देण्यांत येत आहे. या नवीन शोधाचें जिकडे तिकडे भरभरून येणारे वर्णन वाचल्यामुळें कल्पना आली कीं मन्त्रशास्त्ररूपी ॲटमबाँबची आपण जी प्रसंगानुसार माहिती वाचली व ऐकली ती एकत्र करून मांडावी. कालाच्या पोटांत काय असेल कोणी सांगावें ? परवांच्या लढाईंत टाइम्ड बाँब नांवाचे बाँब असत म्हणतात. त्यांची गंमत अशी कीं तयार करणारानें जी काय कालमर्यादा ठरविली असेल तोंपर्यंत तो बाँब गौतमबुद्धाप्रमाणें अश्राप व ध्यानस्थ बसे. आणि ठरलेला क्षण आला कीं त्याचा एकदम भयंकर स्फोट होई ! वैदिक काळांत सर्वत्र प्रचारांत असलेलें मन्त्रशास्त्र पुढील अवनतीचा काळ ओळखून वैदिक आर्यांनीं टाइम्डबाँबप्रमाणें अवगुंठित करून ठेवलें असेल. आणि विधिसंकेत असा असेल कीं ॲटम बाँबच्या शोधाबरोबर या बाँबचाही स्फोट व्हावा ! भाग्याची गोष्ट ही आहे कीं या स्फोटानें जीवनाची हानी तर होणार नाहींच; पण अज्ञानाचें तिमिरपटल व मालिन्य साफ उडून जाऊन ऋतंभरा प्रज्ञेचा उषःकाल उगवेल ! !

● ● ●

एका निबंधकारानें आपल्या एका गुजगोष्टींत मोठा गंमतीचा प्रश्न उपस्थित केला आहे. नाक, कान, तोंड व डोळे यांपैकीं एकच इंद्रिय मिळेल अशी सक्ती झाल्यास आपण कोणचीं तीन गमवण्यास तयार होऊं? थोडा विचार केला तर असें वाटतें कीं, सुवास नाहीं आला तरी चालेल; बहिरे असलों तरी विशेष अडणार नाहीं; आणि बोलतां येणें बंद झालें तर तोट्यापेक्षां फायदाच जास्त होण्याचा संभव आहे! पण डोळे जर गेले तर आयुष्यांत कांहींच राम उरणार नाहीं! निबंधकारानेंही आपल्या मनोरंजक विवेचनाच्या शेवटीं डोळे गमावण्यास मी कधींच तयार होणार नाहीं, असेंच उत्तर दिलें आहे. या बाबतींत मिल्टन कवीचें मात्र उलट उदाहरण आहे. आपण आंधळे झालों या विषयावर रचलेल्या सॉनेटमध्यें तो म्हणतो "माझी बाह्यदृष्टी गेल्यानें अन्तर्दृष्टीचा प्रकाश जास्तच तेजस्वी होईल! ( So much the rather thau ! celestial Light ! shine inward - - ) पण दृष्टी गेली हें निश्चित झाल्यानंतरचें कवीचें हें शांतवन आहे हें आपण ध्यानांत ठेवलें पाहिजे. कवी सूरदासाचीही नेत्रविषयक कथा जरा चमत्कारिक आहे तो मोळीविक्याचा धंदा करीत असतांना एका सावकाराच्या सुंदर स्त्रीवर त्याचें मन जडलें! त्याच घराच्या पायरीशीं मोळया टाकून देऊन तो तास न् तास तेथें बसून राही. थोड्याच दिवसांत सावकाराला ही गोष्ट कळल्यावर त्यानें पत्नीस सांगितलें कीं 'सूरदासाचें मनोगत पूर्ण कर!' त्याचें हें सागणें आपणास चमत्कारिक वाटतें; व 'तो परम-भक्त होता आणि सूरदासाचें परिवर्तन व्हायचें होतें म्हणून त्याने

तसें सांगितलें' असें कथेकरी समर्थन करतात त्यानें आपलें नीट समाधान होत नाहीं पण तो विषय निराळा. सावकाराची पत्नी महापतिव्रता असल्यानें देवाचें स्मरण करून व शुभ्रवस्त्र परिधान करून ती सूरदासाला बसविलें होतें त्या दिवाणखान्यांत आली. भोंवतालचें व तिचें ऐश्वर्य आणि समोरच्या आरशातील आपलें भिकारडें रूप यांचें एकसमयावच्छेदेंकरून दर्शन घडतांच सूरदासाला एकदम उपरती झाली व तो त्या स्त्रीस म्हणाला "माझी इच्छा अशी आहे कीं आपण कृपा करून तापलेल्या सळया घेऊन याव्या." पतीच्या आज्ञेमुळें व गांगरून जाऊन त्या स्त्रीनें त्या आणल्या. त्याबरोबर ती भयभीत स्त्री 'हें काय, हें काय!" असें ओरडत असतां सूरदासानें एकेक सळई आपल्या स्वतःच्या डोळयांत खूपसून घेतली; व त्या पतिव्रतेच्या चरणकमलांना वंदन करून तो परमेश्वरशोधनासाठीं निघून गेला. कांहीं काळ असा भटकत असतां तो एकदां विहीरींत पडला; तेव्हां असें सांगतात कीं, प्रत्यक्ष परमेश्वरानें त्यास वर काढलें व दर्शन दिलें. प्रसन्न होऊन देवानें त्यास दृष्टी सुद्धां दिली. त्यावेळीं सूरदासानें जें उत्तर दिलें तें मोठें बोधप्रद आहे तो म्हणाला "हे भगवन्ता! या डोळयांमुळेंच माझ्या हातून भयंकर पाप घडणार होतें; शिवाय तुझें दिव्य दर्शन झाल्यावर या भिकार जगांत पहाण्यासारखें काय राहिलें आहे? तेव्हां तूं मला आपला पुन्हां आंधळाच कर!" पण सुरदासाचे हे बोल खरे असले तरी मिल्टनच्या उद्गारांत जसें दुःखपरिमार्जन आहे तशी यांत शुद्ध परमार्थदृष्टी आहे. हीं आत्यंतिक उदाहरणें सोडून दिल्यास सर्वसाधारणतः असेंच वाटतें कीं नेत्र हे आपल्या जीवनांत प्राणाप्रमाणें आवश्यक होत!

डोळयांच्या रूपांतील नुसती विविधताच किती नवलपूर्ण आहे! काळेभोर, सावळे, पिंगट, तांबडे, घारे, निळे असे सर्व रंगाचे डोळे

दृष्टीस पडतात. मृगबाळांनीं ज्यांना पाहून झुरावें आणि जे मिटलेले असले म्हणजेच कमलांना कांहीं ऐट मिरवतां यावी अशा शामसुंदर लोचनांवर कवींनीं रामायणें रचलीं आहेत ! कांहीं घारे डोळे वटवटीत दिसत असले तरी घाऱ्यां डोळ्यांनाही सौन्दर्य आहे असें मला वाटतें. प्रा. ना. सी. फडक्यांना मात्र घारे डोळे मुळींच आवडत नसावेत. जादूगार मधील " मामी दिसल्या " या प्रकरणांत वर्णिलेली खलस्त्री मामी त्यांनीं घाऱ्या डोळ्यांची कल्पिलेली आहे. त्यांच्या इतरही एक दोन कादंबऱ्यांत घाऱ्या डोळ्यांविषयीं प्रतिकूलच विवेचन आहे. पण घारे डोळे सोडले तरी निळे डोळे मात्र खचित रमणीय वाटतात. युरोपियन लोकांत ही निळ्या डोळ्यांची मजा पहावयास सांपडले. आपल्याकडेही साधारणतः कोकणस्थांचे डोळे निळे-भोर असतात. मात्र ते हत्तीच्या डोळ्यासारखे लहान असतात ! तेजस्वी अशा निळसर डोळ्यांचा पुरुष पाहिला कीं, कां कोणास ठाऊक, पण तो बुद्धिमान व क्रान्तिकारक असावा असा माझा ग्रह होतो ! याला कार्यकारणभाव कांहींच नाहीं व मी पडताळेहि घेतलेले नाहींत; ही नुसती स्वैर कल्पनाही असेल; पण नेहेमीं वाटतें तें गंमतीनें सांगितलें येवढेंच !

सुंदर डोळे हे कमलासारखे दिसतात हें प्रसिद्ध आहे. संस्कृत काव्यांत तर कमल, कलिका अगर त्या अर्थाचा शब्द जोडल्याशिवाय नुसता नेत्र हा शब्द वापरलेला आढळतच नाहीं. पण म्हणून डोळ्यांच्या ठिकाणीं जवळ जवळ कमळेंच काढण्याची बंगाली चित्रकलेची प्रथा जरा हास्यापद वाटते. हाताच्या पंजाच्या पुढें करपल्लव म्हणून प्रत्यक्ष पल्लवच काढलेले मी पाहिले आहेत ! श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं श्री. टागोरांच्या चित्रकलेवर फार प्रतिकूल टीका केली असल्याचें मला आठवते. तुम्ही उपमा कांहींहि द्या; त्यांतील रसग्रहणहि आम्ही करूं;

पण डोळे हे डोळ्यासारखेच असल्यानें सुंदर दिसतात हें शेवटीं खरेंच आहे !

नेत्रांच्या बाह्य सौन्दर्याचा आस्वाद घेऊन त्यांच्या अंतरंगांत शिरल्यावर तेथील अर्थशोभा तर पराकाष्ठेची रंजक आहे ! मला वाटतें असा एकही भाव नसेल कीं जो लोचनांनीं व्यक्त करतां येणार नाहीं ! डोळ्यांना बोलणें, हंसणें, रडणें, रागावणें, रुसणें, खिन्न होणें, उदास वाटणें सर्व कांहीं आहे. नेत्रांना आकाशाची उपमा देऊन त्यांत व्यक्त होणाऱ्या कांहीं ठळक भावांचे मन्दाक्रान्ता वृत्तांतील खालील काव्यमय वर्णन मौजेचें आहे. •

" नेत्राकाशीं कधिं विहरतो प्रीतिचा शुक्रतारा ।
केव्हां शंका–जलद जमुनीं झांकिती प्रान्त सारा ॥
धि:काराचा तळपत कधीं चंड भानुप्रकाश ।
केव्हां भासे गगन अवघें निर्विकारी उदास ॥

गुप्त व सखोल अशा मनांतील भाव व्यक्त करण्यास किंवा ओळखण्यास भाषेपेक्षां नेत्र हे किती तरी पटीनें श्रेष्ठ साधन आहे. वाणी ही स्वभावत:च व्यक्त असून तिच्यामध्यें ध्वनी हा प्रयत्नानें आणावा लागतो. पण नेत्रांची भाषा अथपासून इतिपर्यंत अव्यक्त व व्यंजना-युक्त असते. म्हणून भावप्रदर्शन करण्यांत वाणीला गद्य तर नेत्रांना पद्य असें म्हणता येईल. संगीतांतील उपमा द्यायची झाल्यास बावन मातृकांची वाणी ही सप्तसुरांनीं मर्यादित अशी वाजाची पेटी होय; आणि नेत्र हे कोमल, सूक्ष्म आणि मधुर अशा स्वरांच्या नानाविध बारिक बारिक छटा छेडणाऱ्या तंतुवाद्याप्रमाणें होत !

प्रथम-दृष्टि-प्रेमाच्या विलास–मंदिरांत या लोचनांचें जें लीला-लाघव चालतें तें कुंजघनांतील कृष्णलीलेप्रमाणेंच अद्भुत व अवर्ण-नीय होय ! " न दावी वदोनी मनोभावना । नयनेंचि बोलोनि जिंकी

मना ॥ " " नयनें बोले। स्वागत केलें ॥" " तरल नयन तूझें हांसती मंजुभावें। स्फुट करिति तुला जें गुप्त वाटे असावें ॥ " इत्यादि कल्पनांचें तें एक महाभारतच आहे ! त्या विषयाचा यथायोग्य स्तव करण्यास, पन्त म्हणतात त्याप्रमाणें, त्याच्याच तोडीचा जातिवंत व प्रतिभासंपन्न कवी हवा.

म्हणून तो प्रान्त सोडून आपण शिशुमंदिरांत शिरलों तरी तेथेंही नेत्रांचा मनोज्ञ खेळ पहावयास मिळतो. ज्याला एक शब्दही बोलतां येत नाहीं अशा चिमुकल्या बाळाला नेत्रांची भाषा अगदीं छान उमजते. आणि आपल्या चिमण्या नेत्रांनीं प्रत्युत्तरें देतांना तो मोठीच रसिकता व्यक्त करीत असतो. मुकीं जनावरें व आपण यांमधील भावबंधनाला नेत्रांचीच सांखळी असते. माझ्या मनांत तर कधीं कधीं अशी स्वैर कल्पना येते कीं, कांहीं आकस्मिक उत्पात होऊन वाणीची ही ओबड धोबड भाषा आपण सगळेजण विसरून गेलों तर मानवजातीला फारच थोड्या दिवसांत पशुपक्ष्यांशीं नेत्र–मीलनानें उत्तम बोलतां येईल ! निदान त्यांची भाषा खास कळूं लागेल !

मनांतील भाव व्यक्त करण्याप्रमाणेंच बाह्य विषय ग्रहण करण्याची नेत्रांची शक्तीही विलक्षण आहे. श्रीकृष्णचंद्राचें शामसुंदर मुखमंडल पहातांना राधिकेच्या सर्व इंद्रियांच्या शक्ती एकट्या नेत्रांत कशा केंद्रित झाल्या; आणि ' वाटे नयन कधीं न मिटावें। सतत तयाला बघत रहावें। बघतां बघतां जावो दैवें। प्राण कुडीमधुनी '॥ या अंजनीगीतांत वर्णन केल्याप्रमाणें तिची कशी विदेही स्थिती झाली याची मोठीं सुरस वर्णनें गोकुलगीतांत वाचावयास सांपडतात. " दौलत " या प्रसिद्ध कादंबरींतील कांचनची पळवून नेलेली पत्नी मधुरा अनेक वर्षांनीं अचानकपणें त्याला प्रथम भेटली त्या सुप्रसंगीं दुरूनच घडलेल्या नुसत्या नेत्रमीलनानें उभयतांना आलिंगनसौख्याचा

लाभ झालासें वाटलें असें वस्तुतः सत्य व काव्यमय वर्णन प्रो. फडके यांनीं केलें आहे.

माणसाचा खरा स्वभाव ओळखण्यासही नेत्रांसारखे दुसरें अचुक साधन सांपडणें कठीण आहे. आयुष्यांत कांहीं खरकटें असलेला अपराधी मनुष्य इतरांच्या नजरेला नजर देऊं शकत नाहीं हें सर्व-परिचित आहे. श्री. गडकऱ्यांचें या संबंधीं एक बोधवचन आहे. बंडगार्डनवरील स्वगत भाषणांत सुधाकर म्हणतो "सुंदर परन्तु निर्दोष वस्तूकडे पापी मनाला ओशाळेपणामुळें उघड्या डोळ्यांनीं पहाण्याचा धीर होत नाहीं."

श्रीरामकृष्ण परमहंसादि सत्पुरुषांचीं चरित्रें वाचलीं तर कित्येक वंचकांना व अपराध्यांना त्यांनीं नुसतें डोळयावरून कसें चटकन् ओळखलें या विषयींच्या आश्चर्यकारक कथा आढळतात; पापी नजर ओळखण्याची स्त्रियांची उपजत शक्ती तर कांहीं अद्भुतच आहे. प्रो. फडके यांनीं आपल्या एका कादंबरींत याचें मोठें सयुक्तिक कारण सुचविलें आहे. त्यांचें म्हणणें असें कीं, स्त्रिया या जात्याच दुर्बल व प्रतिकारास अक्षम असल्यानें दुरूनच पाप ओळखून सावध होण्याची शक्ती निसर्गानें त्यांना दिलेली असावी. यासंबंधींची एक गोष्ट ऐकण्यासारखी आहे. मी एका मित्राकडे जेवावयास गेलों असतांना जेवणानंतर गप्पा करीत असतांना त्याची पत्नी तेथें येऊन म्हणाली "आपण जो नवा आचारी ठेवला आहे त्याला काढून टाकावा असें मला वाटतें. त्याची नजर कांहीं चांगली नाहीं!" माझा मित्र जरा हेकडच होता. तो तिला विचारी "तो चांगला नाहीं म्हणजे काय करतो?" आणि ती म्हणे "तसं मला कांहीं सांगतां येणार नाहीं. पण तो चांगला नाहीं येवढें खरें." मी अर्थातच मधें कांहीं बोललों नाहीं. पण त्या बाई निघून गेल्यावर

ग्रं. क्र. ९८८७६७

मी म्हणालों " तुझी बायको तुझ्यापेक्षां शहाणी दिसते. असल्या बाबतींत बायकांचा अंदाज अचुक असतो. तिला कारणें विरणें विचारण्याच्या फंदांत न पडतां तूं त्या आचाऱ्याला मुकाट्यानें काढून टाकावेस हें बरें ! "

मनुष्यानें अगदीं गुप्त म्हणून लपवून ठेवलेलें पाप चव्हाट्यावर आणण्यात नेत्र हे गुप्त पोलिसाप्रमाणें तरबेज आहेत. पण त्यांची कामागिरी अशी एकांगीच नाहीं. सज्जनांच्या निर्मल आणि निरागस अन्तःकरणाचें सुंदर प्रतिबिंब दाखविण्याचेंहि पुण्यकर्म ते करतात. थोर पुरुषांच्या तेजस्वी नेत्रांत त्यांचें उदात्त स्वभावचित्र ठळकपणें उमटलेलें दिसतें. लोकमान्यांच्या चरित्रग्रंथांत त्यांच्या फोटोविषयीं लिहितांना श्री. केळकरांनीं लिहिलें आहे कीं, ' टिळकांचीं हुबेहुब छायाचित्रें पुष्कळ निघालीं आहेत; व त्यावरून त्यांच्या बाह्य शरीराची यथार्थ कल्पनाहि येते. पण त्यांच्या नेत्रांतील असामान्य तेजस्विता एकाही फोटोंत उमटलेली नाहीं. ' आणि खरेंच नाही तरी ! निर्जीव फोटोत तें जिवंत तेज कसें उमटणार ? हे पुरुषश्रेष्ठ रूपानें साधारणच असतात. सॉक्रेटीससारख्यांची गणना तर कुरूपांतच केलेली आहे. पण त्यांच्या नेत्रांचें सौंदर्य निराळ्या प्रकारचें आहे. मदिराक्षीप्रमाणें मादक, मृगनयनेप्रमाणें शामल व चंचल, कामिनीप्रमाणें लाघवी अगर अभिसारिकेप्रमाणें आर्जवी असे कांहीं ते डोळे दिसत नाहींत. कितीही वाखाणलें तरी वरील स्त्रियांचे नेत्र शेवटीं बाह्य सौंदर्याचेंच प्रतीक होत. आध्यात्मिक सौंदर्य म्हणून कांहीं चीज असेल तर त्याचें मनोहर दृश्यस्वरूप म्हणजे या सत्पुरुषांचे नेत्र होत यांत शंका नाहीं. त्यांच्या नेत्रांचें तेज शुक्राच्या ताऱ्याप्रमाणें तेजस्वी, शांत व निर्मल असतें. निरांजनाच्या पवित्र ज्योतीप्रमाणें तें आपल्या नेत्रांना गारवा देणारें असतें. असल्या एखाद्या तरी पुण्यपुरुषाचे शांत,

तेजस्वी व शोभिवंत नेत्र ज्यांनीं पाहिले नसतील ते खरोखर अभागी होत !

नेत्र हे याप्रमाणें नितांत रमणीय, प्रभावी व सव्यसाची आहेत. नाक, कान, तोंड, डोळे या चार इंद्रियांपैकीं कोणचें एक गमावण्यास तुम्ही कधींहि तयार होणार नाहीं ? या निबंधकाराच्या प्रश्नास ‘ डोळे ’ असें आपण सर्वजण अगदीं डोळे मिटून चटकन् उत्तर देऊं. नेत्र हे आपल्या जीविताचे केवळ सारसर्वस्व होत. मनुष्य मरण पावला म्हणजे त्यानें डोळे मिटले असें आपण म्हणतों यांत तरी दुसरा काय अर्थ आहे ?

# " उदात्त रस " : १६ :

एकदां एका ज्ञानोपासक मंडळाच्या चर्चेला हजर राहण्याचा सुयोग मला आला. मी नवखाच होतों व परगांवीं एका मित्राबरोबर सहज कुतूहलानें गेलों होतों. उदात्त रसाबद्दल स्वतःस आलेला अनुभव सांगायचा असें त्यांचें ठरलेलें दिसलें. निवडक लोकांचा खाजगी सुखसंवाद असल्यानें त्यांत मोकळेपणा होता व वक्तृत्वाची हौस अगर आवश्यकताहि नव्हती. मला ती चर्चा मोठी आवडली. एकानें असें सांगितलें कीं त्याचे वडील ज्या दिवशीं वारले त्या रात्रीं तो मोठा चिंतेत होता. तो शिकतच होता. जबाबदाऱ्या मोठ्या होत्या; आणि विशेष म्हणजे त्या प्रसंगाला व पुढील महिन्याला पुरेसे पैसेही त्यांच्या जवळ नव्हते. सारखीं जाग्रणें झालीं असल्यानें पहाटे त्याचा डोळा लागला. सकाळीं जागें झाल्यावर त्याला कळलें कीं गांवांतील एक मित्र पहाटे फिरावयास जातांना त्याच्याकडे येऊन एक पत्र देऊन गेला होता. यानें पत्र उघडून पाहिलें तो त्यांत एक शंभर रुपयांची नोट होती व फक्त एवढाच मजकूर होता. ' तुझ्या घरची परिस्थिति मला नक्की माहीत नाहीं. पण हे पैसे जवळ असूं द्यावे. अगदीं तुझ्या सवडीनें परत कर. ' या प्रसंगाला पुष्कळ वर्षें लोटलीं असावींत. पण त्यावेळीं सांगतांनाही सद्गदित होऊन तो म्हणाला " माझ्या आयुष्यांत उदात्त रसाचा असा दुसरा अनुभव मला आलेला नाहीं !

दुसऱ्या एकानें सांगितलें कीं, तो काशीस संस्कृत पाठशाळेंत शिकत होता. विलायतेस जाऊन शिक्षण घ्यावें व देशकार्य करावें असें त्याच्या फार मनांत होतें. त्यावेळीं एक पुढारी विलायतेस जाणार आहेत असे कळतांच यानें त्यांना पत्र पाठवून कळविलें कीं ' तुमचा सेक्रेटरी,

आचारी, पाणक्या कांहींहि होण्यास मी तयार आहें. पण मला तुमच्या बरोबर घेऊन जा.' त्यांच्या संस्थेकडून उत्तर आलें कीं ते पुढारी याला आपल्या खर्चानें नेण्यास तयार आहेत; पण वेळ थोडा असल्यानें पासपोर्टची व्यवस्था मात्र याला करावी लागेल; इतकें सांगून तो म्हणाला "हें पत्र आलें त्या दिवशीं मी अतिशय निराश झालों. माझ्यासारख्या असहाय माणसास पासपोर्ट मिळणें शक्य नव्हतें. ते पुढारी माझ्या परिचयाचे असल्यानें मला नक्की नेतील अशी खात्री होती. पुन्हां आपल्या आयुष्यांत असा सुयोग येणें नाहीं या कल्पनेनें मी विषण्ण होऊन गेलों. रात्रींच्या वेळीं गंगेच्या कांठीं जाऊन स्वस्थ बसलों. कांहीं वेळानें मला गीतेतील एक श्लोक ऐकूं आल्याचा भास झाला. कदाचित आठवलाहि असेल. पण त्या श्लोकाबरोबर माझ्या अन्तःकरणांत असा कांहीं उल्हास व आनंद भरून आला कीं, आईनें पाठीवरून हात फिरवावा तसें माझें मन निवांत व शांत झालें! त्या दिवशीं मला जो उदात्त रसाचा अनुभव आला तो केवळ अपूर्व होय! पुढें मला विलायतेलाहि जायला मिळालें; पण तो कथाभाग विषयान्तर होय.''

तिसऱ्या एकानें कादंबऱ्यांतील दोन सरस प्रसंग सांगितले. त्यापैकीं एक असा....ला मिझरेबल या प्रसिद्ध कादंबरींत एपोनाइन नांवाच्या एका निर्धन अशिक्षित व कुरूप मुलीचें स्वभावचित्र आहे. तिचें मॉरिसवर प्रेम जडतें. पण तो कॉसेटी नांवाच्या लावण्यवतीसाठीं वेडा झालेला असल्यानें एपोनाइनला आपल्याबद्दल कांहीं मधुर भावना असेल हें त्याच्या गांवींहि नव्हतें. पण ही मुलगी निरपेक्ष प्रेमानें त्याला सतत मदत करते, त्याला नाना संकटांतून वाचवते व शेवटीं अंतस्थ बंडाळीची लढाई चालू असतांना त्याजवर रोखलेल्या बंदुकीवर स्वतःचा हात धरून स्वतःचे प्राण अर्पून त्याचा जीव वाचवते! तिनें पुरुषाचा पोषाख केलेला

असल्यानें मॉरिस तिला ओळखतहि नाहीं. पण ती आपलें रूप प्रगट करून आपल्याला गोळी कां व कशी लागावी हें मॉरिसला सांगते. ती मॉरिसच्या बाजूचा कोणी पुरुष असावा या विश्वासानें कॉसेटीनें मॉरिससाठीं एक प्रेमपत्र तिजजवळ दिलेलें असतें तें क्षणिक सवतीमत्सरानें तिनें त्याला दिलेलें नसतें. तेंहि उदार अंत:करणानें ती त्याला देऊन टाकते व एकच विनंती करते कीं ती मेल्यावर मॉरिसनें तिचें ललाटचुंबन घ्यावें ! मॉरिसनें तिच्या विनंतीवरून तिचें डोकें मांडीवर घेतलेलें असतें. तो जरी उदासीन होता तरी कृतज्ञतेमुळें तिचें म्हणणें कबूल करतो. ती कांहीं वेळ शांत झालेली पाहून तो वचन पुरें करण्यास निघतो तोंच नेत्र उघडून ती हंसून म्हणते ' जरा थांब ! इतकी घाई कां करतोस ? मी फार वेळ तुला ताटकळत ठेवत नाहीं. ' नंतर क्षणभरच स्वस्थ पडून डोळे अर्धवट उघडत खोल आवाजांत मोठ्या कष्टानें एकेक अक्षर उच्चारीत ती म्हणते " मॉरिस ! तुझ्यावर माझं थोडसं प्रेम जडलं होतं, नाहीं ? " लगेच तिचा प्राण जातो ! हा कथाभाग सांगून तो गृहस्थ म्हणाला "ला मिझरेबल या लांबलचक कादंबरीतील या एपोनाइनचा कथाप्रसंग जेथें जेथें आहे त्या पानांच्यावर खुणा करून त्यांचें मी एक सूचीपत्रच तयार केलें आहे. तेवढाच भाग मी पुन्हा पुन्हां वाचतों; व प्रत्येक वेळीं मला उदात्त रसाचा निरतिशय लाभ होतो."

याप्रमाणें कोणी कांहीं, कोणी कांहीं, असे आपापले अनुभव सांगितले. थॉमस हार्डी याच्या टेस कादंबरींतील नायक रूढ विचारांच्या दास्यत्वामुळें टेस-नामक आपल्या सुशील व प्रेमळ पत्नीचा त्याग करून परदेशास निघतो त्यावेळीं पूर्वी त्याच्यावर प्रेम करणारी एक मुलगी त्याला भेटते. वैतागानें तो तिला बरोबर चल म्हणतो. ती तयार होते. जातां जातां ' तुझें टेसपेक्षांही माझ्यावर जास्त प्रेम

आहे कां ? ' असें तो विचारतो. त्यावर ती सरळ मनाची मुलगी उत्तर देते " नाहीं. खचित नाहीं. टेसनें तुझ्यासाठीं हंसत प्राण दिले असते. दुसरे कोणी झालें तरी जास्त काय करणार ? " हा प्रसंग एकानें सांगितला. आणखी एकानें डोस्टोएव्हेक्सीच्या ' थ्री ब्रदर्स कॅरॅमझाव ' या कादंबरींतील मिट्या हा खोटा आरोप येऊन विनाकारण तुरुंगांत गेला असतांना झोपेंत त्याच्या डोक्याखालीं कोणी उशी ठेवलेली त्याला आढळली व या अभावित दयेनें त्या मनःस्थितींत त्यास अतिशय गंहिंवरून आले, ही कथा वर्णन केली. नवरा मुलगा वाजत गाजत वधूगृहीं येतांना वधूचा पिता दाराशीं त्याचें स्वागत करतो तें रम्य दृश्य पाहून आपणांस विलक्षण गहिंवर येतो असें एकानें सांगितलें. काकडआरतीच्या अगर दीपज्योतीच्यावेळीं देवालयांत टाळ-मृदंगाचा व हरिनामाचा प्रचंड गजर होतो त्या नादानें आपले अंत-रंग उदात्त रसांत लय पावतें असेंही कोणी सांगितलें. मी संक्षेपतः दिलेले हे अनुभव मला विशेष आकर्षक वाटले नाहींत.

पण वर जे तीन ठळक अनुभव वर्णिलें आहेत त्यांपैकीं गंगातटा-वरील चित्शक्तीच्या क्षणिक स्पंदनाचा भास सोडून दिला तर इतर दोन अनुभवावरून उदात्त रस हा त्याग आणि मनाचें औदार्य या दोन गुणांनीं उत्पन्न झालेला आहे असें दिसून येईल. आणि उदात्त रसाची आणखीही उदाहरणें गोळा केली तरी हे दोनच गुण त्याला विशेष कारणीभूत आहेत, त्याचे स्थायी भाव आहेत असाच निष्कर्ष निघेल, असें वाटतें. या विज्ञानयुगांत भोगवादाला कितीही प्राधान्य मिळो; आणि मनुष्य–स्वभाव हा मूळचा स्वार्थी आहे हें आपणांस स्वतःच्या आणि इतरांच्या उदाहरणावरून पुनः पुनः कितीहि पटो; एक गोष्ट मात्र निर्विवाद आहे कीं त्याग व औदार्य या भाव नांच्या पुढें आपलें मस्तक न कळत नम्र होतें. बुद्धिवादानें या दोन

गुणांची सहजता व सौभाग्य सिद्ध करतां येणार नाहीं असें नाहीं. अर्थात उत्क्रांती, उपयुक्तता अगर भोग असल्या वादांच्या आहारी मात्र जाऊन चालणार नाहीं 'बळी तो कान पिळी' असा सृष्टीचाच कायदा आहे असें गृहीत धरल्यावर दुसऱ्यावर उपकार करण्याचेंच कांहीं प्रयोजन रहात नाहीं. पण त्याग आणि प्रेम हेंही सृष्टीचें मूलभूत नियम आहेत हें लक्षांत घेतल्यावर त्याग आणि औदार्य या गुणांनीं मनुष्य इतरांचे व म्हणून स्वतःचें शाश्वत कल्याण करूं शकतो असें उच्च तत्वज्ञानांनीं सिद्ध केलें आहे. पण माझ्यामतें या गुणांच्या रसग्रहणांत बुद्धिवाद आणणें अरसिकपणानेंच ठरेल. प्रत्यक्ष हृदयाची साक्ष तेथें छिन्नसंशय करते त्या ठिकाणीं बुद्धीचा टेंभा हवा कशाला ?

इमर्सन म्हणतो कीं, शीलवन्त पुरुषाचें शील हें विशिष्ट लक्षणांनीं व प्रसंगांनीं दृष्टीस पडत नाहीं. त्या शीलाच्या तेजानें आपण भारावून जाऊन आपणास त्याच्या सामर्थ्याची जाणीव मात्र होते. गुरुत्वाकर्षणाप्रमाणें किंवा उत्तरध्रुवाकडे सतत दृष्टी ठेवणाऱ्या दिग्यंत्राप्रमाणें शीलाचें आकर्षण हा सृष्टिनियमच होय ! त्याग आणि औदार्य यांचें श्रेष्ठत्वही असेंच स्वयंसिद्ध व स्वयंप्रकाशी आहे !

## " मित्र–भाव " : १७ :

प्रतिक्षणाला नवनवीन रूप धारण करते ती खरी रमणीयता असें सौंदर्याचें लक्षण केलेलें आहे. या दृष्टीनें मित्रभाव हा विषय रमणीयच ठरेल. कित्येक नामांकित लेखकांनीं यावर आपले विचार मांडले आहेत. पण सुरेख चाल असली कीं त्यावर आपणही एकादें पद रचावें असें प्रत्येकच कवीला वाटते. तसा हा विषय अवीट आहे.

तसें पाहिलें तर जीवनाच्या सर्व अवस्थांत सर्वांनाच कोणी कोणी मित्र असतातच. पण दुसऱ्याचे मित्र होण्यास अगर दुसऱ्याला मित्र करून घेण्यास खरोखर पात्र असे लोक फार विरळा असेंच विचारांतीं दिसून येईल. कित्येकांचा स्वभावच इतका उथळ व वर वर पहाणारा असतो कीं त्यांच्या अन्तःकरणांत मित्रभाव रुजणेंच शक्य नसते. ते सर्वांचेच मित्र असतात व खरे कोणाचेच नसतात ! दुसरे कांहीं इतके स्वार्थी व स्वतःचेच पहाणारे असतात कीं त्यांना खरा मित्र लाभणें शक्यच नसतें. सुदैवाने तसा जीव त्यांच्या जवळ आला तरी यांचें चरित्रचक्र स्वतःभोंवतींच इतकें जोरानें फिरत असतें कीं तो बाहेर फेकला जातो. उथळपणा व स्वार्थ अंगीं असणारा मनुष्य मित्रभावाला अपात्र ठरतो तीच स्थिती आंतल्या गांठीच्या मनुष्याची असते. स्वतःचें सुखदुःख, बेत, विचार दुसऱ्याला कळावे अशी याला नैसर्गिकच आवड नसते. कांहीं मुलांची सहजप्रवृत्ति पहाण्यासारखी असते. त्यांना इतरांबरोबर खाऊ दिला तर सर्वांनीं मिळून खावासा त्यांना वाटत नाहीं. इतरांचा संपला म्हणजे अगर एकटेंच दूर जाऊन एकटें एकटें खाण्यांत त्यांना खरा आनंद वाटतो. तसें यांचें असतें.

म्हणून मला असें म्हणावेसें वाटतें कीं, मित्रभाव उत्पन्न होण्यास पहिला कोणचा गुण लागत असेल तर तो मनाचा मोकळेपणा व उमदेपणा. एखाद्या सांचलेल्या डबक्याप्रमाणें मनाची स्थिती नसावी. मन कसें झऱ्यासारखें जिवंत खेळतें असलें पाहिजे. आंतून बाहेरून त्यांत पाणी सारखें येत राहिलें पाहिजे. तसेंच सतत तें वाहूनही गेलें पाहिजे. आपलीं दुःखें दुसऱ्यास सांगावी, दुसऱ्याचीं ऐकावीं, दुसऱ्याच्या सुखांत मनापासून आनंद वाटावा; स्वतःचें सुख सहवासा-शिवाय अळणी वाटावें; चार टोले द्यावे, खावे विसरावें, अशा मनःप्रकृतीच्या मनुष्यासच खरे मित्र लाभण्याचा संभव आहे. कुड्या स्वभावाच्या लोकांनीं टेनिसन कवीची वॉरिअर ही कविता जरूर वाचण्यासारखी आहे. पतिशोकानें विव्हळ झालेल्या स्त्रीचें वर्णन करून तो म्हणतो ( " she must weep or she will die ! " ) " जवळच्यांना वाटलें ही आतां एकदां मनसोक्त रडली पाहिजे; नाहींतर दुःखभारानें गुदमरून ही मरून जाण्याचा संभव आहे ! "

संकटकाळीं आपणांस मदत करतो तो खरा मित्र अशी व्याख्या सर्वश्रुत आहे. कवीनेंही म्हटलें आहे. ' कठिण समय येतां कोण कामास येतो ? ' आपला मित्र कोण हें ओळखण्याचें वरील साधन उत्कृष्ट होय हें मला मान्य आहे; पण याच्या जोडीला दुसरें एक गमक सुचवावेसें मला वाटतें. बरोबर जुळतें का पहा. प्रत्येक सुखाच्या प्रसंगीं ज्याची आपणांस चटकन आठवण होते; ज्याच्या गैरहजरीनें सुखांतील स्वारस्यच निघून जातें तो आपला मित्र समजावा. कोणी म्हणतील, दारूबाजानांहीं दारू प्यायची वेळ झाली कीं एकमेकांची अचुक आठवण होते. पण एक तर तेथें मित्रापेक्षां दारूचीच आठवण होत असली पाहिजे. आणि दुसरे म्हणजे मित्र नसला तर दारू पिऊं नये असें वाटणार नाहीं; किंवा मित्रानें येऊन सगळी दारू

एकट्यानें पिऊन टाकली तरीही चालणार नाहीं. सद्भक्ताचें खरें लक्षण काय समजतात ? संकटकाळीं आपणा साऱ्यांनांच देव आठवतो. पण आनंदाच्या काळींहि ज्याला प्रथम देवाचें स्मरण होतें, प्रभु-कृपेचा तो प्रसाद त्याच्या चिंतनांतच लुटावा अशी ज्याच्या मनाची घडण होते तोच परमभक्त होय. व्यवहारांतलाही एक नेहेमींचा अनुभव आहे. एकाद्या मित्राकडे मोठी मेजवानी झाल्यावर आपणांस बोलावलें नाहीं किंवा बोलावून आपणांस जातां आलें नाहीं तर, आपणांस मोठाच विषाद वाटतो. इंग्रजींत एक चुटका आहे कीं अशा गैरहजर राहिलेल्या एका मित्रानें दोन चार दिवसांनीं यजमानाची भेट झाल्यावर मेजवानीस न येण्याचें कारण सांगून दिलगिरी व्यक्त केली. त्यावर यजमान म्हणतो '' म्हणजे ? तुम्हीं नव्हता वाटतं ? '' मेजवानीचा अगर हसण्याखेळण्याचा आनंद बुडाला यापेक्षां सुख-सेवनाच्यावेळीं आपण नसल्याची दखलगिरीही नसावी, त्यानें कांहींच उणीव भासूं नये याचेंच शल्य आपणांस जास्त बोंचतें. श्रीरामचन्द्राचे भक्त रामायण वाचतांना आठवणीनें प्रथम मारुतीसाठीं पाट मांडून ठेवत असतात. आनंदोत्सवाच्या प्रत्येक प्रसंगीं ज्याच्या घरीं आपल्या गैरहजरीनें आपला पाट रिकामाच राहील तो आपला खरा मित्र समजावा.

खऱ्या मित्राचीं लक्षणें कोणचीं किंवा मित्र ही या दुनियेंत किती दुर्मिळ चीज आहे याची यथार्थ कल्पना करून न घेतल्यानें पुष्कळ लोक भलभलत्याच लोकांना आपले मित्र समजतात; विशेष श्रीमन्त व नांवाजलेल्या गृहस्थाविषयीं ' तो एक आमचा फ्रेन्ड आहे ' असा उल्लेख करण्यांत कांहींना मोठें भूषण वाटतें. एकदां असें झालें कीं थिऑसोफिस्ट लोकांप्रमाणें नर्म आणि शालीन वागणुकीच्या परगांवच्या एका गृहस्थाकडे माझ्या एका मित्राला चार सहा दिवस राहण्याचें काम

पडलें. परत आल्यावर ह्या गृहस्थाच्या आदरातिथ्याची, गोड स्वभावाची व जिव्हाळयाच्या वागण्याची माझ्या मित्रानें मजजवळ खूप स्तुती केली. व आपणास एक मित्र मिळाला असें सांगितलें. मी नुसतें हंसल्यासारखें केलें. पण कांहींच बोललों नाहीं. कर्मधर्मसंयोगानें कांहीं दिवसांनीं लकडी पुलावरून माझा मित्र व मी जात असतांना समोरून तो गृहस्थ मोटार-सायकलीवरून आला. त्यानें या मित्राकडें नुसतें पाहिलें नाहीं कीं हंसल्यासारखेंहि केलें नाहीं. तेव्हां त्याच्या डोक्यांत उजेड पडला. तो म्हणाला " तूं त्या दिवशीं नुसता हंसलास त्याचें मर्म आज मला उमजलें " मी उत्तर दिलें " त्या गृहस्थाची मला थोडीशी माहीती आहे. तो चांगला आहे. त्याचें सौजन्य व गोडवेपणा खरोखरच घेण्यासारखा आहे. पण ज्यांच्याशीं काम पडेल त्या सर्वांशीं तो असाच वागतो. व साहजिकच तें तेवढ्यापुरतेंच असतें. तितक्यानें आपण त्यांस मित्र समजलों तर ती आपलीच चूक होय. ओघानें आला म्हणून तुला माझा एक नियम सांगतों. मोटारींतून चाललेला कोणी माझा मित्र भेटला तरी त्याला मी प्रथम नमस्कार कधींच करत नाहीं. त्याचें लक्ष गेलें व त्यास वाटलें तर तो करीलच; पण आपण नमस्कार करून तो तसाच गेला तर मात्र भोंवतालच्या लोकांत फार चोरट्यासारखे वाटतें ! "

म्हणून मला तर खरोखर असें वाटतें कीं आपल्यापेक्षां वरच्या दर्जाचा आयुष्यक्रम घालविणाऱ्यांशीं मैत्री करण्याच्या भानगडींतच आपण पडूं नये हें बरें. 'गरीबाची करावी,' ही व्यावहारिक म्हण मैत्रीलाही लागूं पडते. पाणी आपल्याच पातळींत नेहमीं रहातें हा सृष्टि-नियम मैत्रीच्या बाबतींतहि खरा आहे.

मित्रभावांत कोणचीं विघ्नें टाळावीं असा विचार करूं लागलें कीं पैशाचा संबंध टाळावा असें चटकन् मनांत येतें. Lend a man

money and make him your Enemy (पैशाचा संबंध आला कीं मित्रांत बखेडा ठरलेला! ) अशी इंग्रजींत म्हणच आहे. "अडी अडचणीच्या प्रसंगीं मित्रच उपयोगी पडणार. मित्रानेंही पैसे देऊं नये हा मैत्रींतला कोकणस्थी न्याय दिसतो!" असें कांहींना वाटेल. पण माझ्या म्हणण्याचें मर्म पहा. गरज पडल्यावर मित्रच उपयोगी पडेल हें खरें. आणि मित्रासाठीं घरादारावर तुळशीपत्र ठेवणारे वंद्यच होत. पण याला पैशाचा व्यवहार म्हणताच येणार नाहीं. मित्राला पैसे देण्याचा प्रसंग आला व जवळ असले तर अवश्य द्यावे; पण ते निःस्वार्थी बुद्धीनें, परत मिळतीलच असा जीव गुंतवून न ठेवतां द्यावे– देऊन टाकलें असें समजावें. पैसा व मित्र या दोन्ही डगरींवर हात ठेवले कीं मित्र गमावला अशीं पुष्कळ उदाहरणें सांपडतील. "आपल्याजवळ रहात नाहींत; यानें मागितलेच आहेत तर तेवढीच त्याच्याजवळ आपली शिल्लक पडेल. कदाचित् व्याजही मिळेल. अमक्यावेळीं नक्की देईन ह्मणाला आहे तो देईलच; त्याला आपण उपकृत केलें आहे" असे नाना प्रकारचे हेतु असले तर त्यांचा शेवट भांडणांतच होतो याबद्दल कांहींच संशय नाहीं.

माझे एक स्नेही एकदां म्हणाले "दोन मित्र कांहींच न बोलतां गालांतल्या गालांत नुसते हसले कीं त्यांचा अध्याहृत विषय स्त्री आहे असें नक्की समजावें!" हा अध्याहृत विषय मैत्रीला मोठाच मारक आहे हें खालील गमतीदार गोष्टीवरून दिसून येईल. एका गांवांत दोन जिवलग स्नेही होते. त्यांची ख्याती अशी कीं प्रत्यक्ष कळीच्या नारदासही त्यांच्यांत तेढ आणतां यावयाची नाहीं. पण तो विडा एका सुंदर स्त्रीनें उचलला. कांहीं दिवस दोघांशींहि मैत्री करून एकदां ती त्यांना घेऊन फिरावयास गेली. एकाच्या बरोबर ती चालत होती. त्याच्या कानाशीं नुसतें पुटपुटून ती हंसत

निघून गेली. मागचा जवळ आल्यावर पुढच्यास म्हणतो " तिनें तुला काय सांगितलें ? " पुढच्याला खरोखरच कांहीं सांगितलेलें नसल्यानें तो बिचारा म्हणाला " कांहीं नाहीं " पण दुसऱ्यानें तिला पुटपुटतांना पाहिले असल्यानें त्याचा या उत्तरावर विश्वास बसेना. थोड्याच दिवसांत ते वैरी बनले !

मैत्रीवर असेंच आणखी कितीतरी लिहितां येईल. पण कोणी विनोदी वाचकमित्र म्हणतील " मित्रामध्यें एकवेळ गुण नसले तरी आम्हाला चालतील; पण चऱ्हाट वळण्याचा दुर्गुण नसावा ! " म्हणून येथेंच थांबावें हें बरें. कारण प्रत्यक्ष लेखनापेक्षां मैत्रीचा नुसतां संभवहि मला अधिक प्रिय आहे !

# राखावीं बहुतांचीं अंतरें! : १८ :

माझ्या ओळखीचे एक पंडितजी आहेत. ते विद्वान्, मनानें प्रेमळ आणि थोर आहेत. पण त्यांच्या वाणीला पूर्वजन्मीचा कांहीं शाप असावा. 'परान्तरास- न लावावा ढका' हा रामदासांचा सल्ला ती मुळींच जुमानत नाहीं. सर्वसाधारण संभाषणांत दुसऱ्यांच्या मनाशीं विरोधी संघर्ष करण्याचीच तिची लकब आहे. ते माझ्याकडे आले कीं साहजिकच 'थोडा चहा घ्याल का?' म्हणून मी त्यांना विचारतों आणि त्यांचें ठरलेलें उत्तर असतें "भला चहा नको आहे. उगीच काय उठल्यासुटल्या चहा प्यायचा?" एखाद्या वेळीं ते आल्यावर मुद्दामच चहा न विचारतां मी बोलूं लागलों ह्मणजे ते म्हणतात, "आधीं दोन कप चहा घरांत सांगून या बरें; मग मी ज्या कामासाठीं आलों आहे तें सांगतों!" एकदां कांहीं कार्यासाठीं त्यांना तरुण स्वयंसेवकांची जरूरी होती. त्याबद्दल भाषण करतांना ते म्हणाले, "मॅट्रिकची परीक्षा सध्यां संपली असल्यानें पुष्कळ रिकामटेकडे विद्यार्थी टिवल्याबावल्या करीत रस्त्यानें हिंडतांना दिसतात. उद्यांपासून त्यांनीं या कामासाठी मला येऊन भेटावे!" कांहीं दिवसांपूर्वीं आगगाड्यांची टक्कर होऊन मोठाच अपघात झाला. त्याची गोष्ट निघाल्यावर मी सहज म्हणालों, "माझा एक स्नेही त्या वेळीं गाडींत झोपलेला होता. परमेश्वरकृपेनें व आयुष्याची दोरी बळकट म्हणून तो अलगद गाडीच्या बाहेर फेकला गेला व वांचला!" यावर हे म्हणतात, "मग? गाडींतले सगळेच लोक कांहीं मेले नाहींत!"

हीं उदाहरणें ऐकून कांहीं वाचकांना अशी शंका येईल कीं, या

गृहस्थांना प्रेमळ वगैरे विशेषणें वर लाविलीं आहेत त्यांत कांहीं मुद्रणदोष असावा. या शंकेनें त्यांचा हात शुद्धिपत्राकडे देखील सहजगत्या जाईल. पण तसा प्रकार बिलकूल नाहीं. श्रीज्ञानेश्वरांनीं म्हटल्याप्रमाणें हे गृहस्थ खरोखरच माउलीहून मवाळ व चन्द्राहून शीतळ आहेत. मुखदोष या धर्माचा समावेश करून त्यांना गाईची पूर्णोपमा देण्यासहि कांहीं हरकत नाहीं. दुसऱ्यांच्या अन्तःकरणास दुखविणारी त्यांची वाणी असूनही ते आम्हांस फार आवडतात ही एकच गोष्ट त्यांची थोरवी सिद्ध करण्यास पुरेशी आहे. आमच्याशिवाय इतरांनीं कोणी त्यांच्यावर टीका करून, ते दुखावितात त्याच्या शतांशहि आमचीं मनें दुखविलीं तर आम्हांस खपत नाहीं.

हें सर्व खरें असलें तरी इतरांना विनाकारण दुखविण्याचा त्यांच्या या चमत्कारिक गुणाचा स्वतंत्रपणें विचार करूं लागलों म्हणजे मला प्रश्न पडतो कीं, इतक्या चांगल्या माणसांत ही संवय आलीच कशी असावी ? अत्यंत प्रतिकूल व गरिबीच्या स्थितींतून स्वपराक्रमानें जे उन्नतीस चढतात त्यांना परिस्थितीला व लोकांना ढकलून व बाजूस सारूनच वर डोकें काढावें लागतें. पुढें घुसण्याचा व टीका करण्याचा हा गुण उत्तर आयुष्यांत अनवश्यक असला तरी संवयीनें चिकटून रहात असावा. कदाचित् असेंहि असेल कीं विशाल ध्येयें मनांत धरून कार्यास लागल्यावर सारखें अपयश आल्यावर त्यांना निराशा व विषण्णता येत असेल; आणि मग कांहींतरी करावयाचें म्हणून चालू कार्यक्रम रेटतांना हे अशी चिडचिड व हिडिसफिडिस करीत असावेत.

तें कसेंहि असो; कांहीं थोर लोकांत आढळत नसला तरी

परभावनांचा आदर करणें हा एक बहुमोल गुण आहे. श्रीरामदास म्हणतात, " रूपगुण अभ्यासितां न ये। सहजगुणासि न.चले उपाय। कांहीं तरी धरावी सोय। आगंतुक गुणांची ॥ " या वचनाशीं पडताळून पहातां वरील गुण हा सहजगुण नसावा असें वाटतें. कारण सहज असता तर पुष्कळ श्रेष्ठ लोकांत तो सांपडावयास हवा; पण तसा दिसत नाहीं आणि सामान्य लोकांत पुष्कळ सांपडतो. इतका मोलाचा गुण आगंतुक म्हणजे प्रयत्नसाध्य आहे ही फार समाधानाची गोष्ट समजली पाहिजे. लोकसंग्रह करावयास निघालेल्या कार्यकर्त्यांनीं तर श्रीरामदासांनीं या बाबतींत दिलेल्या सूचना'पाठ करून ठेवण्यासारख्या आहेत. 'राखावीं बहुलांचीं अंतरें' हें त्यांतीलच एक स्मृतिवचन आहे. सामान्य‹ लोकांच्या व्यवहारांतहि स्वभावाचा गोडवेपणा या एकाच गुणावर कितीतरी लोक सर्वांचे आवडते होऊन बसतात. लैलाचा हात कापला कीं मज्नूच्या बोटांतून रक्त वाहूं लागे असें कवि वर्णन करतो. अगदीं तितकी सहभावना नसली तरी दुसऱ्याचें अन्तःकरण दुखवितांना आपणास मनापासून कष्ट व्हावयास हवेत. आमच्या कोर्टांत एक हिंदी साहेब होता. तो सर्वांशीं मोठा गोड वागे. रागावतांना तर त्याला कधीं कोणी पाहिलेंच नाहीं. पण मी त्याच्यापुढें काम करीत असतांना एकदांच तो नोकरावर संतापला; अनेकदां सांगूनहि नोकरानें मोठीच आगळीक केली होती. तो रागानें पुष्कळ बोलला; आमच्या देखत आणि अप्रिय व अपरिचित अशा क्रोधाच्या तावडींत नाइलाजानें जावें लागल्यानें त्याला फार कष्ट होत असावे असें त्याच्या तोंडावरून स्पष्ट दिसत होतें. तो एक वाक्य जें बोलला तें माझ्या पक्कें ध्यानांत राहिलें आहे. तो म्हणाला " बेवकूब ! तुम नाहक दूसरे की जबान खराब करते." नोकरानें अपराध केला यापेक्षां दुसऱ्याच्या अंतःकरणास लागणारी

अभद्र भाषा बोलण्याचा प्रसंग यावा याचाच त्याला जास्त संताप आलेला दिसला !

परांतर दुखविण्याचें जिवावर यावें तसेंच दुसऱ्याचें अंतरंग फुलविण्यांत स्वाभाविक आनंद वाटावयास हवा. भिडस्त म्हणून आपण ज्यांच्यावर टीका करतों त्यांच्यांत हे गुण प्रकर्षानें आढळतात. स्वतः-ची गैरसोय सोसून, स्वतःस दगदग, त्रास करून घेऊन दुसऱ्याला सुख देण्यापासून जें समाधान लाभतें त्याची गोडी आम्रफलाप्रमाणें अपूर्व होय ! परभावनांचा आदर करणारी व्यक्ति साध्या प्रतिक्रिया-न्यायानें स्वतः आदरास पात्र होते. माझी एक थोरली बहीण आहे. तिचा नियम असा कीं, माझ्या मताप्रमाणें तिचें मत नेहमीं असायचें ! पूर्वी कौन्सिलमध्यें लोकपक्षाचे प्रतिनिधि म्हणून एक मवाळ पुढारी बोलायला उठले कीं, मोठी गंमत दिसे. त्यांच्या भाषणाची सुरवात, साधारणतः अशी असायची " ऑ. होम मेंबर यांनीं अगदीं आमच्या मनांतील विचारच बोलून दाखविले आहेत.... या बाबतींत त्यांच्याशीं सहमत व्यक्त करण्यांत मला आनंद होतो. त्यांनीं म्हटल्याप्रमाणें.... " माझ्या बहिणीचें या मवाळ पुढाऱ्याप्रमाणें आहे. या तिच्या भिडस्त व मनमिळाऊ स्वभावाची आम्ही कधीं कधीं गंमत करतों. उन्हाळ्याच्या सुरुवातीस एकदां पुण्यास गेलों असतांना मी म्हणालों, " आज फारच त्रास होतो आहे बुवा ! आपण आज बाहेरच निजणार " यावर ती म्हणाली " खरंच ! आज विशेषच उकडलें. तुला आंत झोंप येणार नाहीं " कांहीं वेळ जाऊं देऊन मी म्हटलें ' अंगणांत निजायचं मी म्हणतों आहे खरं; पण पहाटे पहाटे थंडी वाजूं लागली तर मग आंत यायचं जिवावरच येईल. " त्यावर तिनें उत्तर दिलें " पुण्याला वऱ्हाडसारखी कोरडी हवा नाहीं हो ! इथली थंडी बाधते तूं आपला आंतच नीज ! "

पण गंमतीनें आम्ही तिची प्रसंगानुसार थट्टा करीत असलों तरी लोभांतल्या मंडळींशीं जुळवून घेणारें व सदा समरस होणारें तिचें अन्तरंग किती रसमय व श्रीमंत आहे याची मला पूर्ण जाणीव आहे.

याप्रमाणें आर्जवी वृत्ति हा एक लक्ष देण्यासारखा, मुद्दाम अभ्यासण्यासारखा आणि अभिमान बाळगण्यासारखा गुण आहे. असें वागणें लोकांना आवडतें व त्यामुळें आपण लोकांना आवडतों हें तर खरेंच. परंतु माणसाची पारख म्हणून म्हणतात ती यावयासहि या गुणाची आवश्यकता आहे. सहभावनेचा गुण अंगीं पोसला असल्याशिवाय आपण दुसऱ्याच्या अन्तःकरणाविषयीं कसले तर्क करणार ? आणि ' सुस्वागतम् ' अशी पताका लावली असल्याशिवाय आपण दुसऱ्यांच्या अंतरंगांत कसे शिरणार ? पारमार्थिक दृष्टीनेंहि या गुणाला कमी महत्व नाहीं. या अखिल मानवजातीचें जें एक विशाल जगदंतर किंवा सुपरमाइन्ड आहे त्याची चन्द्रकोर जरी पहावयाची असली तरी जास्तींत जास्त मनांशीं समरसता यावयास नको का ? सारांश, ब्राम्हण आणि क्षात्र या दोन्ही वृत्ति ज्याप्रमाणें श्रीभार्गवरामांत केंद्रित झाल्या होत्या त्याप्रमाणें ऐहिक व पारमार्थिक भाग्याचे उगम या आर्जवी वृत्तींत सांपडण्यासारखे आहेत. श्री रामदासांची साक्ष अशीच आहे. " राखावीं बहुतांचीं अंतरें । भाग्य येतें तदनंतरें ! "

# " कलियुगांतील पांडुरंग ! " : १९ :

निर्गुण आणि निराकार अशा परब्रम्हाचें आकलन मानवी बुद्धीला होत नाहीं म्हणून मनुष्यानें त्याला सगुण व साकार असा भगवन्त बनविलें. आणि तुकाराम महाराजांसारख्या परमभगवतांनीं तर त्या परब्रम्हाचा पांडुरंग करून त्याला आपला खेळगडीच केलें ! इतकें होऊनहि सर्वसामान्य मानवजातीला त्या पांडुरंगाचा लळा लागलेला दिसत नाहीं. सांसारिक मनुष्याला निराळयाच पांडुरंगाचा ध्यास आहे. तुकोबाचा पांडुरंग हा नांवाचाच पांडु असून रंगानें तर काळ्या शाई-सारखा आहे. आषाढीकार्तिकीलाच वर्षांतून फक्त दोनदां पंढरपूरच्या मर्यादित क्षेत्रात त्याचा महोत्सव होतो. जो वर्णानें खरोखरच पांडु म्हणजे पांढरा आहे असा वर्तुलाकार रुपाया हाच आम्हा संसारिकांचा पांडुरंग होय ! पांडु आहे रंग ज्याचा असा समासविग्रह त्याचेच बाबतींत यथार्थतेनें करतां येतो. सकलजनमानस-विहंगम, जगज्जीवन हीं विषेषणें कलियुगांतल्या या पांडुरंगाला उत्तमोत्तम लागूं पडतात. विश्वमंडळाप्रमाणें याचा देह व गती चक्राकार असल्यानें पिंडीं तें ब्रम्हांडीं या न्यायानें अखिल विश्वाचे पूर्णांशानें हा चिमुकला गोल पांडुरंग प्रतीकच होय ! श्रीतुकोबासारख्या प्रेमळांनीं अत्यन्त रसाळ शब्दांत अन्तःकरणापासून आळविलें तरीहि त्यांचा पांडुरंग पूर्ण कसोटी पाहिल्याशिवाय त्यांना पावला नाहीं. पण हा आधुनिक पांडुरंग इतका माउलीहून मवाळू आहे कीं एखादा तऱ्हेवाईक कुपुत्र याचा संबंध तुटावा म्हणून तपाचरण करूं लागला तरी आपल्या दयेचा ठेवा त्याच्या अन्तःकरणापासून हा उचलून नेत नाहीं. एक महान् तपस्वी समाधी लावून दाखवतो असें कळल्यावर तो चमत्कार पहा-

ण्यास हजारों लोक जमले. त्यानें लावलेली समाधी पाहून त्याचे भक्त बनलेले कित्येक श्रद्धावन्त गुरूचा दृष्टिप्रसाद लाभण्यासाठीं तेथेंच बसून राहिले. कित्येक दिवसांनीं तो हटयोगी जागा झाला. पण आपल्या शिष्यांना त्यानें पहिलाच प्रश्न केला तो असा " समाधी लावून दाखविण्याबद्दल राजानें देऊं केलेला घोडा कोठें आहे? " परमेश्वराच्या बाबतींत ' यतो वाचो निवर्तन्ते ' म्हणजे ज्याचें वर्णन करायला लागलें कीं वाचा कुंठित होते असें एकेरीच वर्णन आहे. या पांडुरंगाचे वाचेला यथेच्छ वर्णन करतां येते; व त्याच्या मनांतच असलें तर ती वाचा तो खणकन् बंदही करूं शकतो. परमेश्वराची जशी सर्वांभूतीं साम्यबुद्धी आहे त्याचप्रमाणें हाही सज्जनदुर्जन असा भेद-भाव करीत नाहीं. ' कीं गाईची तृषा हरूं। आणि व्याघ्रा विष होवोनि मारूं। ऐसे नेणोचि गा करूं। तोय जैसें ।। ' अशा नानाविध रसात्मक उपमा देऊन श्रीज्ञानदेवांनीं समदर्शी योग्याचें वर्णन केलें आहे तें या पांडुरंगाला तंतोतंत लागू पडते. जें जें ऊर्जित विभूतिमत् सत्त्व आहे तें तें माझा अंश आहे असें श्रीभगवन्त सांगतात तसेंच सर्व गुण माझाच आश्रय करतात असें हा म्हणूं शकतो. पर-मानंद माधवाची कृपा झाली तर मुक्याला वाचा फुटते व पंगू हा गिरी चढून जातो. त्याचप्रमाणें लोळा गोळा झालेला नादान मनुष्य जरी असला तरी याची कृपा असली तर तो सकलकलागुणैश्वर्यमंडित राजराजाधिराज होतो. आणि याची जर का वक्रदृष्टी असेल तर भीष्माचार्यांसारख्यांना सुद्धां ' अर्थस्य पुरुषो दासः ' असें म्हणून मूग गिळून बसावें लागतें.

जगदीशाची जगदीश्वरी तद्वत् या पांडुरंगाची रुक्मिणी श्री ही होय. परमात्मा हा चराचराला व्यापून उरलेला आहे. तो सर्व विश्वाचा आदिअन्त आहे. आमचा हा पांडुरंगहि श्रीरूपानें व्यवहारसृष्टीचा

आद्यन्त आहे. कोणचीही गोष्ट सुरूं करतांना प्रथम श्रीकार येतो. आणि कसलाहि शेवट दर्शविणारा इति हा जो शब्द त्याच्याहि शेवटीं हा श्री शब्द उभाच असतो. इतिश्री या शब्दानेंच समाप्ती या कल्पनेचा पूर्ण बोध होतो. फार काय सांगावें, प्रत्यक्ष परमेश्वराच्याहि हा मागें लागतो हें श्रीराम, श्रीकृष्ण या शब्दावरून सहज कळून येईल. पांगुळ्याला माझा पांडुरंग पायावीण चालवतो, वागवतो ही त्याची कला कोण जाणूं शकेल अशी तुकारामबुवांना धन्यता वाटली आहे. पण पांडुरंगाचा हा नवावतार आपल्या पांगळ्या भक्ताला पाय नाहींत अशी कोणास शंकाही जन्मभर येऊं देणार नाहीं. तो त्याला सदासर्वदा मोटारींतूनच हिंडवतो. आणि या साध्या उपकारांत कसली आली आहे कळा अशा भावनेनेंच जणुं त्या जादूची कळ ड्रायव्हरसारख्या सामान्य इसमाच्या स्वाधीन करून मोकळा होतो.

या पांडुरंगाचा महिमा व करणी अशी अगाध असतांना पारमार्थिकांकडून व तत्त्वज्ञांकडून याची निंदा केली जावी हें कांहीं योग्य नाहीं. कवी हे बारशाला व बारव्याला तयार असलेल्या भटजीप्रमाणें असतात. ते आलटून पालटून निंदा स्तुती करीत असतात. एक कवी म्हणतो "लक्ष्मीच्या योगानें मनुष्य अंध बनतो खास; नाहींतर तिच्या नित्य सहवासांत राहाणारा नारायण खुशाल विषारी सापावर कसा निजला असता !" मला वाटतें हा कवी कोणी दरिद्री विप्र असावा. आणि श्रीकृपा होत नाहीं ह्मणून चिडून परमेश्वरासकट सर्वांची नालस्ती त्यानें केली असावी ! वरील दरिद्री ब्राम्हणाला लक्ष्मीनें मोठें झणझणीत उत्तर दिलें आहे 'ये यथा मां प्रपद्यन्ते' या जशास तसें या पारमार्थिक न्यायानें विप्रांच्यावर श्रीची अवकृपाच होणें नैसर्गिक व योग्य आहे. भृगु ऋषींनीं लक्ष्मीच्या पतीच्या छातींत लाथ मारली आणि अगस्तीनें तर लक्ष्मीच्या पित्याला

ओंजळीसरसा गिळून टाकला; लक्ष्मीची वैरिण जी सरस्वती तिच्या छंदांत नेहमी विप्र भूषण मानतात. अशा विप्रांवर लक्ष्मी पांडुरंगाची अवकृपा झाल्यास नवल काय? किंबहुना ' त्रैगुण्य विषयो वेदः ' ह्मणजे वेद हे त्रिगुणात्मकच असून तूं गुणातीत हो ' असा नवा संदेश सांगणारा भारतीय काळांतला सुधारक श्रीकृष्ण निघाला त्याचप्रमाणें कलियुगांतला हा पांडुरंग सामाजिक समतेच्या काळांत चातुर्वर्ण्याच्या विरुद्ध दिसतो. बुद्धाप्रमाणें ब्राह्मणांचें वर्चस्व याला नापसंत असून त्यांना कडक शासन करण्यासाठीं त्यांचें जीवन कष्टमय करण्याचें यानें ब्रीद उचललेलें दिसतें. ब्राह्मणांच्या विषयीं उठलेल्या तिडिकीमुळें त्यांच्यापासून दूर पळतांना क्षत्रियाची एक पायरी ओलांडून हा वैश्यांचें दैवतस्थान झालेला दिसतो. त्यांच्यावर त्याचें मनापासून प्रेम दिसतें यमनियमादि कडक व्रताचरणें करण्याची कटकट तो यांच्यामागें लावत नाहीं. याची भेट व्हायला तीर्थयात्रा धुंडावयास नको. इतकेंच नव्हे तर देवळांत जाऊन कीर्तनांतहि नाचावयास नको. बसल्या जागींच पद्मासन तयार होतें. शिवाय चिपळ्यांचाहि खर्च नाहीं. दोन पांडुरंग घेतले कीं सुरेल झांज तयार होतें. तिचा रुमझुम छनछन् असा सारखा छंद सुरू झाला कीं भक्त नादब्रम्हांत लीन होतो. जेवणाचीहि शुद्ध रहात नाहीं; व रात्रीं शेवटीं त्याचे दर्शन घेतल्याशिवाय झोंप येत नाहीं !

अशा या चैतन्यघन विश्वव्यापी व सर्वशक्तिमान् पांडुरंगाचा वर-प्रसाद व्हावा म्हणून आपण सर्वांनींच त्याला अन्तःकरणांत निदान हातांत सांठवला पाहिजे. तुकोबाला सदेह वैकुंठास नेण्यासाठीं मी विमान पाठविलें अशी पंढरपूरच्या पांडुरंगाची ऐट आहे. पण प्रत्यक्ष प्रमाणाच्या या विज्ञानशास्त्रप्रणीत नवयुगांत तुकोबा, पांडुरंग, विमान ही त्रयी ऐकीव पुराण्याच्या श्रद्धाकोटींत जाऊन बसली आहे या

नवीन पांडुरंगाची अशी ऐतिहासिक हवाल्याची पद्धत नाहीं. थोड्याशा कृपेनें तो वाटेल त्या भक्ताला विमानांतून हिंडवील; इतकेंच नव्हे तर बायकापोरांना सोडून तुकोबा जे एकदां गेले ते कायमचेच वैकुंठवासी झाले, तशी येथें तऱ्हा नसून पांडुरंगाच्या विमानाचें व शक्तीचें आकाश-विहारांतून कौतुक केल्यावर पुन्हां घरीं पोहचविण्याची व संसारसुख उपभोगण्याची रससोयही येथें आहे !

## "सत्कार्यांतील काव्यानंद !" : २० :

कांहीं पुस्तकें अशीं असतात कीं वाचन चालू असेपर्यन्तच तीं आपलें मन रमवूं शकतात. आगगाडीतल्या सोबत्यांशीं आपण खूप गप्पा मारीत असतों. पण उतरण्याचें ठिकाण आलें कीं त्यांची आठवण चटकन् विसरून आपल्या सामानासुमानाची चौकशी व घरचे विचार आपल्या मनांत सुरू होतात. त्याचप्रमाणें वरील पुस्तकांची गत असते. उलट इतर कांहीं पुस्तकांचा विशेष हा सांगतां येईल कीं तीं वाचनाचे वेळीं तर आपलें चित्त आकर्षित घेतातच; पण वाचन संप-ल्यानंतरही त्यांतील विषय जास्त तीव्रतेनें कितीतरी वेळ आपल्या मनांत घोळत रहातो.

त्या दिवशीं माझें असेंच झालें. थॉमस हार्डी याची "ज्यूड दि ऑब्स्क्युअर" ही कादंबरी मी वाचीत होतों. त्याची 'टेस' ही कादंबरी मी पूर्वी वाचली होती. पण तिच्याहि पेक्षां 'ज्यूड' जास्त कडवट आहे असें म्हणतात कीं हें पुस्तक प्रसिद्ध झाल्याबरोबर सनातनी टीकाकारांनीं तिच्याविरुद्ध असा डोंब उठविला कीं हार्डीन विटून जाऊन कादंबरी-लेखनच सोडून दिलें. ही कादंबरी करुणरसपूर्ण असून तिचा शेवट तर दुःखकारक आहेच; पण एकंदर सार फार उद्वेगकारक आहे. 'दैव हें अत्यन्त बलिष्ठ, आंधळें व क्रूर असून सद्गुणी–दुर्गुणी, अपराधी- निरपराधी हा भेद तें मानीत नाहीं. मानव व दैव यांचें सनातन झुंज चाललेलें असून त्यांत मनुष्यप्राणीच आजवर हार खात आला आहे; व पुढेंहि खाणार ! त्याच्या सर्व ध्येयांचा, महत्त्वाकांक्षांचा, सद्भावनांचा या संग्रामांत कांहीं टिकाव लागत नाहीं '

असें मोठें हताश करणारें तत्व एका विपरीत परिस्थितींतल्या थोर पुरुषाच्या जीवनघटनांतून हार्डीनें ध्वनित केलें आहे !

हें पुस्तक संपविल्यावर मला विलक्षण औदासीन्य आलें. आपल्या वर्तनाची अशी मौज आहे कीं, मनोवृत्ती उल्हसित असल्या म्हणजे अहेतुकपणेंच साऱ्या गोष्टींत आपल्याला गोडी वाटते; पण जर कां आपलें चित्त व्यग्र झालेलें असलें तर कळत असून इच्छा नसतांना ज्या त्या गोष्टींत आपण चिडचीड व तुसडेपणा करतों. त्या दिवशीं असें होऊं लागल्यामुळें मी जरा लवकरच एकटाच लांब फिरावयास गेलों. फिरतांना मी पुष्कळ विचार केला. ' दैवावर मात करण्यासारखें मनुष्याजवळ कांहींच साधन नाहीं कां ? मानवी जीवनाचें ध्येय व समर्थन कशांत असावें ?' या प्रश्नाची पुष्कळ उत्तरें मी शोधलीं. पण पत्त्यांच्या बंगल्यावर जास्त हवेल्या चढविल्या कीं तो कोसळतो तसें प्रत्येक उपपत्तीचें होई. बरें, कांहीं सुचत नाहीं म्हणून तो विषय सोडून द्यावा म्हटलें तर मनांतून जाईना. मन मोठें हट्टवादी आहे. लहानपणची आठवण करा एखादें उदाहरण सुटत नाहीं म्हणून तें सोडून देऊन पुढचें उदाहरण करण्यास आपण कधीं तयार होत होतों कां ?

अशा विमनस्क स्थितींतच काळोख पडला म्हणून मी घरीं परतलों. माझी वाट महारवाड्याकडून व दोन्ही बाजूस झाडी असलेल्या रस्त्यावरून होती. सगळीकडे पूर्ण अन्धार होता. माझ्यापुढें थोड्याच अन्तरावर ' माय, मला भ्या वाटतंय् ' असे रडक्या स्वरांत काढलेले उद्गार मला ऐकूं आले. एक महाराची ७।८ वर्षांची मुलगी एकटीच रडत येतांना मला दिसली. ती सारखी रडत होती " माय मला भ्या वाटतंय् " असें म्हणून ती मोठ्यानें रडूं लागे. जणुं ' आई, मला भीती वाटते ' हें वाक्य मोठ्यानें उच्चारलें

म्हणजे त्या आवजाचीच तिला सोबत वाटत होती कीं काय कोण जाणें ! मला तिची अतिशय कींव आली; व तिच्या जवळ जाऊन तिला धीर देऊन मी तिच्या घरापर्यंत तिला पोहचविण्यास गेलों.

आश्चर्याची गोष्ट अशी कीं, तेथून परतल्यानंतर माझ्या मनावरचें उदासीनतेचें दाट अभ्र कोठच्या कोठें विरून गेलें ! अतिशय मधुर अशा शांत–रसानें माझें अन्तःकरण भरून गेलें होतें. वाङ्मय-वाचनानें व सद्विचारांनीं आनन्द होतो हें खरें. पण सत्कार्य केल्यानें अन्तःकरणांत स्रवणारा अमृतरस त्यापेक्षां शतपटीनें जास्त आल्हादकारक असतो यांत शंका नाहीं.

मला तर असें म्हणावेसें वाटतें कीं परोपकाराचें प्रत्येक सत्कृत्य हेंही एक दुःखान्त सुंदर कलाकृतीच होय ! शोकपर्यवसायी वाङ्मयापासून आनन्द कां व्हावा यांचें विवेचन करतांना श्री. न. चिं. केळकर यांनीं सविकल्प समाधीची मोठी मार्मिक उपपत्ती सुचविलेली आहे. त्यांचें म्हणणें असें कीं, आपली बैठक न सोडतां निरनिराळ्या मनःस्थितींचा व रसांचा अनुभव घेण्यांत आनन्द वांटणें हा मानवी मनाचा एक सहजधर्म आहे. मात्र शोकपरिस्थितींतील व्यक्तीशीं आपण पूर्ण तादात्म्य पावलों तर आनन्द मिळणार नाहीं. 'एकच प्याला' नाटक पाहणाऱ्या हळव्या स्त्रियांच्याप्रमाणें आपली दशा होईल. म्हणून समरसतेचें तादात्म्य तर हवें; पण स्वतःची विस्मृती न पडली पाहिजे. यासाठीं त्यांनीं 'सविकल्प समाधी' हा समर्पक शब्द सुचविला आहे. ज्या रसिकांना शोकान्त वाङ्मयाची लज्जत लुटावयाची असेल त्यांनीं आपल्या मनाची सविकल्पसमाधीची ही शक्ती अतिशय तीव्र केली पाहिजे.

आतां, शोकान्तवाङ्मयांतील करुणव्यक्तीशीं नुसत्या कल्पनेनें तादात्म्य पावल्यावर जर इतका आनन्द होतो तर व्यवहारांतील

दुःखी जीवांशीं समरस होण्यांत प्रत्यक्षतेमुळें कितितरी सरस काव्यानन्द होत असला पाहिजे! याप्रमाणें परदुःखाच्या अनुभवाचा प्रत्यक्ष लाभ करून देणारीं सत्कृत्यें हीं मूर्तिमंत जिवंत काव्येंच होत यांत शंका नाहीं! आणि त्या काव्यसेवनाची अभिरुची धरून सत्कार्याचा ज्यांनीं ध्यास घेतला आहे अशा परोपकारी पुरुषांना अभिजात रसिकांच्या पंक्तींतच अग्रस्थान द्यावें लागेल! •

………… मी घरीं परतलों तों मोठ्या खुषींत होतों. रात्रीं निजतांना माझ्या मनांत आलें "हार्डीनें उभा केलेला दैववाद म्हणजे एकप्रकारें जगाचें कोडेंच आहे. तें मला सुटत नाहीं तसें आजपर्यन्त बहुतेकांना सुटलेलें नाहीं. ज्या थोड्या भाग्यवन्तांना सुटलें असेल तें सुटो! पण हें गूढ सुटलें नाहीं तरी सद्विचारांचा व सत्कृत्यांचा आल्हाद आणि प्रियजनांचें प्रेम हीं तर आपल्या हातीं आहेत ना! या तिन्ही गोष्टी यशसिद्धी निरपेक्ष असून दैवाला यांतून एकहि हिरावून घेतां येत नाहीं. या बाबतींत दैवापेक्षां आम्हीच या घटकेला श्रेष्ठ आहोंत व केव्हांहि ठरूं! प्रो वा. म जोशी रागिणीच्या शेवटीं म्हणतात त्याप्रमाणें 'पूर्णज्ञानाचें समाधान नसलें म्हणून सत्कृत्याचा आनंद कां गमवावा?'

ही विचारसरणी निराशावाद्यांना समर्पक निदान शांतवनपर वाटेल कीं नाहीं कोण जाणे! माझें मात्र तिनें चांगलें समाधान झालें. कारण थोड्याच वेळांत मला गाढ झोप लागली!

● ● ●

# जिवाची मुंबई !

गेलीं चार पांच वर्षे लढाईमुळें सगळ्याच गोष्टींची अडचण होती ही गोष्ट निराळी; पण त्यापूर्वी नाताळाची सुट्टी आली कीं आमच्या येथील बऱ्याच जणांचा मुंबईला जायचा बेत व्हायचा. कांहीं मित्रांनीं मलाही पहिल्या पहिल्यानें विचारलें पण मी अनिच्छा दर्शविल्यावर त्यांनीं विचारणें सोडून दिलें. कधीं मी येथल्याच कामाची कांहीं सबब सांगत असे. कधीं उतर देई कीं मुंबई—पुण्याकडे माझे बरेच नातेवाईक असल्यानें सात आठ दिवसांच्या अवधींत नुसतीच दगदग होते. हीं कारणें त्यांना पटत कीं नाहीं कोण जाणें. बहुतेक पटत नसावींत. कारण एक शेवटीं म्हणाला “ तें कांहीं नाहीं. तूं वेड्या ! अरसिकच आहेस. ” पण मुंबईला जाण्यापेक्षां तो गैर-समजही मला कमी कष्टाचा वाटला. मात्र त्यामुळें माझ्या मनांत विचार आला कीं आपणांस मुंबईचा येवढा कंटाळा वाटतो याचीं सविस्तर कारणें तरी काय असावींत ?

तसें पाहिलें तर मुंबई हें एक नवलपूर्ण व आदर्श शहर आहे. म. गांधींनींसुद्धां ‘ सुन्दर ’ या तिच्या विशेषणास मान्यता दिलेली आहे. सुखचैनी माणसास चार दिवस घालवण्यास तर ती केवळ फुलबाग आहे. प्रत्येक वस्तूचे आदर्श स्वर्गांत आहेत असें प्लेटो म्हणतो. पण ते लवकर पहाण्याची इच्छा नसणाऱ्यांना मनपसन्त असे तसलेच दुसरें नमुने दाखविण्याची सोय मुंबईनें केलेली आहे. यापेक्षां मुंबईचे अधिक गौरव काय करावें ? अडी अडचणीच्या वस्तू मिळण्यास व विशेषतः डॉक्टरांचें साहाय्य हवें असताना मुंबईशिवाय

गत्यन्तर नाहीं ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. मला मुंबईचें हें महात्म्य व ऋण यांची पूर्ण जाणीव आहे. प्रश्न एवढाच आहे कीं हें ऋण मुंबईस भेट देऊनच फेडलें पाहिजे कीं काय ? विजेचे दिवे, पंखे, टेलिफोन वगैरे अनेक सुखसोयी आपणांस " लेडी चपला मेघराज " यांच्या कृपेमुळेंच लाभलेल्या आहेत. पण म्हणून आभार-प्रदर्शनार्थ त्या बाईशीं हस्तांदोलन करण्याची कांहीं सोय नाहीं ! पित्याबद्दल आपल्या मनांत नितान्त आदर असतांना मित्रांच्या वनभोजन प्रसंगीं ते नसावेत असेंच आपणांस वाटते ना ? तसेंच माझें आहे.

मुंबईंत पाऊल ठेवलें कीं कारखान्यांतल्या एकाद्या बॉयलर शेजारीं उभें राहिल्यासारखें मला वाटूं लागतें. व्हिक्टोरियांत एकदांचा बसलों कीं स्वतःच्या जिवाची धास्ती बन्द होते. पण भोंवतालचे ते आवाज, धांदल, गडबड व बजबजपुरी पाहून दिवसारात्रींच्या कोणच्याहि वेळीं मला उकडायला लागतें व उबग येतो दोन चार दिवस जें काय मुंबईंत रहातों तेवढ्यांत बाहेर चालत जायचा प्रसंग आला कीं माझ्या जिवावर येतें. फूटपाथवरूनहि जपूनच चालावे लागतें. आणि रस्ते ओलांडतांना तर महासंकटच वाटतें. वन् वे ट्रॅफिकचा रस्ता ओलांडतांना रस्त्याच्या दोन्हीं टोकांकडे पहाण्याची मुळींच गरज नाहीं हें मला कळत नाहीं असें नाहीं. पण कोणच्याही क्रॉसिंगला सगळीकडे पाहून आणि पुष्कळ थांबून मी एकदां सरळ जो निघतो तो दुसऱ्या टोकालाच थांबतों. मला आठवतें कीं एकादां माझ्या १४ । १५ वर्षांच्या भाच्याच्या बरोबर मी चाललों असतांना तो रस्त्याच्या मधोमध मला अवघड वाटणाऱ्या जागीं थांबला व त्यानें मलाहि थांबविलें. तोंच आमच्या जवळून एक मोटार नीट निघून गेली. रस्ता क्रॉस करण्याची मला येथें एक गम्मत आठवते. आम्हीं एकदां फोर्टमध्यें कांहीं सामान घेण्यासाठीं गेलों होतों. आमच्याबरोबर

एक लठ्ठ व वजनदार असे गृहस्थ होते. त्यांना त्रास नको म्हणून ट्रॅम थांबते त्या स्टेशनजवळच त्यांना उभे करून नुसता रस्ता ओलांडून आम्हीं दुकानांत शिरलों. आम्हांला जास्त वेळ लागलासे वाटून ते सद्‌गृहस्थ कंटाळले. पण त्यांना मधला रस्ता ओलांडणें अशक्यच होतें. तेव्हां आमच्या दुकानासमोरचीच एक व्हिक्टोरिआ बोलावून ते त्यांत बसले व गाडीवाल्यास म्हणाले "रस्ता ओलांडून उभा होतास त्याच दुकानाशीं घेऊन चल!" चार सहा महिनें मुंबईंत राहिलोंच तर हें सारें अंगवळणी पडेल; मी नाहीं म्हणत नाहीं. पण दगदगीची भावना पूर्ण जाईल असें वाटत नाहीं आणि ती सध्यां आहे हें खरेंच आहे. बरें, चुकीची माफी हा शब्दच येथें नाहीं. चूक करण्याची संधी फक्त एकदांच मिळणार!

पुन्हां रस्त्यांतले, दुकानांतले कुठलेही लोक पाहिले तरी सदा अतिशय धांदलींत. सगळ्यांनाच आपल्या कामाबद्दल अलार्म बेल्स झालेल्या असतात. घरच्या लोकांचेही कार्यक्रम पहावे तों दिवसभर आंखलेल्या वेळापत्रकासारखें. फिरायला जायचें तरी या वेळेपासून त्या वेळेपर्यंत. टेनिस खेळायचें तरी अमक्या वारीं अर्धाच तास; असल्या मनोरंजनाचीसुद्धां वेळ, पद्धत सर्व ठरलेली व आंखीव. थोडी मोकळीक, सैलपणा, उशीर म्हणाल तर सर्व हुकून जाते. इतक्या बंधनांतल्या या सुखांत मला कांहीं रामच वाटत नाहीं. आमच्या गांवात एक नव्या पद्धतीचे देशभक्त एकदां कीर्तन करावयास उभे राहिले. त्यांचें म्हणणें असें कीं 'रघुपति राघव राजाराम' सारखे म्हणून उगीच कितीच्या किती वेळ टाळ्या पिटीत बसणें व त्यांत कांहीं एकवाक्यता नसणें हें गैर आहे. म्हणून त्यांनीं त्यांचा नियम सांगितला कीं यथोचितप्रसंगीं ते स्वतः फक्त तीनदा टाळ्या वाजवून गजर करतील. तेवढाच वेळ व त्यांच्याबरोबरच

श्रोत्यांनीं गजराची साथ द्यायची. यानें शिस्त आली. पण रंग कसा येणार ? सिनेमाच्या अगर इतर कांहीं पहाण्याच्या व भेटीच्या वेळा संभाळणें तर मला मुळींच जमत नाहीं. मुंबईतलेच असतात ते सारे बरोबर जमा होतात. ' तूं ट्रॅमच्या अमक्या नाक्यावर बरोबर या वेळेला उभा रहा; मी त्या लोकलनें येईन. तिसरा आधीं तिकिटें काढून अमक्या खुणेशीं थांबेल ' हें त्यांचें छान जमतें. माझा मात्र पत्ता नसतो. आमच्या गांवचे एक पुढारी राउन्डटेबल कॉन्फरन्सचे वेळीं इंग्लंडांत होते. त्यांनीं म० गांधींशीं अर्धा तासाची अपॉइंटमेंट मिळवली. एवढ्या महत्त्वाच्या कामासाठीं ते आपल्या ठिकाणाहून पुष्कळच लवकर निघाले. पण ज्या टयूब रेल्वेंतून ते निघाले ती गांधींच्या मुक्कामावर थांबतच नव्हती. व दुसऱ्या टोकानें परत फिरले त्यावेळीं सर्व स्टेशनांवर थांबणारीच तयार होती. एवंच गांधींकडे ते १९ मिनिटं उशीरां पोहोंचले ! सेक्रेटरींनीं सांगितलें कीं दुसरी मुलाखत सुरू झाली ! माझें नेहमींच असें होतें. ट्रॅम्सची माहिती व त्यांना लागणारा वेळ याचा मला कधींच अन्दाज येत नाहीं. त्यामुळें प्रत्येक ठिकाणीं उशीर उशीर होऊन मी कंटाळून जातों.

आणखीहीं थोडें कांहीं सांगतां येण्यासारखें आहे. चाळींत काय किंवा स्वतंत्र फ्लॅट असला तरी काय सगळें संकुचित जीवन वाटतें. शेजारचे लोकही बिनबोलके, स्वतःमध्यें चूर असलेले, परक्यासारखें असतात. भिडस्त स्वभावाच्या माणसाला या सगळ्या वातावरणांत मोठें ओशाळल्यासारखें वाटतें. त्यांतून घरच्या लोकांची साहजिक इच्छा अशी असतें कीं मुंबईतली त्यांच्या कल्पनेप्रमाणें मजा मला मला दाखवावी. बाहेरच्या त्या धुराला, खणखणाटाला व गलक्याला कंटाळल्यामुळें माझी तर प्रवृत्ती अशी असते कीं घरीं स्वस्थ पडून रहावें. यजमानाला वाटतें घरांत बसून मी नक्कीच कंटाळणार ! त्यांच्या

आग्रहास्तव जावेल तितक्यादा बाहेर जाऊन यावें लागतें. असा कांहीं प्रकार होतो.

" उपेक्षितांचे अंतरंग " या सुंदर पुस्तकांत प्रो. माटे यांनीं त्यांना दिसणारीं मुंबईंतील दु:खकारक दृश्यें रसाळ वाणीनें वर्णन केलेलीं आहेत. मी तितका बाहेर हिंडत नसल्यानें त्यांचा मला परिचय अगर त्रास झालेला नाहीं. पण मुंबईत हिंडतांना पुष्कळच घाण वाटते यांत शंका नाहीं. कसल्या तरी अन्नाचा दर्प जेथें तेथें नाकास जाणवतो. व हवा म्हणाल तर मन:स्थिती अप्रसन्न होण्यासारखी असते. मग तिला कांहींहि नांव द्या. एकदां पुण्यास कँपमध्यें एका मोटारीच्या दुकानांत बसलों असतांना तेथें एक साधु महाराज स्वत:ची मोटार घेऊन आले. त्यांना हवें होतें तितकें पेट्रोल दिल्यावर चाकांत हवा कमी दिसली म्हणून मॅनेजर यांनीं इलेक्ट्रिक पंपानें दोन मिनटांत आपणहून भरून दिली. पेट्रोलचें बिल देतांना महाराज म्हणाले " आणि हवा ? " मॅनेजर हसून म्हणाला " हवा येथें फुकट मिळते ! आपण केव्हांहि येऊन भरून नेत जा ! " मुंबईस मात्र शुद्ध हवा विकतहि मिळत नाहीं !

मला मुंबई कां आवडत नाहीं याची कारणपरंपरा या प्रकारची आहे. विशेषत: सुट्टी चैनींत घालवायची कल्पना आली कीं मुंबईचें नांवसुद्धां माझ्या मनांत येत नाहीं. पण मुंबईकरांना मुंबई फार आवडतें हें मला माहीत आहे. तेथील एक स्नेही मी मुंबईला आलेलों समजलें कीं आग्रहानें मला जेवायला, चहाला, गप्पा मारण्यास बोलावत असतात. आणि येण्याच्या कटकटीनें मी सहसा तें टाळतों. यामुळें मी बेपर्वाई झालों आहें असा त्यांचा गैरसमजहि झाला आहे. मी एकदां त्यांना म्हणालों " तुम्हीं पेन्शन घेतल्यावर शांत अशा ठिकाणीं जाऊन रहा; म्हणजे पहा मी कितिदां तुमच्याकडे येईन तें ! "

ते म्हणाले " मुंबई सोडण्याचें बोलूं नकोस. इथल्याशिवाय एक दिवसहि मला चैन पडणार नाहीं ! " आमच्या गांवाहून मुंबईस जाणाऱ्यांनाहि तेथें मोठी मजा वाटत असली पाहिजे हें मी नाकबूल करीत नाहीं. माझें म्हणणें एवढेंच कीं ज्यांना मुंबईस मजा वाटत नाहीं त्यांना अरसिकांतच काढणें आवश्यक नाहीं. वसुन्धरा ही येवढी सुविस्तृत व बहुरत्ना असतांना सगळया मौजेचा रिझरव्हॉयर मुंबईंतच कसा सांठवलेला असेल? मोठ्या समाधानाचा व सुखाचा जीवनक्रम मुंबईपासून शेंकडों मैल लांब अशा शांत व सुन्दर अजिंठा पठारावर घालवायला मिळाला ही मी ईश्वराची मजवर मोठीच दया समजतों !

REFBK-0019767

(स्थळ प्रत)

# आमचीं कांहीं प्रकाशनें

**कै. शि. म. परांजपे.**

गोविंदाची गोष्ट

स्वातंत्र्यासाठीं आत्मयज्ञ

ग्रीस देश कसा स्वतंत्र झाला

मराठ्यांच्या लढायांचा इतिहास

**कै. दत्तोपंत आपटे.**

श्रीरंगपट्टणची स्वारी.

इतिहास मंजिरी.

ऐतिहासिक दंतकथा व गोष्टी भाग १ व २

**कै. दत्तोपन्त आपटे स्मारक ग्रंथ.**

इतिहास – शास्त्र व तत्वज्ञान.

**कै. चिंतामणराव वैद्य.**

माझा प्रवास.

**महामहोपाध्याय द. वा. पोतद[ार]**

विविध दर्शन.

**श्री. त्र्यं. र. देवगिरीकर.**

फेडरेशन.

घटना परिषद.

वसाहतींचे स्वराज्य.

अल्पसंख्यकांचा प्रश्न.

आयर्लंडच्या स्वातन्त्र्याचा इतिहास.

गीतांजली.

**दि. के बेडेकर.**

सोव्हिएट राष्ट्रें व लोक.

संयुक्त महाराष्ट्र.

**प्रो. अ. रा. कामत.**

सोव्हिएट आर्थिक नियोजन.

**चित्रशाळा प्रेस प्रकाशन विभाग पुणें २.**